म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १२६६

# टिळकांची कविता

— प. वा. रे. भास्कर कृष्ण उजगरे

REFBK-0007644
REFBK-0007644

विद्याखात्यानें मंजूर केलें आहे.

# टिळकांची कविता

## पुस्तक पहिलें

[ सुधारून वाढविलेली चौथी आवृत्ति ]

संपादक

प. वा. रे. भास्कर कृष्ण उजगरे

प. वा. श्री. नरसिंह चिंतामण केळकर

९७७७०
REFBK-0007644

मुद्रक व प्रकाशक

देवदत्त नारायण टिळक

नागरिक मुद्रणालय : शान्तिसदन : आग्रारोड : नाशिक

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

७८७७

मूल्य दोन रुपये

१९५१

# विषयानुक्रम


| | पृष्ठ |
|---|---|
| चौथी आवृत्ति ... ... ... ... | १ |
| संपादकाचे चार शब्द ... ... ... ... | २ |
| उपोद्घात ... ... ... ... | ७ |
| अगाध कांही तरी ... ... ... ... | ७५ |
| अतां कोण्या वसंताचें ... ... ... ... | १२० |
| अश्रुगुच्छ ... ... ... ... | ११९ |
| अश्रूंची माला ... ... ... ... | १४२ |
| आंधळा झालों तर ... ... ... ... | ११७ |
| आमचे तिंबूनाना ... ... ... ... | १०३ |
| आवड आणि प्रेम ... ... ... ... | ७९ |
| एक अमेरिकन मुलगी ... ... ... ... | १०१ |
| एका उन्मनस्काला पाहून ... ... ... ... | ११४ |
| ऐक्याचा आभास ... ... ... ... | १३१ |
| ओझरतें दर्शन ... ... ... ... | ७४ |
| कवि ... ... ... ... | १६ |
| कवि आणि रसज्ञ ... ... ... ... | १५ |
| कवीची विनवणी ... ... ... ... | १५ |
| कवीचें उद्यान ... ... ... ... | १८ |
| कारण मी वेडा नुसता ... ... ... ... | ११[illegible] |
| काळाशीं संवाद ... ... ... ... | १५[illegible] |
| कुणास्तव कुणीतरी ... ... ... ... | ७७ |
| कुणी सांगा बघूं नांव ... ... ... ... | ७४ |
| केवढें हें क्रौर्य ... ... ... ... | ९८ |
| कोलाहल-मौन-मान ... ... ... ... | १२३ |
| खरे पुढारी ... ... ... ... | १३२ |
| गुलाब ... ... ... ... | ८० |
| चालढेली थटका ... ... ... ... | १४३ |
| चुंबनासारखें औषध नाहीं ... ... ... ... | ८३ |
| जगा न ओळख अथवा पारख ... ... ... | १०७ |
| जन्मा आला हेला ... ... ... ... | १०८ |
| ‘ तुम्हि कवी, भिकारिण ’ ... ... ... ... | १७ |
| तो आम्हांला भ्याला ... ... ... ... | १०६ |
| थोडेंथोडें ! हळुहळू ! ... ... ... ... | ११२ |

## विषयानुक्रम


| | |
|---|---|
| दोन फुलें ... ... ... ... | ८३ |
| नर्तन ... ... ... ... | ६९ |
| नवें वर्ष ... ... ... ... | १११ |
| नूतन संवत्सर ... ... ... ... | १११ |
| पर्वतारोहण ... ... ... ... | ४५ |
| पळाचा भरंवसा ... ... ... ... | १४३ |
| पांखरा येशिल का परतून ? ... ... ... ... | १०२ |
| पुरें जाणतों मीच माझें बल ... ... ... ... | १४१ |
| प्रियकर हिंदिस्तान ... ... ... ... | १५२ |
| प्रेमसमाधि ... ... ... ... | ७६ |
| बापाचे अश्रु ... ... ... ... | ८७ |
| बाह्यसृष्टीचें आणि अंतःसृष्टीचें गानवादन ... ... | ४३ |
| बोंबाबोंब ... ... ... ... | १५१ |
| ब्राह्मण किंवा महार ... ... ... ... | १२८ |
| मंगलाष्टक ... ... ... ... | १४७ |
| मधमाशीला ... ... ... ... | ११५ |
| मला काय मिळालें आहे ? ... ... ... ... | ७६ |
| महारथी ... ... ... ... | ६९ |
| माझि चिलीम ... ... ... ... | १०९ |
| माझी ताई ... ... ... ... | ८५ |
| माझी फुलें काय झालीं ? ... ... ... ... | १०९ |
| माझी भार्या ... ... ... ... | ६१ |
| माझ्या जन्मभूमीचें नांव ... ... ... ... | १२४ |
| मानिनीचें वेडेपण ... ... ... ... | ७१ |
| मिस् फ्लॉरेन्स नाइटिंगेल ... ... ... ... | ९९ |
| मुरली ... ... ... ... | १४८ |
| मुलीच्या वाढदिवसाला अनुलक्षून ... ... ... | ८५ |
| मेलेले कोण ... ... ... ... | १४५ |
| रणशिंग ... ... ... ... | १३७ |
| राजनिष्ठा ... ... ... ... | १२५ |
| रानांत एकटेंच पडलेलें फूल ... ... ... ... | ८० |
| लेकरांची जिज्ञासा ... ... ... ... | ८१ |
| लोकमित्र ... ... ... ... | १३५ |
| वनवासी फूल ... ... ... ... | १९ |

| | |
|---|---|
| विरह | ७२ |
| विरह फुलांचा नाहिं बरा | ८६ |
| वृक्षान्योक्ति | १४४ |
| वेडा | ७७ |
| वैचित्र्य आणि ऐक्य | १३० |
| वैचित्र्याचें समापन | १५० |
| शुद्ध प्रेम आणि वियोग | ७३ |
| शुभाशुभाचा संगम | १३० |
| शुष्क गुलाब | १०० |
| श्रमसौंदर्य | १२२ |
| सखि स्वतंत्रते | १४० |
| सदा तरुण | १४९ |
| सहकारित्व | १३५ |
| सुंदर सुवासिक आंबा | १०७ |
| सुशीला | ४८ |
| सृष्टीची करमणुकीची घटका | ४४ |
| सृष्टीची भाऊबीज | ३७ |
| सेवा | १३४ |
| स्त्रीपुरुष | १४६ |
| हें सुख का नाश? | १४६ |

## पुरवणी

| | |
|---|---|
| कविरत्न... कृष्णाजी केशव दामले | सहा |
| केशवसुत | चार |
| खोटा रुपया | आठ |
| गायत्रि | नऊ |
| टिमकीवाला | तीन |
| प्रार्थना | नऊ |
| प्रियेचें पुनर्दर्शन | एक |
| प्रेमांच्या बहुल्यावरी | अकरा |
| माझें नांव लढाई | अकरा |
| माझें मला द्या | सात |
| मृत्यूची कल्पना | दहा |
| झपूर्झा गडे झपूर्झा | पांच |

—x—

# चौथी आवृत्ति

7.6.7
724
नं. 9.3/9

---

टिळकांच्या समग्र कवितांचें दोन भागांत प्रकाशन करण्याचा माझा मानस आहे. प्रस्तुत काव्यग्रंथांत समाविष्ट केलेल्या कवितांसारख्या कविता एका भागांत, व दुसऱ्यांत धार्मिक कविता अशी त्या कवितेची मी विभागणी करणार होतों. पैकीं धार्मिक कवितांचा कांहीं भाग आज छापूनहि तयार आहे. ह्या शिवाय विद्यार्थ्यांकरितां टिळकांच्या कवितेची एक संक्षिप्त आवृत्तीहि काढण्याचें मीं योजिलें आहे· ह्या कार्यक्रमांत पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या ह्या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाची कांहीं आवश्यकता आहे असें वाटत नव्हतें. परंतु प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर असें आढळून आलें, कीं ह्या कामीं जो वेळ व पैसा लागणार आहे त्याची वाट पाहण्यांत आणखी बराच काळ खर्च होणार. ‘ टिळकांची कविता ’ हें पुस्तक दुर्मीळ होऊन बराच काळ लोटला आहे. तेव्हां ह्या पुस्तकाची आणखी एक तरी तात्पुरती आवृत्ति काढणें अप्रस्तुत होणार नाहीं, असें कांहीं मित्रांचें म्हणणें पडल्यानें ही चौथी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे.

मराठी वाचकांना साधारणतः अपरिचित अशा कांहीं कविता ह्या आवृ॰ परिशिष्टरूपानें जोडल्या आहेत.

एका प्रमादाबद्दल वाचकांची क्षमा याचितों. पूर्वीच्या आवृत्त्यांत जागेच्या बाबतींत जो सढळपणा दाखवितां आला तो ह्या आवृत्तींत न दाखवितां कविता दाटीमुटीनें बसवाव्या लागत आहेत. जागेची तशी खैरात पुन्हा केली असती तर पानें वाढलीं असतीं व त्या मानानें किंमतहि वाढवावी लागली असती.

नाही, मध्ये, मधे, हसणें, कुणी ( प्रथम एक वचन ) कांही, पुन्हा, एकदा, पेक्षा इत्यादि शब्दांतील ही, ध्ये, धे, ह, णी, न्हा, दा, क्षा ह्या अक्षरांवर टिळक अनुस्वार देत नसत. तसेंच संबोधनाचा अनेकवचनी प्रत्यय नो आणि द्वितीया-चतुर्थीच्या अनेकवचनाचा प्रत्यय ना ह्यावरहि ते अनुस्वार देत नसत. ही शुद्धलेखनपद्धति आम्हीं ह्याहि आवृत्तींत स्वीकारली आहे.

शान्तिसदन, नाशिक.<br>१ डिसेंबर १९५१

देवदत्त नारायण टिळक

# संपादकाचे चार शब्द

महाराष्ट्राला आधुनिक कविता संग्रहणीय वाटत आहे हें काव्यरत्नावली-सारखें मासिक, अभिनवकाव्यमालेसारखें नियतकालिक, आणि काव्यदोहन, रसतरंगिणी इत्यादि उपयुक्त पुस्तकांसारखे काव्यसमुच्चय प्रसिद्ध होत आहेत, यावरून स्पष्ट दिसतें. याच्या पुढची पायरी म्हटली म्हणजे विशिष्ट कवींच्या काव्यांचा संग्रह स्वतंत्रपणें प्रसिद्ध होणें ही होय. ‘ मोगऱ्याचीं फुलें, ’ ‘ मंदार-मंजिरी, ’ ‘ मौक्तिकमाला ’ इत्यादि ग्रंथ या पायरीचे दर्शक होत. आजपर्यंत या दुसऱ्या पायरीवर स्वतः कवींनींच पाय ठेविलेला आहे. प्रस्तुत पुस्तकाची गोष्ट तशी नाहीं. या पुस्तकांत आलेल्या कवितांचा संग्रहसुद्धां स्वतः कवीनें केला नसून तो मींच करून ठेवला होता, व तो आतां प्रसिद्ध करण्यासंबंधानें कवींनीं गुरूच्या व मित्रत्वाच्या नात्यानें योग्य तें साह्य केलें असलें तरी या कामीं मला मुख्यतः साह्य त्यांच्या कवितेच्या भोक्त्यांकडूनच झालेलें आहे.

अमेरिकन मराठी मिशन **रे. टिळक** ह्यांना कवि म्हणून किती मान देत आहे, हें सांगणें अशक्य आहे. यांच्यासारख्या कवीस प्रोत्साहन देऊन त्यांच्या-करवीं या मिशनानें गद्यपद्यात्मक वाङ्मय तयार करविलें, ही गोष्ट महाराष्ट्र-वाङ्मयाच्या इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखी आहे.

मराठी भाषेला केवळ आपली समजणाऱ्या दोन अमेरिकन विदुषी **मिसेस एच्. एच्. ली, व मिस् ई. आर. बिसल** यांनीं मला सर्व प्रकारें व शक्य तितकें साह्य केलें. तसेंच रत्नागिरीचे **रे. सिंप्सन** व पुण्याचे **रे. डी. एन्. मॅकिनकल** यांनीं या कामांत आपली सहानुभूति प्रदर्शित केली.

या पुस्तकांचा उपोद्घात **रे. टिळक** यांचे विद्वान मित्र श्रीयुत **नरसिंह चिंतामण केळकर** यांनीं लिहिला. कवितांची निवड करीत असतांना माझे परमप्रिय कविमित्र श्रीयुत **त्र्यंबक बापूजी ठोमरे** यांनीं साह्य केलें. म्हणून प्रकाशक या नात्यानें मी त्यांचे मनापासून आभार मानितों.

मी या पुस्तकाचा नुसता संपादक नसून, प्रस्तुत कवीचा शिष्य व त्यांच्या काव्याचें परिशीलन करणारा नम्र विद्यार्थी आहें, तेव्हां मीं कितीहि आत्म-

संयमन केलें तरी—श्रीयुत **केळकरां**सारख्या विद्वद्वर्यांचा उपोद्घात या संग्रहाला भूषवीत असूनहि—या कवीच्या काव्याच्या अभ्यासाची मला जी फलश्रुति प्राप्त झाली आहे, ती वाचकांना अंशतः तरी अर्पण केल्यावांचून मला राहवत नाहीं.

**रे. टिळक** हे आपल्या काव्याच्या द्वारां आपल्या देशबांधवांना अत्यंत उच्च ध्येयें समर्पण करणारे आहेत. किंबहुना अलीकडच्या पंधरावीस वर्षांपासून त्यांच्या कवितेचें प्रमुख धोरण हेंच आहे. मी तर या कवीला ध्येयदाता कवि समजतों. हा ध्येयद्रष्टा व ध्येयदाता कवि म्हणूनच म्हणत आहे! –

जें दिसे न इतर जनाला,
तें दिसतें कविरायाला;
विज्ञानपर्वतावरतीं,
कवि चढती, रमती, गाती;
कविराज, । पाहतो आज । थोर जें काज ।
तेंच बघण्याला । युग कमी गमे अन्याला ।

(स्वाराज्य आणि स्त्रिया)

आपण जीं ध्येयें जगापुढें ठेवीत आहों, त्यांचें स्वरूप इतकें दिव्य आहे, कीं त्यामुळें इतर कांहीं कारणांनीं जगानें जरी आपली अवहेलना केली, तरी आपल्याच्यानें त्या ध्येयांची अवहेलना कदापि करवणार नाहीं, अशा विश्वासानें कवि म्हणतों :—

म्हणा कवीला जा येथोनी, हाकलून द्या पाहूं,
करा प्रतिज्ञा तद्वचनांना होउन बहिरे राहूं!
तरी तयाच्या वाणीसाठीं केवळ वेडे व्हाल!
बघाल नच मुख ज्याचें त्याच्या खुशाल मागें जाल.

ही ध्येयें परमपवित्र आहेत.

वंदा निंदा! परि दुरुनी!। पवित्र ही कवितारमणी;

कारण हीं प्रत्यक्ष परमेश्वरप्रेरित आहेत :—

हीं निःश्वसितें। कोण सोडितें। मम हृदयीं, तें।

विचारुनी, भिउनी त्याला
पुढें करा मग कर अपुला.

अशीं हीं ध्येयें आहेत तरी कोणतीं आणि कशीं, हें आपण पाहूं. प्रथमतः काव्य हाच विषय आपण घेऊं. काव्य म्हणजे 'कवीच्या देहांत चैतन्यासह निवास करणारे एक सत्त्व;' काव्य म्हणजे 'शास्त्रज्ञांच्या, तत्त्वज्ञांच्या पलीकडे संचार,' (वनवासी फूल); काव्य म्हणजे 'कवीचें नंदनवन,' (कवीचें उद्यान); काव्य म्हणजे 'कवीच्या हृदयांत येऊन दाखल होणारीं देवाचीं निःश्वसितें,' (कवीची विनवणी); 'काव्य म्हणजे नदीचा पूर,' (कवि); याप्रमाणें मुद्दाम काव्याची व्याख्या करीत न बसतां, केवळ स्फूर्तीनें कवि आपली काव्याविषयींची व्याख्या म्हणण्यापेक्षां समजूत किंवा ध्येय जगापुढें ठेवीत आहे. त्याला काव्य म्हणजे नुसतें मनोरंजन वाटत नाहीं. तें निरंतर कार्यकारी असें देवाचें निःश्वसित आहे, तें चैतन्याप्रमाणें कवीशीं सदासंयुक्त असें सत्त्व किंवा कवीचा स्वभावच आहे. **रे. टिळकांच्या** काव्याची प्रसादाविषयीं जी इतकी ख्याति आहे तिचें कारण त्यांची ही काव्याविषयींची दृढ समजूत होय असें मला वाटतें.

आधुनिक मराठी काव्यांत जीं थोडीशीं काव्यें सर्वोत्कृष्ट ठरलीं आहेत त्यांत **टिळकांच्या** 'वनवासी फुला'ची गणना होत आहे. हें काव्य तर आहेच, पण तितकेंच हें तत्त्वज्ञानहि आहे. निवृत्तिवाद आणि प्रवृत्तिवाद, किंवा ध्यानयोग आणि कर्मयोग यांचें हें इतकें सुंदर विवेचन आहे, कीं 'धर्मविचारा' सारख्या मासिकाच्या कर्त्यानें याला दुसरी भगवद्गीता म्हटलें आहे; पण

'प्रेमनाम जगदीश फुला रे! काय आणखी सांगूं?' किंवा
'जगच्चालका कशी आवडे मती जगावर रुसली?'

असें प्रतिपादणारें हें तत्त्वज्ञान मला हुबेहूब ख्रिस्ताचें तत्त्वज्ञान दिसतें. (बायबल, १ योहान ४:८ "देव प्रेमस्वरूप आहे" व मात्थी ७:२१-२२. "मला प्रभुजी प्रभुजी, असें म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत होईल असें नाहीं; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणें वर्ततो त्याचा होईल.") या काव्यांत कवि एक 'प्रेमल, सात्त्विक, पवित्र' असें सत्त्व उभें करून याला ओळखणारा व याचा जगाला उपयोग करून देणारा महात्मा, संकटांना भवसिंधूच्या नयन-मनोहर ऊर्मि समजून त्यांत खुशाल पोहणारा, **'काम निराळा, प्रेम निराळें सदैव वाटे ज्यातें,' 'जीवन आणि प्रेम भिन्न नच, एक–'** असें म्हणणारा असला पाहिजे, हें सुचविंत आहे. या काव्यांत जें प्रेमाचें दर्शन करून दिलें आहे त्याहून ईश्वर भिन्न नाहीं; जें जीवन वाहवून दिलें आहे त्याहून दिव्यता भिन्न नाहीं. मला हें कबूल केलें पाहिजे, कीं या काव्यानें माझ्या प्रत्यक्ष स्वभावांत फरक केला आहे. याच्यांत काव्याच्या पलीकडे कांहीं तरी आहे, आणि तें ज्याला उमगलें त्याला याची किंमत कांहीं निराळीच वाटल्यावांचून राहणार नाहीं.

**टिळकांनीं** पतिपत्नीविषयक प्रेमाचें जें उच्च, शुद्ध, भव्य स्वरूप उभें केलें आहे तें केवळ अद्वितीय आहे. 'सुशीला,' 'माझी भार्या,' 'शुद्ध प्रेम आणि वियोग,' 'अगाध कांहीं तरी,' 'आवड आणि प्रेम' इत्यादि त्यांच्या कविता वाचून पहा. ज्या प्रकारचें प्रेम करणें हा पत्नीचा मात्र अधिकार आहे, पतीला तें साध्य नाहीं, अशी जगाची समजूत आहे, त्या प्रेमाचें अधिष्ठान पुरुषाला करून त्याला इतक्या रम्य रीतीनें जगापुढें उभें करणें **टिळकांना** मात्र साध्य आहे. ('सुशीला' काव्याचा शेवटला परिच्छेद पहा.) त्यांचें **'माझी भार्या'** हें काव्य म्हणजे स्त्रीजनाची खरी महति, काम आणि प्रेम यांचें भिन्नत्व, अधिभौतिकाच्या फार पलीकडे वास करणारें स्त्रियांमधलें स्त्रीत्वाचें दिव्य तेज इत्यादि विषयांचें प्रत्यक्ष दर्शन होय. ज्या पापाचरणामुळें पतिपत्नीत्वाचें नातें आपोआप तुटतें तें घडलें नसेल तर एकपत्नीव्रताला प्राधान्य देणारा ख्रिस्त पतिपत्नीला परस्परांचा त्याग करावयाला परवानगी देत नाहीं. अर्थात् कोणत्याहि आणि कसल्याहि प्रसंगीं हें व्रत आनंदानें पाळावयाचें म्हणजे पतिपत्नीमधलें प्रेम तसेंच उच्च, तसेंच दिव्य, तसेंच शुद्ध असलें पाहिजे, आणि याच प्रेमाचें समर्थन टिळक आपल्या प्रेमविषयक काव्यांतून करीत आहेत. हें त्यांचें ध्येय असून

त्याला यत्किंचित्हि बाध येऊं नये म्हणून त्यांच्या काव्यांत मधून मधून येणारा शृंगारसुद्धां बहुधा ध्वनिरूपानें असतो. उदाहरणार्थ :---

पूर्ण झाली कीं उषेची प्रभात,
कळीलागीं हो पुष्पपणा प्राप्त;
कविस्फूर्तीला काव्यपणा आला,
यौवनाढ्या परिपूर्ण हो सुशीला

हें एकच पद्य पहा. याकरितांच त्यांच्या पतिपत्नींविषयक काव्यांना शृंगारिक न म्हणतां प्रेमविषयक म्हटलें आहे.

त्यांना '**स्त्रीपुरुषात्मक एकच अवघी ही मानवजाति**' दिसत आहे. त्यांचें जीवनाचें ध्येय असेंच अत्युच्च आहे; मनुष्य म्हणजे आपल्या आंतरबाह्य अवस्थेचा स्वामी, ही त्यांची पक्की श्रद्धा आहे. ते मनुष्यत्वाला देवत्वाच्या खालोंखाल किंमत देत आहेत. त्यांचें आशावादित्व अवर्णनीय आहे. रे. टिळक हे मनापासून राजनिष्ठ आहेत, तसेच स्वदेशनिष्ठ आहेत. त्यांचीं ईश्वरावरचीं प्रेम व श्रद्धा हीं पाहून कोणाचेंहि मन द्रवेल.

या अल्प संग्रहांत श्रीयुत टिळकांचीं जीं ध्येयें मला वाटलीं तीं आपल्या अल्प मतीप्रमाणें व अल्प स्थलावकाशाप्रमाणें मीं विशद केलीं आहेत. मला इतकेंच ठाऊक आहे, कीं प्रस्तुत कवि स्वतःच्या मनांत कांहीं असल्यावांचून व तें इतरांना अर्पण करण्याच्या इच्छेवांचून फारसें गातच नाहीं.

मीसुद्धां आपल्या देशबांधवांना या काव्यसंग्रहाच्या रूपानें कित्येक उत्कृष्ट ध्येयें अर्पीत आहें. असें मी समजतों. सर्व ध्येयांचें ध्येय माझ्या या प्रयत्नांस सफल करो.

भास्कर कृष्ण उजगरे

★

# उपोद्घात

महाराष्ट्रभाषेंतील आधुनिक कवींपैकीं एक प्रमुख कवि, श्रीयुत नारायण वामन टिळक यांच्या ह्या त्रयोदशगुच्छात्मक कवितासंग्रहास मीं उपोद्घात लिहावा अशी विनंति मला करण्यांत आली, हा मी माझा एक प्रकारचा बहुमानच समजतों. मी स्वतः कवि नाहीं, किंवा माझें काव्यविषयाचें अध्ययनहि विशेष नाहीं. अर्थात् टिळकांसारख्या कवींच्या कृतीची ओळख महाराष्ट्रास करून देण्याची पात्रता माझ्या अंगीं कोठची? तथापि, आधुनिक मराठी कवींची तरफदारी करण्याची या रूपानें मला आणखी एक सुसंधीच मिळाली असें मानून, सदर कवितासंग्रहास उपोद्घात लिहिण्याचें मींहि कबूल केलें.

आधुनिक मराठी कवितेविषयीं माझीं मतें पुष्कळांस ग्राह्य वाटत नसलीं, तरी तीं आतां बहुतेकांस माहीत झालीं आहेत. काव्यप्रतिभेचें देणें ईश्वरानें फक्त प्राक्कालीनांसच दिलें होतें असें नाहीं; गेल्या पन्नास वर्षांत म्हणजे 'आधुनिक' किंवा 'नव्या' मन्वंतरास सुरुवात झाल्यापासून प्रतिभासंपन्न असे कवि महाराष्ट्रांत अनेक होऊन गेले व आहेत. कालमान व ज्ञानविषय बदलल्यानें मराठी काव्यविषय बदलले, आणि कांहीं अंशीं भाषापद्धतीहि बदलली असली तरी प्रतिभागुण कमी झाला आहे असें नाहीं. पन्नास वर्षांच्या मानानें आधुनिक कवितासंग्रह कांहीं अगदींच क्षुद्र नाहीं. भौतिक सुधारणा व पाश्चात्य वाङ्मय यांच्या परिचयानें काव्यप्रतिभा बोथट किंवा मलिन न होतां ती दिवसेंदिवस तीक्ष्ण आणि सतेजच होत जाणार; आजच्या 'नवीन' कवींना समकालीनांकडून जो अन्याय होत आहे त्याची पुरी भरपाई पुढील पिढी खास करील; आणि आधुनिक महाकाव्येंहि लवकरच निर्माण होतील; त्याविषयीं कोणीं चिंता करण्याचें कारण नाहीं असा माझा दृढ विश्वास आहे. तो पूर्वी अनेक वेळां मीं व्यक्त केला होता, व तोच फिरून एकवार आनंदानें व्यक्त करितों.

आधुनिक कवितेचे दोष मला दिसत नाहींत असें नाहीं. या कवितेंत जुन्या पद्धतीचे आध्यात्मिक विषय नसतात हा दोष मानितां येईल कीं नाहीं हा प्रश्न वादग्रस्त आहे, तथापि, माझ्या मतें मुख्य दोष हा आहे, कीं कविता इंग्रजी (Lyric) 'वीणाकाव्या'च्या चुकीच्या अनुकरणानें फारच त्रुटित असते.

७६४०

यामुळें कवीच्या प्रतिभेचें तेज चमकून गेलें तरी त्याच्या मनाचा विस्तार किंवा खोली यांची कल्पना तिजवरून होत नाहीं. एका सुवर्णकणांतील सोनें आणि सबंध सोन्याच्या लगडींतील सोनें हीं कसाला सारखींच भरतील; परंतु सोन्याची लगड पाहून त्याविषयीं जी महत्त्वबुद्धि वाटते ती कसोटीच्या दगडाच्या पृष्ठभागास चिकटलेला एकादा कण पाहून वाटत नाहीं. दुसरा दोष हा, कीं राष्ट्र आणि जनता यांच्या जीविताशीं संबंध असलेले किंवा त्यांशीं तादात्म्य करून देणारे विषय आधुनिक कवि फारसे घेत नाहींत. यामुळें त्यांच्या कवितेला लौकिक पठनाचें विस्तृत अधिष्ठान मिळत नाहीं. पूर्वींच्या वेदांती कवितेस किंवा पवाड्यांस असें अधिष्ठान होतें, यामुळें तें काव्य अस्सल राष्ट्रीय असें मानलें जात असे. आजकाल पूर्वींच्या परमार्थविचारपद्धतींत फरक पडला आहे, आणि राष्ट्रीय पवाडे करून गाण्यास स्फूर्ति येण्यासारखी राष्ट्राची स्थिति नाहीं, हें कबूल आहे. तथापि, जनताचरित्रगंगेंत अवगाहन करणाऱ्या प्रतिभासंपन्न कवीला नवरसपरिपोषक विषय सांपडणार नाहींत असें वाटत नाहीं. आधुनिक कवींचा तिसरा दोष 'शून्यसंशोधन' किंवा ज्याला इंग्रजींत Mysticism म्हणतात तो. हें शून्यसंशोधन मोहक असतें; परंतु याचा अतिरेक झाला म्हणजे कवितेचा मनावर परिणामहि शून्यमयच होतो. बाह्यसृष्टीचा पूर्ण परिचय व परामर्ष घेऊन झाला म्हणजे मग कविमन अंतर्मुख झालें तर तें शोभतें. एरवीं तो प्रकार मुलाची सोडमुंज झाल्यावरोबर त्याला संन्यास देऊन भगवीं वस्त्रें नेसविल्यासारखा हास्यास्पद वाटतो. कित्येक आधुनिक कवींची प्रेमविषयक कविता वाचून झाल्यावर कविकल्पनांचें कसलेंच म्हणून चित्र वाचकांच्या मनावर उमटत नाहीं असा पुष्कळांचा अनुभव आहे व हें शून्यसंशोधन लवकरच थांबेल तर बरें.

मी आधुनिक कवितेचा पक्षपाती असल्यामुळें मला न्यायबुद्धीनें त्या कवितेच्या दोषांचाहि विशेष उल्लेख करावासा वाटला; पण बाह्य सृष्टीच्या मर्माचें हल्लीहून अधिक मनन केल्यास, आपल्या विस्तृत ज्ञानाच्या साहाय्यानें आधुनिक मराठी कवि पूर्वकवींना खचित भारी होतील असें मला वाटलें, इतकें सुचवून मी प्रस्तुत विषयाकडे वळतों.

श्रीयुत टिळक यांची कवि या नात्यानें आज पुष्कळ वर्षांपासून प्रसिद्धि आहे व ती यथार्थहि आहे. कविता करण्याचा त्यांचा उद्योग सुमारें तीस वर्षे चालू असून प्रस्तुत संग्रहांत प्रसिद्ध होत आहे याच्या किलेकपट कविता त्यांच्या संग्रहीं आहे. टिळकांनीं काढलेलें 'काव्यकुसुमांजलि' मासिक पुस्तक पहिल्या पांच अंकांनंतर नामशेष झालें. तथापि, प्रस्तुत कवितासंग्रह हा महाराष्ट्रास वाहिलेला 'काव्यकुसुमांजलि'च असून तो नामशेष होणार नाहीं व मराठी वाचकांस निरंतर आदरणीय होईल.

टिळकांच्या 'समग्र कवितासंग्रहांतील निवडक उतारे' या दृष्टीनें प्रस्तुत संग्रहखंडांतील काव्यांची निवड कशी काय झाली आहे, हें तो संग्रह समग्र पाहिल्याशिवाय, कोणास सांगतां येणार नाहीं. तथापि, विषयवैचित्र्य व काव्यगुण यांच्या दृष्टीनें पहातां झालेली निवड बरी झाली आहे. प्रेम, ईश्वरविषयक कल्पना, मानवजीवित, सृष्टिसौंदर्य वगैरे विषयांवरच्या टिळकांच्या कविता वाचतांना गोडी येते; आणि विधर्मी दोन मनुष्यांत, समान भाषेच्या उपकारामुळें, मानवजीवित, मानवचारित्र्य किंबहुना राष्ट्रभक्ति यांचीं आद्यप्रमेयें मनास पटून समरसत्व कसें उत्पन्न होऊं शकेल हें सिद्ध होतें. सदर कवितासंग्रहांत कवीच्या विशिष्ट धर्मपंथाची कोणास आठवणहि होणार नाहीं, अशा नाजूक व मार्मिक रीतीनेंच कवितांची बहुधा निवड केली गेली आहे ही गोष्ट अभिनंदनीय होय, व त्याच्या योगानें मनुष्यपण व काव्य हीं धर्मपंथातीत असतात हें तत्त्व सिद्ध होण्यास निःसंशय मदत झाली आहे.

टिळकांची कविता इतकी सोपी असते कीं, ती समजून घेण्यास वाचकाला कोणी गुरु लागत नाहीं; आणि प्रस्तुतचे उतारेहि निवडक असल्यामुळें ते सर्व वाचणें याहून कवीशीं परिचय करण्याला दुसरा फारसा प्रशस्त राजमार्ग नाहीं. तथापि, उपोद्घातलेखक या नात्यानें, कोणाची इच्छा असल्यास, त्याला मार्गदर्शन करविणें हें माझें कर्तव्य आहे असें समजून मी खालील टिपणें देत आहें.

टिळकांच्या कवितेचे माझ्या मतें मुख्य दोन गुण आहेत. एक प्रसाद व दुसरा प्रेमळपणा. हे दोनहि 'प्र'कारचे गुण कोणत्याहि चांगल्या कवितेस आवश्यक आहेत. प्रसादगुणासंबंधानें तर दुसरा कोणी आधुनिक मराठी कवि टिळकांची बरोबरी करील असें सहसा वाटत नाहीं. कवीच्याच वाणीनें, पण फक्त एका शब्दाचा फरक करून मी म्हणतों कीं—

नकळे कोठुनि येतो प्रसाद कविच्या प्रसन्न काव्याला!

आणि त्यांतल्या त्यांत विशेष हा, कीं कविताविषय सोपा असो वा कठिण असो, टिळकांच्या शब्दांचा साधेपणा व प्रांजलपणा बिलकूल ढळत नाहीं. बाह्य सृष्टींतील 'फुलांमुलां'चें वर्णन असो किंवा अंतरंगांतील अत्यंत गूढ भावनांचें वर्णन असो, कवि तीं दोन्हीही सारख्याच प्रसादयुक्त वाणीनें करितो. मला असें समजतें कीं टिळक हे एके काळीं पुराण सांगत असत; त्यांनीं व्याकरणाचा बराच अभ्यास केला आहे; त्यांना पूर्वी संस्कृत कविता करण्याचा फार नाद होता; हल्लींहि कारणपरत्वें ते संस्कृत पद्यरचना करितात; आणि त्यांची संस्कृत कविता कठिण असते. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां त्यांच्या मराठी कवितेंत, गूढ, अवजड किंवा ओढाताणीनें केलेली रचना औषधालाहि मिळूं नये, हें खचित आश्चर्यकारक आहे. उदाहरणार्थ, सुंदरतेच्या लीलेचें वर्णन—

रंग नभाचे कसे तरी, कसे तरी ही मजा खरी;
किती आपुलीं
फुलें उमललीं,
कुठें लटकलीं,
चिंता नच ही वेलीला सुंदरतेची ही लीला

इतक्या सोप्या शब्दांनीं केलेलें माझ्या पहाण्यांत नाहीं. तीच गोष्ट 'सहकारित्व' किंवा 'उन्मनस्क स्थिति' असल्या कठिण मानसशास्त्रीय विषयवर्णनाची आहे.

साधेसोपेपणामुळें येणाऱ्या भाषासौंदर्याचे मासले वाटतील तितके दाखवितां येतील. 'प्रीतिलतिके' चे खालील वर्णन पहा—

ममत्वाचें खालतीं आलवाल,
वरुनि विरहाचें ऊनही विलोल;
आसवांचें जल सदा मिळत राहे,
प्रीतिलतिका जगतांत वाढताहे.

तसेंच सुशीलेच्या मध्यमावस्थेचें हें वर्णन पहा—

यौवनाच्या देहलीवरी राहे.
उभी कन्या, आंत हो कास पाहे!
किती किल्ले ते नवे नवे बांधी,
किती कार्यें कल्पनाबळें साधी.
कंठि बाल्याच्या ठेवुनियां हात
फिरे रमणी तारुण्यकाननांत.

किंवा एका अमेरिकन मुलीचें पुढील वर्णन पहा—

वाटे उषाच हसते फिरते जगांत,
कीं स्फूर्ति हीच कविची मधुरूप घेत;
अव्याजता रसिकता जणुं मूल झाली
स्वर्गांतुनी सहज भूवरि आज आली

'माझ्या जन्मभूमीचें नांव,' हें याच दृष्टीनें वाचण्यासारखें आहे. विशेषतः खालील कडवें मला फार आवडलें—

तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी—
झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी
आई गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें! यांत शंका न कांही जरी,
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी तसें पाहिलें मीं न कोठें तरी!

'प्रेमळपणा' विषयींचेहि उतारे असेच पुष्कळ देतां येतील.

माय माझी भेटेल मला जेव्हां । आसवांनीं न्हाणील मला तेव्हां;
मुका बाबा घेतील कपोलांचा, । हसुन दादा घेईल गालगुच्चा.
ताइमाई सारूनि दुरी खेळ । धावुनीयां मज मिठ्या मारितील;

या शब्दांत प्रेमळपणा किती सांठविला आहे! 'सृष्टीची भाऊबीज' हें काव्यहि याच दृष्टीनें वाचनीय आहे.

पण केवळ सोपी भाषा आणि प्रेमळ आलाप एवढीच काय ती टिळकांची सामुग्री आहे, असें नाहीं. त्यांची कविता अर्थपूर्ण असते आणि तो अर्थहि गंभीर व बोधप्रद असाच असतो. कवितेंत प्रेमळपणा असूनहि कवीची प्रेमविषयक कल्पना काय आहे हा प्रश्न उपस्थित होण्यासारखा असतोच; पण या प्रश्नाचें टिळकांनीं आपल्या कवितांतून ठिकठिकाणीं, विशेषतः 'सुशीला' या कवितेंत जें उत्तर दिलें आहे, तें कोणासहि पटण्यासारखें आहे —

रूपयौवन हें काम्य, परी प्रीति । न गे यांवर निज जीव सांवरीती!
शुक्ति नलगे मज हवें खरें मोतीं! । रूप नलगे मज, हवी तुझी प्रीति.
पात्र सोन्याचें असो मृत्तिकेचें । वेड मजला आंतल्या अमृताचें.

सर्व प्रेमाचें अधिष्ठान जें गृहसौख्य त्या गृहसौख्याचें टिळकांचें खालील वर्णन किती उज्ज्वल व आल्हादकारक आहे पहा —

भिन्न मूर्तींमधि चित्त एक जेथें । भोगि दुःखातें अनुभवी सुखातें;
स्वर्ग वाटे हा मर्त्यलोक जेथें । जगीं उपमा कोणती त्या गृहातें?
मनाच्या ज्या अत्युच्च रम्य वृत्ति । अंकुरित त्या होवोनि वाढताती;
फुलें, सुफळें येतात त्यांस जेथें । जगीं उपमा कोणती त्या गृहातें?
वीर, पंडित, कवि, संत, सती यांला । सिद्ध करुनी जें देसते जगाला;
सर्व संसृतिचें मूळ नांव ज्यातें । जगीं उपमा कोणती त्या गृहातें?

स्त्री हा महारथी व पति हा तिचा सारथी, या उपमेंत कल्पनांची किंचित् उलटापालट झालेली दिसते; पण स्त्रीपणा म्हणजे निष्क्रिय असा लिबलिबितपणा ही कल्पना निर्मूल करण्यास टिळकांची 'महारथी' ही कविता बरीच उपयोगी पडेल —

'तुला मृदुविशेषणीं कवि सदैव संबोधिती,
म्हणून दिसतें मला तवहि भीरु झाली मति;
पुरे ! त्यजुनि मोह हा समजुनी स्वरूपा निजा
स्वकार्यरत हो बघूं अनुग सारथी मी तुझा'

या श्लोकांतील प्रमेय स्त्रियांना कर्मयोग शिकविण्यास उपयोगीं पडण्यासारखें आहे.

टिळकांच्या कवितेंतील करुणरसाचे मासले 'बापाचे अश्रु' या कवितेंत जागजागीं आढळतात. तसेंच 'केवढें हें क्रौर्य' ही सर्व कविताहि करुणरसाच्या दृष्टीनें मला फार आवडली.

कल्पनेच्या दृष्टीनें कदाचित् एक म्हणतां येईल; तें असें, कीं टिळक पूर्वकविसंकेतांच्या पलीकडे फारसे जात नाहींत; निदान त्यांना कल्पनान्तरिक्षांत धाडसी भराऱ्या मारणें फारसें आवडत नाहीं. तथापि, नेहमींच्याच उपमा किंवा दृष्टान्त किंवा दाखले ते इतक्या गोड शब्दांनीं देतात कीं त्या आनंदांत उपमा पूर्वीं कधीं ऐकलेल्या आहेत कीं नाहीं, याची छाननी करण्याचें भानच वाचकास राहत नाहीं. याचें उदाहरण 'माझी ताई' ही कविता होय. या लहानशा कवितेंतील प्रसाद, प्रेमळ काव्यकल्पना वगैरे टिळकांच्या कवितेंतील सगळे गुण एकत्र झाले आहेत, असा भास होतो.

'अमुचे तिंबूनाना,' या मथळ्यावरून कदाचित् कोणाला ही कविता विनोदात्मक असावी असें वाटण्यासारखें आहे. परंतु विनोद हा कवीला फारसा संमत किंवा प्रिय असावा, असें दिसत नाहीं, कारण, सदर

कविता वाचतांना पावलोपावलीं असें आढळतें कीं, विनोदात्मक छटा येते न येते तों कवि एकदम गंभीर होतो व विनोदाची लहरी विरून जाते.

असो. याहून अधिक उतारे किंवा उदाहरणें देणें म्हणजे बाजारांत आंबे खरेदी करण्यास जाणारानें मासला पहातां पहातां राशींतले सगळेच आंबे स्वत: कापून खाण्यासारखें होईल. याकरितां मी वाचकांस आतां अधिक गुंतवीत नाहीं.

कवि या नात्यानें टिळकांचा दर्जा पुष्कळच उंच आहे यांत शंका नाहीं. तथापि, त्यांस 'पश्चिम हिंदुस्थानचे रवींद्रनाथ टागोर' असें जें कित्येकांनीं नांव दिलें आहे, त्याला माझी विशेष हरकत इतकीच आहे कीं, रवींद्रनाथ यांच्या कवितेंतील अवघड किंवा अपरिचित अशी शब्द-रचना टिळकांच्या कवितेंत नाहीं आणि टागोरबाबूंच्या काव्यांतील शून्यसंशोधनाची प्रवृत्ति तर नाहींच नाहीं.

मराठी कवि या नात्यानें टिळकांची इंग्रज लोकांत फार प्रसिद्धि आहे, ही गोष्ट मात्र टागोरबाबूंची उपमा टिळकांना देण्यास साधर्म्यसंबंध म्हणून उपयोगीं पडण्यासारखी दिसते. या त्यांच्या प्रसिद्धीनेंच, मला वाटतें, परवां एका विलायतेंतील पत्राच्या हातून मोठ्या मौजेची चुकी झाली. कारण, त्यानें लो. बाळ गंगाधर टिळक यांच्या विषयीं लिहितांना 'गीतारहस्य' नांवाचा काव्यग्रंथ त्यांनीं केला असल्याचें विधान केलें आहे!!

असो. शेवटीं श्रीयुत टिळकांचे हातून अशीच काव्यरचना आणखी-हि पुष्कळ वर्षे होवो व मराठी वाङ्मयांत चांगली भर पडो अशी इच्छा व्यक्त करून हा उपोद्घातलेख संपवितों.

पुणें, ता. १ डिसेंबर, १९१४ नरसिंह चिंतामण केळकर

## १ कवि आणि रसज्ञ

दृष्टीविना दृश्य करील काय?
चैतन्य जें त्याविण रम्य काय!
रसज्ञहो! काय तुम्हाविना मी
करूं जगीं घेउन काव्य नामी?

कमला रवि, चन्द्र चंन्द्रकान्ता,
जल मीनाप्रति, वाक्प्रवाह अर्था,
कवितेस रसज्ञता; न झालीं—
क्षणही हीं कधिं युग्मकें निराळीं!

फुललें नवकाव्यपुष्प बोले
रसिकाला, विरहें विषण्ण झालें *
'कर जा तुजला रुचेल जें तें,
परि ये ये! मज तोड! ने गृहातें!

नच भीं, परि सिद्ध कृन्तनातें †
लतिकेचें विसरून सर्व नातें;
न असें, तरि तीं रसें विहीन
फुललेली कृतका ‡ कळी सुदीन!

★

## २ : कवीची विनवणी

[चाल : त्रिखंड हिंडुनि धुंडितसें० ]

पहा! उघाडिलें हृदयाला, । यांत सुखें घाला भाला!

कोमल, कौशल्यें नटला ¶ । कर तुमचा जरि किति असला,
तरी तयानें । माझीं कवनें । जरा स्पर्शणें ।
सहन न होणें कांधिं मजला! । याहुन जीव बरा गेला!

कारण, कवनें नच माझीं, नच तुमचीं, मी गातों जीं;
हीं निःश्वसितें । कोण सोडितें । मम हृदयीं, तें— ।
विचारुनी, भिउनी त्याला । पुढें करा मग कर अपुला.

रंग नभाचे कसे तरी, । कसे तरी ही मजा खरी
किती आपुलीं । फुलें उमललीं, । कुठें लकटलीं, ।
चिन्ता नच ही वेलीला, । सुन्दरतेची ही लीला!

वंदा, निंदा! परि दुरुनी! । पवित्र ही कवितारमणी;
हात जोडितों, । पदर पसरितों, । दन्तीं धरितों— ।
तृण, चुम्बीतों । चरणाला! । नका शिवूं मम कवनाला!

---

* झालेलें. † तोडलें जाण्याला. ‡ कृत्रिम. ¶ नटलेला.

## ३ : कवि

न कळे कोठुन होते लतिकेच्या ठायिं पुष्पपरिपूर्ति,
न कळे केव्हां कैशी होते कविच्या मनाप्रति स्फूर्ति.
न कळे कोठुन येती द्विजराज नवे वसंतकालीं ते,
न कळे कोठुन येती धावत नव शब्द भेटण्या कवितें.
न कळे कोठुन येते शोभा द्यायास हास्य अधराला,
न कळे कोठुन येतो प्रसाद कविच्या नवीन काव्याला.
तारांगणिं कवि खेळे, चन्द्रासह करि विनोदहास्यातें,
वाणी प्रेमानंदें चुंबी त्याच्या प्रसन्न आस्यातें.
बोलति फुलें तयासह, पक्षी करिती अनेक गुजगोष्टी,
'ये काढ चित्र माझें'—सांगे त्या कापरूपिणी सृष्टी.
येतां पूर नदीला थांबे तो काय दोन हातांना ?
ऐसा कोण म्हणे जो थांब कवीला स्वकाव्य गातांना !
आलाप कोकिलाचे इतुक्या कालांत जाहले इतुके,
निर्झरगान गणावें कोणीं वर्षांत जाहलें तितुकें.
घटपट खटपट झटपट ऐसा उगाच शब्दांतें *
जुळवाया कवि न, परी नरकपि खर्ची अमूल्य अब्दांतें †
वर देवदूत बसले कविहृदयाच्या धरून कीलांतें ‡
नाचविती करवीती कविवाणीच्या कडून लीलांतें.
याचा गर्व कशाला ? बोलविता तो धनी निराळा हा !
कविच्या द्वारा रसिकां काव्यरसाचा करून दे लाहो. ¶

---

* अन्वयः घटपट खटपट झटपट ऐशा शब्दांतें उगाच जुळवाया कवि अमूल्य अब्दांतें न खर्ची परी नरकपि (उगाच शब्दचमत्कारांच्या कर्मचेष्टा करणारा कविब्रुव) खर्ची. † वर्षातें ‡ खुंटी (सतारीच्या तारांची), कळ. ¶ लाभ.

## ४ : 'तुम्हि कवी भिकारिण मी हो तुमच्या दारीं!' असें म्हणारीस —

प्रसाद आहे, प्रतिभाहि आहे,
प्रेमौघ गानांतुन नित्य वाहे;
निगूढ सारें दिसतें, परंतु
येईल बाहेर! घरीं न किन्तु.

प्रकाश तिमिरांतुनी हळुहळु पुढें धावतो,
प्रसन्नपण लोक हा निरखुनी जया पावतो;*
म्हणे सकलिकां 'उठा!' हृदय तो तुझें व्यापितो,
खरोखरच तूं उषा! दिन तुझ्यापुढें खेळतो!

अजून हृदयींच जी लपवुनी धरो चारुता,
हसे खदखदां न, जी करि परन्तु मन्दस्मिता;
न ठाऊक अलींप्रति उमलण्या जरी लागली
सुरम्य कळी तीच तूं! सरसता तुझ्या पावलीं!

भरी श्वसन वाग्वधू मुरलिमाजि जें, तें जगा
क्षणांत भुलवील गे! मम न बोल हा वाउगा;
खरीच कवयित्री तूं! हृदयिं गे तुझ्या गायनें
सदैव भरली सती! जरि न आयकीलीं जनें.

कवीश म्हणशी मला, म्हण खुशाल तूं कौतुकें!
तुझी अनुरती पतीप्रति म्हणेल तें तें निकें †!
असंस्कृत, परन्तु तूं अतुल रत्न मीं जाणिलें!
नको नवल मानुं कीं तुज यथेच्छ वाखाणिलें!

---

* अन्वयः जया निरखुनी हा लोक प्रसन्नपण पावतो. † खरें.

## ५ : कवीचें उद्यान

[ चाल : त्रिखंड हिंडुनि धुंडितसे. ]

स्वर्गी जाऊन पहा बरें, । सांगा येउन मात्र खरें !
कविच्या उद्यानाऐसें ! । नंदनवन तरी काय दिसे ?
मधु गंधाचें, । मधुर रसाचें, । सुंदरतेचें, ।
निधान हें विश्रमाचें । सुखशांतीचें प्रेमाचें !

२

जगीं जरी ठायींठायीं । पायधूळ झाडुन येई,
तरी शारदा आनंदी, । इथें रमे वीणानादीं;
हा ब्रह्म्याचा, । हा विष्णूचा । हा शर्वाचा
लोक, पुराणें वदताती । इथें शारदा परि वसती * !

३

कल्पतरू मोठा म्हणती, । देवासम त्या पूजीती,
करील का तो कधीं तरी । भावतरूची बरोबरी
सृष्टिंत नाही । जें, तें देई; । प्रसन्न राही ।
सदैव हा ! नलगे पूजा; । पुसा कवीच्या वृत्तिस,–जा !

४

हा इकडे अनुरागतरु, । वर्णन याचें केविं करूं !
गोड फळें याचीं अमृता । करितिल हो चोथा नुसता !
छाया याची । जननी साची । शमदम यांची, !
भवतापाची मधु मात्रा, । व्यर्थ भैषजें † जगिं सत्रा !

५

जागजागीं पुतळे दिसती, । तक्षणपाटवसीमा ‡ ती !
हरिती विषयान्तरमनना, § ! अपणांसम करिती नयनां !
ही हास्याची, । ही अश्रूंची, । ही दोहींची ! ।
तीन वल्लरी पाहुन घ्या ! । जगीं अशा नसती अवघ्या ! ।

---

* वसते. † औषधें. ‡ तासकामाच्या ( दगड तासण्याच्या कामाच्या ) चातुर्याची पराकाष्ठा. § अन्य विषयांचें चिंतन.

६

स्वयें शारदा जीवरती । लुब्ध रस अशी संपत्ति
ज्यांत सांठली, पाट दहा । ते या उद्यानांत पहा !
भिन्न वनस्पति, । भिन्न यांप्रति । रस अर्पीती; ।
असे पाट कोठें दुसरे ? । उपवन कविचें थोर खरें !

७

हीं कारंजीं किति उडतीं । 'स्फुरणें' यांना कवि म्हणती;
केलें मिश्रित रंगांनीं । भिन्न भिन्न यांचें पाणी ।
म्हणाल कोणी । 'द्रव्य कुठोनी । निर्धन आणी ।
कवी !' तरी लक्ष्यांत धरा । धनी कवसिम नच दुसरा !

८

स्वर्गी लभ्य न अमरांला ! । कशास पुसणें भूपालां ?
असलीं झाडें कवि आणी, । लावी अपुल्या उद्यानीं !
पक्षी गाती, । मोर नाचती, । मत्स्य खेळती, ।
विनादेनामक कासारीं, । स्वर्गांतील येथें वारी ! *

९

पुन्हा एकदा म्हणतों मी– । जरी कुणी दर्शनकामी †
त्यानें तरि येथें यावें । सुखें शारदे भेटावें !
पावुन तुष्टि, ‡ । ही नव सृष्टि । कविच्यासाठीं ।
हिनें निर्मिली; मंदिर हें । अपुलें मानिं गाणिलें आहे !

## गुच्छ दुसरा — वनवासी फूल

मनांत किंवा जनांत किंवा वनांत सृष्टिसतीचा
मित्र खरा, जो निधीच केवळ निष्कामप्रीतीचा;
सदा कौतुका करी तियेच्या, बाप जसें कन्येचें,
दिसो कशीहि, गोड करोनी दावी रूप तियेचें
कामरूपिणी सृष्टी ज्याच्या पुढतीं लाजत नाही,
सदा हांसते तोष पावुनी ज्याच्या मधुवचनांहीं;
शास्त्रज्ञांच्या, तत्त्वज्ञांच्या पलीकडे संचार
दिक्कालानें अप्रतिहत तो ज्याच्या स्वैरविहार;

---

* पाणी. † दर्शनेच्छु. ‡ संतोष.

सप्त लोक, वा सप्तशत म्हणा,—सारे सांठविलेलें
अन्तःसृष्टीमधें जयाच्या, तेथुन उदया आले !
आजउद्या हे भेद न ज्याच्या दिव्य विचारोच्चारां,
परमेशानें स्वयें निर्मिला सर्वरसांचा धारा;
जसे वसन्ता नवे नवे द्विज तैसे नित्य जयाला
वाग्देवीचे दूत शब्द हो आतुर सेवायाला
विचारसागर, रम्य कल्पनालहरी उसळति जेथें,
अनर्घ्य निर्मल, वाङ्मुक्तांस्तव मोहक ज्यातें त्यातें
असा एक कवि, देहीं ज्याच्या चैतन्यासह कविता,
निर्जन रानीं सहज एकला पावें फिरतां फिरतां

*          *          *

तेथें पाही फूल नवें—जें कधिं न पाहिलें पूर्वी;
वदे कवी, कीं, 'धन्य जहाली याच्यायोगें उर्वी !'
जनांत किंवा वनांत किंवा नभांत सुमनें सारीं.
पायांखालीं फुलेंच सारीं, कमलें हृत्कासारीं.
मुलें म्हणा, वा फुलें म्हणा, वा नक्षत्रें, मणिराशी,
म्हणा भावना, नांवें योजा जयास रुचती तैशीं !
परंतु कविचीं फुलेंच अवघीं ! या अवघ्यांची माला
कविच्या हृदयीं रुळे सर्वदा ! सदा रञ्जवी त्याला !
जिकडे तिकडे फुलें, सुगन्धें विश्व कोंदुनी गेलें,
कविरायाला नन्दनवन हें जग अवघें झालेलें !
वन्य फुला त्या बघुनी परि तो वेडावुन कवि गेला,
इतर विषय विसरला पुरा तो क्षणांत तन्मय झाला.

*          *          *

निर्झर धरितो ताल, धरीतो सूर वंश, पिक गातो—
काव्यें कविचीं, उत्साहें बहु केकी नर्तन करितो !
जड इतरांना मुग्ध वाटती पदार्थ, देही* ते ते
मित्र, बोलके कविचे अवघे परसुखाचे दाते !

---

* देहधारी.

कोण असा जो दर्शन कविचें घडतां हासत नाही !
बोलत नाही ? डोलत नाही ? प्रेमें नाचत नाही ?
गाती पक्षी, कविगानांचें प्रत्युत्तर मधु देती,
वृक्षलतांची श्रेणी वाणी त्यांसह गोड वदे ती.
जातां जातां झरा कवीला पाहुन कुशल विचारी;
फार कशाला ? तृणें तयासह रमती दीन बिचारीं !

* * *

असो; पाहुनी येतां जवळीं कविला सुम तें बोले—
'या, कविराया ! ' क्षणामधे तें घरचें जैसें झालें !
व्याज न जेथें, नसे वक्रता, उपचारांची पीडा,
स्वभाव ऐसा विदित जगीं जो ग्राम्य, वन्य, वा वेडा !
दैवी परि हा स्वभाव लाधे देवद्यनें मात्र,
नाही जगतीं यामस दुसरें कांहीं वन्दनपात्र ,
वन्य सुमें त्या निजस्वभावा अनुसरुनी त्या कविचें
स्वागत केलें, कळें न हरिलें आपण चित्त तयाचें !
' आलों, आलों ! ' म्हणत कवीश्वर अत्युत्कण्ठित जाय
हात पसरुनी, आत्मसंयमीं झाला क्षणोपाय !
परन्तु, सुम तें तया भासलें दचकुन सरलें दूरी !
मनीं खोंचला ! कीं,—ऐसें तें रसिकवरा धिक्कारी !
पुन्हा म्हणे, कीं, ' स्वागत केलें किती आदरें माझें !
सुशील सुम हें; परि माझें मज वर्तन मुळीं न साजे !
प्रथमदर्शनीं हात पसरुनी धावत पुढती गेलों,
फुला ! तुझा नच दोष ! मीच रे पुरता वेडा झालों ! '
दोषांचेही गुण करणारें प्रेम, तयाचा भेला
कवि तो कोठुन दोषायाला प्रियकर वन्य फुलाला !
जाता तेथुन तसाच परतुन,—अरसिक जरि तो होता,
परि त्या रसिका कोठुन कळणें मानखण्डना आतां !

* असता

उलट तयाचा प्रेमा वाढे अनल जसा अनिलानें;
अधिक तयाला जवळ ओढिलें सुमनें धिक्कारानें !

*　　　　*　　　　*

पुन्हा पुष्प तें हासुन वदलें ' बसा, दुरूनी बोला !
योग्य न शिवणें,—जगदीशाला अर्पित झालें,—त्याला !
दो दिवसांचें जीवित माझें दिधलें मीं परमेशा,
घ्यावें त्याला आहें तोंवर, अन्य नसे मज आशा !
मला समजलें, रसज्ञ आपण मित्र फुलांचे, लोकीं
यास्तव अपुलें स्वागत केलें श्रम आपणां दिधले, कीं
कवीश आपण, ओळाखिलें कीं भक्तिरसाचे सिन्धु !
वनवासी मी द्या मज दीना दोनचार तरि बिन्दु !
बसा घडीभर, परमात्म्याला आपण दोघें गाऊं,
भक्तिरसाचें अनुपम, रुचिकर, बलकर भोजन सेवूं.
याहुन दुसऱ्या आतिथ्याची कल्पना नको येथें,
मान्य करुन घ्या कृपा करोनी या दीना साधें तें ! '

*　　　　*　　　　*

प्रेमोर्मी मधु, असंख्य, मृदु मृदु, कविच्या हृदयीं उठती,
नयनीं, गालीं, अधरीं येउन हळूच त्या आदळती.
प्रेमयोगनिद्रेच्या घेई क्षणैक तो उपभोगा,
दचकुनि किंचित् पुन्हा जहाला स्वयें कवीश्वर जागा.
हांसुन बोले त्या सुमनाला ' पवित्र जगिं तूं साचें !
वैराग्याचें निधान दिसशी मजला भक्तिरसाचें !
परन्तु जातें वनांत तव हें यौवन मित्रा वांया,
ज्ञाते म्हणती जन साधन हो पुरुषार्था साधाया.
निर्जन रानीं जेथें न दिसे एक सख्या ! फुलझाड,
उच्च शाल्मली, देवदारु, वट, पिंपळ, दिसती ताड.

तुझ्या भोंवतीं क्षुद्र वनस्पति माजुन तुज नाहींसें
करावयाला झटती,—गगनीं नक्षत्रा घन जैसे
कधीं न येथें आला वाटे भ्रमर फुलांचा भोक्ता,
मजविण इतर न तुला भेटला दिसे गुणांचा ज्ञाता !
तूं येथें हें कुणा न ठावें, नाहीतर भ्रमरांच्या
झुंडी येत्या धावत कविच्या स्वर्गांतुन रसिकांच्या !
सर्व अप्सरा, किन्नर सारे धावुन येथें येते,
सख्या फुला ! तुजमुळें हाच रे दुसरा स्वर्ग करीते !
कोमलता ही, रङ्ग तुझा हा, हास्य तुझें हें नामी,
सौरभ तव हा, पुरे ! मज सर्वें चल सखया आरामीं ! '

* * *

' उद्यानीं मम नाश निश्चयें !' म्हणे कवलि फूल
' वयें तरुण तूं परी अनुभवें दिसशी अजाण मूल ! '
वन्य पुष्प तें निःस्पृह पुरतें जगास सोडुन बसलें,
नवल तशाचें त्या मान्याला अवमानुन जरि बोले ?
' आपण ' सुचवी प्रथमदर्शना, ' तुम्ही ' परिचयालागीं,
' तूं ' सुचवीतें दोघें झाल्यीं पूर्णपणें अनुरागी !
कळो फुलाला, न कळो अथवा, तथापि हा क्रम साचा
ओळखुनी, कविहृदय घे नवा अनुभव उल्हासाचा.
पुन्हा म्हणे सुम, ' सारा स्वार्थी मर्त्यलोक हा आहे !
दर्शन राहो दूरच ! याचें नांव न मजला साहे !
थर थर थर थर पंख कांपती, उरलें नाहीं भान
पुष्पीं रत मधुपास भासतें पुष्पच पञ्चप्राण !
स्वार्थाचे हे अवघे चाळे ! अमुची वेडी जात !
भ्रमराचें मज नको पहाया मुख साऱ्या जन्मांत !
ज्या ज्या सुमनीं रमेल तें तें तितुक्यापुरतें त्याचा
जीवन ! परि हें प्रेम न; सगळा लोभ नवीन रसाचा !

नित्य करावें पुढें पुढें मधु गाणें गावें, न्यावें--
लुटून सुरसा, परी शेवटीं ओळख विसरुन जावें!
कोण अशाच्या पाशामध्ये पडेल सांग शहाणें?
योगी म्हणतीं यास्तव कीं, “ सुख दूर वनांत राहणें !”
भ्रमर एकला मात्र नीच नच, परि जग सारे नीचि !
निश्चय झाला मम, कीं जगतीं निवास ही हानीच !
फळें तोंवरी द्विजरायांचें गायन चाले वृक्षीं !
सारतां तीं परि, परके होती वृक्ष आणखी पक्षी !
कार्य साधितो तोंवर मिळतीं आशीर्वाद घनाला,
थोडा चुकतां शिव्याशाप मग नकोनकोसे त्याला
“ शितें तोंवरी भुतें भोंवतीं ” म्हण ही साची भारी,
परि अनुभूती सकल बुवांची हींत ओतिली सारी !
जगीं चहुंकडे स्वार्थ, नीचता, मूर्खपणा, अभिमान !
हार म्हणोनी सापासाठीं कोण पुढें करि मान ?

*       *       *

उषा आणि मी परस्परांना बघतां सस्मित होतों,
या प्रेमाचा अनुभव जगतीं कोठुन दुसरा हो तो !
दर्शन माझें हाच लाभ तिज, तद्दर्शन मज लाभ,
कधिं न ठाऊका स्वार्थें केला अमुचा चित्तक्षोभ.
कोठें दिनकर, दीन कुसुम मी कोठें ! तरि कुरवाळी—
सर्व उग्रता सोडुन, मजला कन्येसम सांभाळी !
दिशादिशांना सौरभ माझा वाहुनि वारा नेतो,
नको नको मी म्हणतां कुतुकें यश माझें पसरीतो !
वृष्टिही हिममिषें मनोहर नव मोत्यांची जाळी
घाली मजवर ! सजवी मजला ! माय तशी प्रतिपाळी !
सोडुन असले मित्र निधी हे निष्कामप्रेमाचे
धूळ जगाची माथां घेणें कोण म्हणे कामाचें ?

गायन ऐकुन तुझें वाटलें ज्ञाता तूं कविराज,
परी जगासम तूंही मोहित, मोहक समजे आज !
सुन्दर विषफल दिसे वरोनी,–जग हें केवळ तैसें !
तुज विषकृमिला पीयूषाचें निधान फल हें भासे !
जा ! जा ! जा ! जा ! जा रम जगतीं, उद्यानीं वा सदनीं !
बुद्धिभेद मम करूं नको रे असल्या मोहक वचनीं !'

*                    *                    *

विस्मित होउन उगाच कवि तो फुलाकडे त्या पाही,
जेथें प्रीती, तेथें आशा, क्षमा सर्वदा राही.
'काल जन्मल्या या पुष्पाला अनुभव काय जगाचा ?
आयकिलें तें खरें समजुनी बोले असली वाचा.
रागावांचुन संभव कोठुन वैराग्याचा झाला ?
काय उपजतां जग हें वाइट दिसलें या पुष्पाला ?
नैसर्गिक ही बुद्धी असली कुठेंच जगतीं नाही,
स्वर्ग जगाला गणिती बाळें मानुष इतरें पाहीं !
अनुभव या सुमनानें कथिले पुष्कळ परि ते सारे
इतरांचे; नच याचे; हें तों अनुभवहीन विचारें !
दीर्घद्वेषी या सृष्टीचा कोण असा आराति*
यास भेटला अपकारप्रिय, अरसिक, निर्दय कुमति !'
प्रश्न असे निजमना विचारी, परन्तु नच पुष्पाला;
कोमल फुल तें प्रत्याघाता योग्य न, ठाउक त्याला.
मानसशास्त्री पूर्णविशारद सहज कवीची जाति
कुसुमांवरती तशांत त्याची अमोघ, विमल प्रीति.

*                    *                    *

सस्मित होउन पुनरपि बोले मञ्जुळ वचनीं सूरी, †
त्या सुमनाचें कठिण सर्वथा रुसलेलें मन हारी.
न लगे व्हाया बुद्धिभेद, हा पुरवे येथुन गेला,
म्हणे पुष्प मन; तेंच भुकेलें तद्वच ऐकायाला !

---

* शत्रु † कवि.

'नको नको !' त्रासून म्हणावें; परन्तु घ्यावें द्यावें;
हें प्रेमाचें लक्षण नाही कुणा प्रेमला ठावें ?
म्हणा कवीला जा येथोनी, हांकलून द्या पाहूं,
करा प्रतिज्ञा तद्वचनांना होउन बहिरे राहूं !
तरी तयाच्या वाणसािठीं केवळ वेडे व्हाल !
बघाल नच मुख ज्याचें त्याच्या खुशाल मागें जाल !
प्रभाव ऐसा कविवाणीचा, तेथें फूल बिचारें
काय करिल तें ? ऐकुन घेई कविचें भाषण सारें.

*　　　*　　　*

म्हणे कवी 'तूं मीही होइन विशीर्ण एके दिवशीं,
निवास येथील विवास केवळ सुमना तुजशीं मजशीं !
तथापि जगता परकें व्हावें, जाउन दूर रहावें,
या शीलाला कसें कळेना सज्जनशील गणावें ?
भ्याडपणाचा, स्वार्थाचा वा परमावधि हा होय;
अशा नराचा मृताहुनहि मृत झालेला काय !
क्षणभुंगुर वय त्यांत फुला ! हें यौवन दो निमिषांचें,
एकवार तनु वाळुन जातां धरेस ओझें हीचें !
वृक्षलतादिक परोपकारास्तव येती जन्माला;
नद्या वहाती; अम्बुद गळती सुख द्याया लोकांना.
कृतघ्न हें जग, जें तें स्वार्थी, यांत न शंका कांहीं !
परन्तु तेणें प्रीतिकरांची प्रीती सरली नाही.
ताडन, घर्षण, अग्निनिवेशन यांना स्वर्ग न भ्याले,
परन्तु यांहीं तेज तयाचें जगांत मान्य जहालें !
जों जों होई छिन्न छिन्न तों मधुर मधुर हो ऊस,
शिव्याशापही साहुन जगती फलद करी पाऊस.
शरीर झिजवुन चंदन देतो परदेहाला शान्ति,
स्वयें सोसुनी ताप तरूत्तम दे इतरा विश्रान्ति !

कधिं दगडांच्या, कधिं काष्ठाच्या, कधिं शस्त्राच्या मारा –
सोसुन तरुवर देई इतरां अपुल्या मधुफलभारा !
फार कशाला ? अन्यहितास्तव खांडें खांडें होतां
निजदेहाची तीच धन्यता वाटे तरुच्या चित्ता !
तीं खांडें जरि अग्नींत गेलीं तरी तयाला काय ?
"शीत निवारी परक्याचें हा धन्य" म्हणे तरु "काय!"
भूगर्भस्थित हीरक सोडुन निवास बाहिर यावा,
स्वार्थिजनाच्या करांत जावा शाणोल्लीढहि* व्हावा,
कधीं कुधीच्या, कधीं सुधीच्या हातामध्यें यावा,
परन्तु त्याला नित्य घडावी जगामध्यें जनसेवा;
याविण त्याच्या त्या कान्तींचा हेतु न दुसरा कांहीं !
परमेशाचा नियम हा असा अभेद्य विश्वीं पाहीं.

* * *

'तुझी प्रियसखी उषा तियेला विचार पुष्पा, जा जा !
परोपकारा सोडुन करिते अन्य कोणत्या काजा ?
तुझ्याकडे ती मात्र पाहुनी हसते, तुज हसवीते
असे न; जगता उद्बोधित ती करिते, प्रसन्न करिते.
दिनकर, सुमना ! तुझाच केवळ नाही, परि जगताचा;
तुला न ठावें वियोग पळभर नाहि, जगाचा त्याचा !
नित्य सेवितो जगास तेणें विसरुन तत्कर्त्याला
किती वन्दिती, किती मानिती जगदीश्वरही त्याला !
स्तुत्य खरी निष्कामप्रीती अनिलाची तुजवरती,
परन्तु वांटेकरीण हीची सुमना ! अवघी जगती.
जननी सृष्टि तुझी न केवळ, अमुची परि सर्वांची;
जगास सोडुन बसली नाहीं यांत मती एकाची.
तुला सांगतों, प्रिया प्रसूना † म्हणशी तूं जी भक्ति,
भक्ति न ती रे, परि परमेशीं स्वार्थास्तव आसक्ति !
जगदीशाच्या निन्दुन कृतिला स्तोत्रें त्याला गावीं,

* सहाणेवर घासलेला † फुला.

निर्दय होउन त्या सद्याची पदवी * जवळ करावी;
कोण म्हणे ही भक्ती! किंवा उपासना ही कसली?
जगच्चालका कशी आवडे मती जगावर रुसली? †
चल जगतीं तूं रम उद्यानीं, भिऊं नको जगताला,
सेव जनांला, तेणें होशिल मान्य फुला देवाला.

*　　　　*　　　　*

'तुला पाहुनी-स्मरुनी विरही विरहिणिच्या गालाला
तुझेंच सुमना घेईल चुम्बन! नको निवारूं त्याला.
ऐकुनियां तें सखी तयाची होइल वश कोपातें,
तोडिल तुजला, वाहिल वेणी-काल-सर्पिणीला ते ‡
भिऊं नको! ती नागिणही तुज सुमना! वश होईल;
भूषणसम तुज नित्य आपुल्या फणेवरी वाहील!
तूं न जाणशिल तुझ्यामुळें तिज नवीन आली शोभा,
जपेल ती तुज परन्तु ¶ लोभी जैसा अलभ्य लाभा.
तुझ्याभोंवतीं नर्तन करुनी स्तावितिल तुज अलि, कुसुमा!
परिवर्धित ते करितिल तव ही अनुपम अभिनव सुषमा.

*　　　　*　　　　*

गुञ्जारव करितील, कवी ते सूर धरुन गातील,
रसाळ, सुन्दर नवीन काव्यें रसिकजनां देतील.
पुष्पशरासन § इतरां सोडुन धरील तुजला हातीं,
विरक्तिला तो जिंकुन राज्यीं स्थापिल मधु अनुरक्ति!
नवकुसुमासम अङ्गकान्तिनें, परि हृदयानें हीन,
जिच्या अनुनयीं कुणी जहाला पुरुषमणी अति दीन,
हताश होउन तुला फुला! तो तिच्याकडे धाडील,

---

* स्थान † रुसलेली. ‡ ती. ¶ ....तूं न जाणशिल परंतु ......ती तुज जपेल. § पुष्पधन्वा, मदन.

विश्वासें, कीं तूंच शेवटीं विजयश्री वरिशील !
फुला ! खरोखर तव सहवासें हृदय तिला येईल
प्रेमळ, कोमल, निर्मळ, धरिते* पूर्णपणें तव शील.
प्रियास देईल नवें हृदय तें परत तुला देतां ती,
लहान नाही सख्या फुला या परोपकृतिची महती !

*　　　　*　　　　*

' जन्मभूमिच्या विभवरक्षणीं अर्पित देह सदाचा,
तुला अर्पुनी करितिल कोणी मान अशा वीराचा.
क्षतें तनूवर धरी भूषणें, दिसतो बहु विकराल,
तुझ्यापुढें परि तुजसम होईल तोच† विपक्षा† काल ! †

*　　　　*　　　　*

' नेउन तुजला कुणी दुःखिता देतिल कुसुमवरा रे !
कीं सहवासें तुझ्या हरावें दुःख तयाचें सारें.
बालरवीचीं किरणें जैशीं तमास करिती दूरी,
सहजास्मित तव तशीच त्याची हरील चिन्ता सारी.
अश्रू म्हणजे शोकतरूचीं फुलें फुला ! तुज बघतां
लाजुन, जागीं थबकतील रे वेगें पडतां पडतां !

विलाप करितां मधेंच जननी फुला, तुला पाहोनी
" मूल　　मम " म्हणेल " अक्षय देवाच्या उद्यानीं. "
तूं शोकाचें भञ्जन‡ कुसुमा ! रञ्जन¶ मूर्त मनाचें,
तूं मोहाचें अञ्जन§ सुमना ! व्यञ्जन|| आनन्दाचें,
सोड, सोड वनवास, चल गडे लोकीं, हर शोकाला,
फुला, खरोखर होशिल सौख्यद लाभ सख्या लोकांला.

•　　　　*　　　　•

---

* धरणारें, धारण करणारें. † शत्रूला यम असणारा तोच ( वीर ) ‡ शोकाचा विसर पाडणारी वस्तु. ¶ करमणुक. § मोहाचा नाश करणारें औषधी द्रव्य. || चिन्हें, खुण.

'पण्डित करिती अखण्डितपणें मण्डित वाक्संसारा,
फुला ! चल गडे, कर कर आधीं त्यांच्या श्रमपरिहारा.
फुला ! तुझ्यासम काव्यस्फूर्ती कविंना देइ न कोणी,
न मीं गायिलीं इतरां कवणां जितकीं फुलांस गाणीं !
प्रेमल, सात्त्विक, पवित्र जितुकें त्याचें सूचक फूल,
मधुर, मधुरतर, असें न कोठें फुलावांचुनी शील !
फुला ! शारदा निजवीणेचा सूर लावुनी म्हणते
"गा, गा, कविंनो !" कवी करीती तुझी प्रतीक्षा नुसते.
अत्युक्ति ही नाही नाहीं, खरेंच तुजला कथितों;
इकडे बघतों फुलें पुढें मी, तिकडे काव्यें गातों !

* * *

"साधुजनाची पूजा करितां प्रथम फुलांचा मान;
साधुसङ्गती तरि महतींची चल पुष्पा तूं मान !
सज्जनसङ्गापुढें तुक्याला इतर सुखाची भुक्ति*
तुच्छ वाटली ! फार कशाला ? "न लगे" बोले, "मुक्ति !"
चिन्तामणिची, कल्पतरूची, कामदुघेची † महती
नाही नाही साधुसङ्गतीपुढें ! महात्मे वदती.
सुधा मुधा ‡ तोलणें जिसवें सत्सङ्गति ही ऐशी,
वनीं निर्जनीं परमसुखाची दात्री मिळेल कैशी ?
तुला नेउनी वाहतील रे साधुजनाच्या चरणीं;
घेइल परि तो करांत तेव्हां होउं नको अभिमानी !

* * *

'फुला ! असे तव होतिल लोकीं सदुपयोग बा नाना;
साधिशील तूं येउन जन्मा थोर थोर कार्यांना.
दैव तुझें परि खोटें, कीं, तूं रानीं जन्मा येशी,
कधिं न जाणशी इतरां सोडुन तूं अपुल्या मायेशी.
फुलल्यापासुन दिशादिशांना वाहुन तव यश नेई
वायु, परी बा फुला ! अजोनी उपभोक्ता तुज नाही.

---

* उपभोग. † कामधेनु. ‡ व्यर्थ.

स्यन्दमान* तव मरन्द† हृदयीं तुझिया वाळुन जाय,
सुरूप, सौरभ‡ दिक्कालार्पित, जन्म मोघ¶ तव हाय !
प्रकाशसृष्टी, चन्द्रकुमुदिनी, मेघधरा, तरुवेली
शोभतील का ? नांदतील का जरी निराळीं झालीं ?
तसेंच अपुलें जन्म आणखी सुमना ! जग तूं मान ;
चल मजसङ्गें दे, दे सोडुन आग्रह हें अज्ञान !'

*   *   *

परिसुनि वच हें पुष्प हासुनी वदलें 'बा कविराया !
ही माझी स्थिति पाहुन वरिशी शोक कशाला वायां ?
निवास माझा जनांत होता§ कारण अपकारांला,
थोडेंसें मी तुला सांगतें, मोज बघूं दे त्यांला.
मदीय गन्धें व्यापारांना असते जन विस्मरलें,
अनाघ्रात मम शरीर मग हें कोठुन असतें उरलें ?
विमल, दिव्य मधु सुमनें जितकीं त्यांचा रस शोषावा
याविण ज्यांना निजजन्माचा अन्य हेतु नच ठावा ;
माझ्या मोहें त्या भ्रमरांच्या कुळांत भांडण होतें,||
इतिहासज्ञां ठाउक आहे.–काय काय तें करितें.
माझ्या छन्दें फलद तरूंची करिता माळि उपेक्षा,
मींच रहावें गिरिकन्दरिं हें मज रुचतें त्यापेक्षा !
कोणा ठाउक सर्प भयङ्कर वेष्टुन मजला बसता,
उद्याना मम सहज आणिता मृत्युमुखाची समता.
विकास माझा पुरा न झाला, तोंच कुणीं अधिरानें
नेलें असतें मला खुडोनी लीलेनें अदयानें.
वृद्ध ब्राह्मण किंवा कोणी मजला घेउन जाता,
एक एक दळ माझें तोडुनी देवार्चन साधीता !
मम सौन्दर्या पाहुन मजला बुद्धिपुरःसर नेते,

---

* पाझरणारा. † मध ‡ सुगंध. ¶ व्यर्थ. § झाला असता. || झालें असतें.

प्रेतासङ्गं पुरिते मजला, किंवा दग्ध करीते !
कुणी नेउनी मला वहाता कोणाच्या हृदयाला,
गाढालिङ्गनसमयीं येता विनाश मम देहाला !
किंवा तल्पीं * इतर फुलांसह मजही नेउन रचिती.
जशी तयांची तशीच होती मम जन्माची माती !
विरहताप शमवाया अतुला मजला हृदयीं धरिती
कुणीतरी, तनु त्या हृदयासह माझी वाळुन जाती,
किंवा होता स्त्रीपुरुषांच्या प्रेमकलहिं मम अन्त,
येथें रानीं उगा न जन्मा मजला घालि अनन्त '।

*   *   *

' फार कशाला ? तुझ्याच हातीं जरि मी येउन पडतें.
कोमुन जातां तरी मला तूं फेंकुन दिधलें असतें !
म्हणशील नाही. देशलि वचनें, घेशलि शंभर आणा !
अनुभव परि हा आजवरी ये बहुधा सर्व फुलांना !
विचार तेसा उच्चारांचा प्रवाह कोठें वाहे ?
उच्चारांसम अचारांची श्रेणी कोठें आहे ?
मनांत भलतें, जनांत भलतें, हा तुमचा व्यवहार !
कापट्याचा सागर म्हणजे हा तुमचा संसार !
प्रफुल्ल अथवा म्लान सारखें प्रिय मी जगदात्म्याला,
येथें राहिन कसें तरी मी सेविन नित्य तयाला.

*   *   *

' सुख सुख म्हणती परन्तु नाहीं सुख मनुजांना ठावें;
व्यर्थ मृगजळामागें तृषितीं त्यांनीं नित्य फिरावें
काय सुखाची व्याख्या करिशी सर्व जगा सामान्य

---

* शय्येवर

क्षार जला त्याजि मानव, त्यांतच मीन म्हणे मी धन्य!
वनांत मी हें तुला वाटतें मम मोठें दुर्दैव,
परन्तु हें मम सुख, सार्थकता, हेंच मदीय अहेव *
व्यर्थ कल्पना कविराया! तूं सोडुन असल्या देई;
वनांत अथवा जनांत दैवीं असेल तें तें होई.'

*  *  *

हासुन बोले कवी 'तरी चल करील दैव हवें तें,
उगाच चिन्ता भल्यासलल्या कां तव चित्त करीतें?
अनुभव नाही तुला कशाचा, असम्बद्ध तव वाणी,
खरें सांग तुज वैराग्याची दीक्षा दिधली कोणीं?
जगांत आम्ही सदा रहातों, अनुचीं वचनें खोटीं!
एकाकी तूं बाळ कालचें, ज्ञप्ति † तुझी परि मोठी!

*  *  *

शुद्ध सुखाचीं आशा खोटी, नच ते जनिं वा विजनीं
फोल तुझे हे बोल! जा पहा गुरुला अपुल्या पुसुनी!
तृषेवांचुनी पाणी नाही, क्षुधेवांचुनी अन्न,--
उष्म्यावांचुन चन्दन नाही उपभोगार्ह! कदा न!
ध्वान्तावांचुन ‡ सूर्याचाही प्रकाश विश्वीं नाही,
दु:खावांचुन नको सुखाची, व्यर्थ कल्पना पाहीं!'

*  *  *

'क्षुधा, तृषा, शीतोष्ण उपाधी जनीं रहा, वा रानीं,
चुकले नाहित कधीं कुणाला; दुःख, सौख्य वा मानीं!
अखण्ड निद्रित राहुन त्यांना चुकवावें ही मुक्ति,
म्हणोत कोणी; फुला! मृती ‡‡ ही! नोहे मुक्ति! भुक्ति!
तुला सांगतों ज्यांस सङ्कटें म्हणती त्या वघ ऊर्मी

* भाग्य † ज्ञान ‡ अंधारावांचून ‡‡ मरण.



अनुक्रम. २५.४.८० विभाग... कां: काव्य क्रमांक ९२६८५

भवसिन्धूच्या*—पोहणार मी, मजला दिसती नामी
विजयनाम जो दुर्ग तयाचा किंवा हा सोपान,
मला आवडे चढावया हा, कुणी म्हणो सोपा न।
मनोवृत्तिच्या पायावरतीं रचिलेला हा दुर्ग,
याच्या शिखरीं विराजमाना हांकेवरती स्वर्ग!
चल मजसङ्गें! जाऊं तेथें! म्हणशिल मग "हें काय!
उलटें हितकर, सुखकर, सुन्दर दिसती सर्व अपाय!"
सुख येथें नच, सुख तेथें नच, सुखदुःखाचे कर्ते
आपण! सुमना! परमेशाच्या पूर्ण कृपेचे भोक्ते!"

* * *

'अनुरागाचा सुन्दर तरुवर दुःखकर्दमीं† रुजतो,
अश्रुजलाच्या सारणिमाजीं‡ फोंफावत तो जातो!
परि तो कर्दम, किंवा जल तें, आणी पुष्पफलें तीं,
तया तरूचीं, कोठें हरिती कल्पतरूची महती?¶
वनभूमीवर जगे न तरु हा, जनभूमीवर जगतो;
विभूतिनें निज संसाराला सार जगाचें करितो!
छायेखालीं याच्या वसतां जग हें सुखमय सारें,
दुःखाचा लव न दिसे कोठें, सारे रम्य पसारे!
या वृक्षाच्या शाखेमध्यें तुला निवेशित करितों
चल ये पाहूं!' म्हणून अपुले हात कवी पसरी तो.

* * *

दिसे दिसेना अशा रीतिनें किञ्चित् निजशिर चळवी.
हो-नाही हें नच कळवी सुम; परि सन्देहा कळवी.
स्थिती मनाचीं जाणुन त्याची थोडासा रागानें—
म्हणे, कवी 'मज ओळखिलें नच तुझिया मुग्ध मनानें.
काम निराळा, प्रेम निराळें, सदैव वाटे ज्यातें,

* संसारसागराच्या ऊर्मी म्हणजे लाटा † दुःखाच्या चिखलांत ‡ पाटांत ¶ तो चिखल तें जल आणि तीं फळेंफुलें त्या तरूचें-कल्पतरूचें माहात्म्य कुठें कमी करतात का?

कधीं कल्पिलें नसे जयानें विषामृताचें नातें;
प्रफुल्ल अथवा विशीर्ण असला भेद जयाचा गेला,
प्रेम आणखी सुन्दरता हीं एक सदाचीं ज्याला;
प्रेम विरमलें, कमी जहालें, मळलें, हरवुन गेलें,
म्हणणारे ते अजाण सारे मतें जयाच्या ठरले;
असा जरी तुज रसिक जगीं या पहावयाचा झाला
तरी फुला! तूं भेट येउनी असेन तेथें मजला!
पुन्हा सांगतों, जीवन आणि प्रेम भिन्न नच, एक!
प्रेमहीनता मृति, केवळ तो स्वार्थाचा अतिरेक!
प्रेमासाठीं सुखा विसरणें हीच सुखाची पूर्ति!
प्रेमासाठीं देहविसर्जन हीच खरोखर मुक्ति!
प्रेम मुक्तिसुख, परमेश्वर हा स्वर्ग हाच. ये पाहूं,
प्रेमरूप ये होऊं आपण, देवासन्निध राहूं!
प्रेमनाम जगदीश फुला रे! काय आणखी सांगूं?
पुरे करीं वनवास याहुनी काय दुजें मी मागूं?'

* * *

म्हणे फूल तें प्रेम कशाचें? उन्मद* हा भयकारी!
मला दुर्बला भिववी वाणी तुझी कवीशा सारी.
असो; कवी तूं खरा लाडका परमेशाचा प्राणी,
सदा रम सुखें तिथें न जेथें जावें कविविण कोणीं.
सृष्टि तुझी नव तुलाच देवो तुष्टि† सदा कविराया!
रसिक न त्याला कां न्यावें त्वां ओढुन तिकडे वाया?
तुझी गायनें दिव्य ऐकुं दे इथेंच मजला रानीं,
यापुढती मज शक्य न केव्हां जाणें तुज विसरोनी.
ये! कविराया! लोभ असूं दे! पुन्हा लौकरी भेट!
परिचित आपण आजउद्यां वा येथें तेथें थेट.'

---

* उन्माद, कैफ, भ्रम. † संतोष

'बरें, फुला! येतों, तुज घडुं दे अशीच ईश्वरसेवा!'
म्हणून इतुकें जाय कवी तो प्रेमरसाचा ठेवा.
परि जातांना अश्रू त्याचे गळले भूमीवरती,
तेच जहाली पुष्पलता ती न जाणतां शोषीती
ते लतिकेच्या भिनले अङ्गीं, त्या तीच्या सुमनाच्या
पहिल्या वृत्ती रहातील मग कोठुन त्या दीनाच्या?
कविमय झालें चित्त सर्वथा विरक्त, वन्य फुलाचें,'
मागें, पुढतीं, वरीं, खालतीं कवीच अवघा नाचे!

* * *

परी दयित तो कोठें गेला ठाउक कुसुमा नाही;
जरी तयाची विश्वीं भरुनी उरली मूर्ती पाही
प्रहर लोटला, पुन्हा कवी तो फुलाजवळुनी गेला
न बोलतां तैसाच, भासला फुला जणूं रागेला.
तथापि फुल तें तसेंच तुटुनी त्यांच्या हृदयीं शिरलें,
गळलें म्हणती, परि तें खोटें, कविहृदयीं तें रमलें!
अजून आहे फुललेलें तें त्या रसिकाच्या हृदयीं
येथे तैशीं परत्र रमतिल दोघें एकच समयीं

[ 'वनवासी फूल' काव्य पहिल्यानें आपल्या अर्धस्फुट स्वरूपांत १९०४ सालीं मनोरंजन ग्रंथप्रकाशन मंडळीनें प्रसिद्ध केलेल्या 'कुसुमगुच्छ' या काव्यसंग्रहांत अवतीर्ण झालें. तदनंतर स्वतः टिळकांनीं तें वाढवून १९१० सालीं रावसाहेब कानिटकर यांच्या इंग्रजी प्रस्तावनेसह प्रसिद्ध केलें. पुन्हा १९३३ सालीं मीं त्याचें पुनर्मुद्रण केलें. या वेळीं या काव्यास श्री. भिडे, श्री. वा. म. जोशी, श्री. माडखोलकर, डॉ. माधवराव पटवर्धन आणि श्री. खांडेकर यांचे रहस्योद्ग्राही टीकालेख जोडले आहेत. त्यानंतरची सटीप आवृत्ति नागपूरच्या वीणा प्रकाशनानें प्रसिद्ध केली. तींत पाठभेद दिले आहेत. दे. ना. टि. ]

★

## सृष्टीची भाऊबीज

[ **चालः**— चंद्रकांत राजाची कन्या ]

भाउबिजेचा सण मौजेचा! मनीं, जनीं, विजनीं,
गगनीं, अवनिवरी हर्षली बंधु आणि भगिनी!
**आगम*** आणि प्रीती यांचा नंदन **भाव** भला;
**मूर्ति**† नंदिनी, ओंवाळी ते‡ हर्षे भावाला.
अवचित तबकीं काव्यमणींची रास **भाव** घाली,
जिकडे तिकडे प्रभा फांकली **मूर्ति** हृष्ट झाली.
उत्सव बघुनीं स्वयें **रसिकता** मर्मज्ञा याची¶
'बंधु व्हा कुणी; आज करूं या भाउबीज साची!'
नक्षत्रांच्या ज्योती उजळुन **गगनश्री** आली,
प्रज्ञामंडित§ पंडित सोडुन **कवि**पुढती ठेली.
नवी लखाखी कालसमुद्रा ज्यांयोगें यावी,
नवे दागिने असे देउनी कवि तिजला नटवी
मनीं ज्योतिषी, वैमानिक हे म्हणती 'हें काय?'
'धन्य! धन्य!' ग्रहगोल गर्जती 'जगतीं कविराय!'

*            *            *

भाउबिजेची करी तयारी चार मास धरणी,
रुसुनी हसुनीं घेइ हवें तें जलदापासोनी.
हिरवा, पिवळा, काळा, ढवळा, लाल, निळा नांवें
ज्यांस न अजुनी, रंग वाणिनें कैसे वर्णावे?॥
ज्या वसनावर नवीन अवघे खुलती हे रंग,

---

* मनांत स्फुरणारा पहिला विचार; नुसती स्फूर्ति. † मनःकाल्पित आकृति किंवा प्रतिभा. (अथवा, मूर्ति = मूर्त होण्याची क्रिया Expression ‡ ती. ¶ विनविते. § बुद्धिशाली. ॥ ज्या रंगांना भाषेंत अजून नांवचें नाहींत, ते रंग काळा...निळा याप्रमाणें वाणीनें कसे वर्णावे?

चित्रकला ज्यावरची बघुनी होय विश्व दंग,
असें वसन हें नेसुन नटली वसुधा ही हौशी,
भाउबिजेचा सण बहिणींची वृत्ति करी ऐशी.
आप, तेज, वायू, हीं भूतें ज्यांसाठीं खपलीं,
रम्य फुलें तीं इतस्ततः ही लेवुनियां बसली.
उपचारांची ओळख नाही, न गणी जनरीति;
मनास वाटे तशी जहाली निजतनु सजवीती.
हे **जीवात्मे*** बंधु धाकटे कडिल ही बहिण
भाउबीज घे करुन साजरी प्रेमें त्यांकडून.

*   *   *

निजलहरींच्या मिषें नदी ही तरुंना ओंवाळी,
कुणी एक, कुणि अनेक, सुमनें ओंवाळणि घाली,
ज्यांच्याजवळीं कांहि न द्याया तरु ते डोलोनी
प्रेम दाविती; स्वीकारी तें **सरिता** हांसोनी.
देणें घेणें घडो सुखानें न घडो, त्याच्याशीं—
जिचें न नातें, प्रेमोद्भव ही, भाउबीज ऐशी !
**लहरी** अपुल्या शिरीं घेउनी कोमल **फेनाला**
कशा नाचती ! खेळविती लघु, रम्य भाउबाळा ?
सती **पार्वती**† निजजनकाची कन्या एकुलती,
परी हिला हो धर्मबंधुची **मेघाची** प्राप्ति
कुरवाळी तो हिला म्हणे 'तूं माझी पाठीची !
नसो तुझ्याभोंवतीं कधींही छाया चिंतेची.'
गरिब विचारी फुलें घेउनी तयास ओंवाळी,
तारीं परि हा स्वर्णरजतमाणि अमृतधौत ‡ घाली ?

---

* जीव, प्राणी † पर्वताची सृष्टिशोभा ‡ अमृताप्रमाणें शुभ्र.

बंधुभगिनिची प्रीति मनोहर नांवरूप त्याली,
भाउबीज होऊन जगीं ती आनंदें आली.
फुलवेली, मम कानामध्ये सांग गडे! पाहूं
भावांमध्ये कोण तुझा गे आवडता भाऊ?
भाग्यवंत तुज पसंत तरु हा आलिंगुन यातें
सदैव रमशी; धन्य खरोखर भावाचें नातें!'
वच हें ऐकुनि वेल म्हणे ती 'पुरें पुरें झालें!
ज्ञान तुझें वा कविकुळटिळका * आज कळुन आलें!
मला समजलें, खरोखरीचे वेडे कवि तिलुके!
वेडें जग हें, या वेड्यांना गौरवितें कुतुकें!
जननीजनकां, बंधुभगिनींना आलिंगुन बसलें
जन्मवरी, तुज सत्ती कोणती सांग अशी दिसली?
पतिबंधूंतिल भेद † कळेना, काय म्हणूं याला?
'कवी निरंकुश,' आज खरा हा अनुभव मज आला!'

* * *

ठाउक असतां पुन्हा विनोदें कवि बोले तिजला
'फुलवेली! तव बंधु लाडका भ्रमर दिसे मजला!'
झिडकारुन कर वेल म्हणे ती 'भिक्षुक हा असला!
बंधु न माझा, माझ्या तरुचा आश्रित एक भला.
करी सदा स्तुतिपाठ, लुटी हा दिधल्या दानाला,
उदरंभर हा तरी आवडे भारी आम्हाला,
आतां म्हणशिल "वायु, रवी, घन हे प्रिय तव भाऊ!"
तरी सांगतें यांच्या ठायीं दुसरा मम भावू. ‡

* ही व्याजोक्ति आहे. † अंतर. ‡ भाव, भावना.

तरुरायाचे माझे पोषक, देवाचे दूत,
उभयां आम्हां पूज्य सदा हे सदय साधुसंत.'
'कोण तुझा मग भाऊ?' पुसतां कविनें, त्यावरती—
उधळी अपुलीं फुलें **वेल** ती प्रेमोत्कटवृत्ति!
म्हणे 'वेलिंना ओव्या गाई कोण सांग पाहूं?
भाउबिजेला तोच भेटला आज सखा भाऊ!'

* * *

हे पाचूचे खडे, हिरकण्या सुंदरशा इकडे,
नीलमणी हे, कण सोन्याचे, चित्रमणी † तिकडे,
हीं गवताचीं, भूमिलतांचीं ‡ फुलें जनां दिसती,
दिसोत; यांची कविच्या नयनां ओळख परि पुरती?
**प्रावृषलक्ष्मी** ¶ वैभव अपुलें घेउनियां आली
भाउबिजेस्तव; बंधु हिचा तो **कवि** जो § **वनमाली!**
बहिणी कविच्या विविध विलसल्या तशा न कोणाच्या!
भिन्न न वृत्ती, परी एक हो कविच्या! प्रेमाच्या!
क्षेत्रीं क्षेत्रीं पहा उभी ही रम्य **अन्नपूर्णा,** ||
उदार भारी, हिला न बघवे कवणाच्या दैन्या.
आम्हि लेंकरें सर्व हिचीं, ही अमुची प्रिय आई—
भाउबीज ही कशी साजरी करितों, हें पाही.
भावंडांचा उत्सव अमुचा तोच सदा हीचा
मातृप्रेमा वर्णायाला सबल न हो वाचा!

---

† ठिपक्यांची रत्नें. ‡ जमिनीवर सरपटणाऱ्या वेलींचीं. ¶ पावसाळ्यांचीं शोभा. § 'वने मालतेऽसौ.' निरंतर वनांत शोभणारा, रमणारा. || धान्यदेवता.

'महासागरा! बहिण लाडकी कोठें तव सांग!
गहन खरा तूं! तुझा न लागे सहज कुणा थांग!
उदार, सुंदर, वैभवशाली, थोर असा भाऊ
तुझ्यासारखा कुणा सतीचा? सांग मला पाहूं!
दर्शनमधुरा ख्यात अप्सरा तव कन्या तारा!
कामरूपिनी मेघततीचा तूं स्वामी, थारा.
ही धरणी तव विभव विलोकित दासीसम चरणीं–
तुझ्या उभी; ही महासागरा! न दिसे तव भगिनी.
भगिनी आणी बंधु सारखीं दिसती दिसण्याला,
तुझ्यासारखी एक दिसे ही अक्षयता मजला.
हिचीच उपमा तुला सागरा! जे ते कवि देती,
तुझीच भगिनी अक्षयता हें जगता पटवीती!
भाउबिजेचा सण हीच्याही सदनीं होईल,
इथेंतिथें हा भेद न ज्याला तो कवि पाहील!'

* * *

हीं कालाचीं दोन लेंकरें सुंदर दिनरजनी,
व्यवसायी बहु भाउराय परि शांत पुरी भगिनी.
जातांयेतां नित्य दोनदां भेट घडे यांची,
साक्ष घ्या बघूं सहज जाउनी कोणी संध्यांची.
'रोज घडे तें घडे आजही, नवल त्यांत नाही;
भाउबीजेस्तव अधिक काय हो केलें दोघांहीं?'
पुसाल ऐसें; तरी सांगतों उदार हा भाई–
सर्व दिवाळी* उचलुन अपुल्या बहिणीला देई!

* खालीं वर्णन केल्याप्रमाणें दिवाळींतील सर्व विधि.

दिवस निघायापूर्वी स्नानें, दीपोत्सव रात्रीं,
लक्ष्मीपूजन रात्रीं, दानें रात्रीं सत्पात्रीं.
नळे, फटाकें, चंद्रज्योती, फुलबाज्या सगळे—
रात्रिं, दिनाचें प्रेम निशेवर किति कोणा न कळे !
भाउबिजेला काय करावें याहुन आणिक तें—
दिवसानें निज भगिनींसाठीं, नच मजला सुचतें !

* * *

अन्त.सृष्टीमधें पहा हो चला काय चालें,
बंधुभगिनिच्या प्रेमरसाला किति भरतें आलें.
अहंवृत्ति ही अवघें विसरुन हर्षे—बंधुगेहीं—
रमलीं; हिंजला इतर कशाची शुद्धबुद्ध नाहीं !
इतर कृति, व्यवसाय सोडुनी, भगिनी दीपाली,—†
कशी मुदित हो हेंच पहातों, पुरी तृप्त झाली !
या तन्मात्रा ‡ भगिनीं अवघ्या एकठायिं जमल्या
भाउबिजेस्तव, बंधु इंद्रियग्रामगृहीं ¶ रमल्या !
ईश्वरसदनीं विश्वासाला प्रियकर भावाला
भक्ती भगिनी अत्यानंदें ये भेटायाला.
भाउबीज या बंधुभगिनिंची बघुनी कवि धाला;
झाला तन्मय गानीं, विसरे अपुल्या देहाला !
'भाउबीज ही' म्हणे 'ईश्वरा ! तव, तव सृष्टींची !
सदा असूं दे अशीच सदया ! सीमा तुष्टीची !'

★

---

† दिवाळी (सण). ‡ शब्द, स्पर्श, रस, रूप, आणि गंध. ¶ इंद्रियांचा समूह जो, त्याच्या घरीं, म्हणजे मनांत.

## २ : बाह्य सृष्टीचें आणि अंतःसृष्टीचें गानवादन*

[ चाल : लक्ष्मण पडतां धरणीला० ]

उड्या मारिते नदी दुरी । खळ खळ खळ खळ शब्द करी;
रम्य डहाळीवर उडुनी । राघू बसतां होय ध्वनि;
वनस्पती भिजवीत झर्णी । झरा निघाला गिरिवरुनी
टप टप टप टप शब्द निघे । आनंदें तों जें वळघे;
गाइ तृणावर चरतांना । शब्द मृदू रंजवि काना;
घनच्छाय रानीं गाई । कोकिल, तो प्रतिरव होई;
तीर सुटे रानामधुनी । येतो त्याचा मोड ध्वनि;
नाद असे हे मौजेचे । काम न येथें लिहिण्याचें
गायनवादन शिकण्याला । अशक्य * विद्यालय–माला !
परंतु जेव्हां चित्ताला । नको जीव आतां झाला
जेव्हां न चले मनुजाचें । तेव्हां भैषज † हें साचें ! १.

*          *          *

२. कितीक झाले ज्या अब्द । आठविणें तो मधु शब्द
प्रेमें जपुनी वाढविलें । फुललें ‡ गत-वैभव झालें,
वास अशा मधु सुमनाचा । स्मृतींत जो अजुनी साचा;
एकाएकीं येत हसूं । किंवा गळलें एक असूं,
स्मृतींत अजुनी जें दिसतें । नक्षत्रासम जें गमतें;

---

* मुळांत ( बालबोधमेवा, १८९८ फेब्रुवारी, पान ८२ ) '**वाद्यगान हें शिकण्याला । अशक्य विद्यालयमाला**' असा पाठ होता. परंतु दोनहि पाठांतील 'अशक्य' शब्दानें नीट सुसंगत अर्थ होत नाहीं आणि वाक्यरचनाहि व्याकरणदुष्ट होते; यामुळें असें निश्चयानें वाटतें, कीं 'असंख्य' च्या ठिकाणी 'अशक्य' हा मुद्रणदोष असला पाहिजे. † मुळांत (बा० मे०, १८९८, फेब्रु०, पृ० ८२ ) 'भैषज 'च्या ठिकाणीं 'अमृत' असें आहे. १ येथपर्यंतचें हें काव्य अलगपणें बालबोधमेव्यांत ( १८९८ फेब्रु० पृ० ३२ ) 'सृष्टीचें वाद्यगान' या शीर्षकानें प्रसिद्ध झालें होतें. २ येथपासून पुढचें काव्य बालबोधमेव्यांत ( मार्च १८९८, पृ० १) 'मनाचें वाद्यगान ' या नांवानें प्रसिद्ध झालें होतें. ‡ फुललेलें.

मायेनें जो कर धरिला । शब्द धिराचा जो आला,
वदवेना परि ऐकियलें, । ज्या उल्हासें जाणविलें;
देवाची वाणी आली । एक वचीं जीवा गमली!
अल्प अती हीं अल्प खरीं । महत्त्व कसलें यांस तरी?
देणारे चित्तीं म्हणती । यांत कशाची हो प्रीति?
परंतु जेव्हां हृदयाचे । तुकडे होती मनुजाचे,
तेव्हां हीं अल्पेंच तया । सांवरिती दावून दया!

★

## ३ : सृष्टीची करमणुकीची घटका

[चाल : आजि मी माळिण नवतरणी

वसन्त ज्या म्हणती, । सकल जन, वसन्त ज्या म्हणती,
ती सकल सृष्टिची करमणुकीची घडी मला दिसती*!
नवीं नवीं येती, । पांखरें, नवीं नवीं येती,
हीं फुलें उधळिती कुणी नभांतुन जणुं वाऱ्यावरतीं!

तरुवल्ली दिसती नवाभरणमण्डिता,
ये स्फूर्ति पिकादिक गानकलापण्डितां!
वनिं करमणुकीस्तव जमती वनदेवता;

हर्षा नाहि मिती, । खरोखर, हर्षा नाहि मिती!
हे कपोत, केकी नर्तन करिती, ताल झरे धरिती!

नवीं फुलें फुलती, । वसन्तीं, नवीं फुलें फुलती,
जणुं तारे उतरुन करमणुकीस्तव धरणीवर येती!

यजमान निमन्त्रितजनीं जसा वावरे,
हा मंद सुगन्धित वायु तसा संचरे,
इतरांस सौख्य जें तें याचें सुख खरें!

* दिसते.

भ्रमर मला म्हणती, । मुदित हे, भ्रमर मला म्हणती *
ये! वसन्त आहे तो तोंवर करुं ये आपण गुणगुण ती!
सकलश्रमविरति, । खरी ही, सकलश्रमविरति,
हा वसंत म्हणजे पुन्हा सांगतों करमणूक नुसती!
†हें मूर्त विनोदन सृष्टिसवें संगत,
†हें मनोभावनादर्शांमधलें स्मित!
हा प्रसाद काव्यामधला कविसंमत,
ही सृष्टीवरती, । खरोखर ही सृष्टीवरती,
नरनारींवरतीं कृपा प्रभूची केवळ सुखभुक्ति!

★

## ४ : पर्वतारोहण

(वांईपासून पांचगणीपर्यंतच्या प्रदेशाचें वर्णन. दिवस उन्हाळ्याचे, वेळ सकाळ.)

[ चाल : भला जन्म हा तुला० ]

प्रिय प्रेरणे! थांब गडे, हा पहा लागला गिरि,
अरसिके! धांवसि कां वरिवरी!
हळूहळू चल, चित्र काढुनी ठेवूं हृदयांतरीं,
सखी तें रंगवील वैखरी;
पहा पहा हा उभा राहिला भास्कर वेळेवरी,
बांधुनी मंदिल शिरिं भरजरी;

---

* हे मुदित (आनंदित) भ्रमर मला (कवीला) म्हणतात कीं वसंत आहे तोवर गुणगुण करूं ये. † सृष्टिसमवेत सहवास म्हणजे मूर्तिमंत मनोरंजन आहे. तसेंच मनोमनोभावनांच्या आरशांत प्रतिबिंबित झालेलें स्मित आहे. ‡ कविमान्य.

मायेनें जो कर धरिला । शब्द धिराचा जो आला,
वदवेना परि ऐकियलें, । ज्या उल्हासें जाणविलें;
देवाची वाणी आली । एक वचीं जीवा गमली!
अल्प अती हीं अल्प खरीं । महत्त्व कसलें यांस तरी?
देणारे चित्तीं म्हणती । यांत कशाची हो प्रीति?
परंतु जेव्हां हृदयाचे । तुकडे होती मनुजाचे,
तेव्हां हीं अल्पेंच तया । सांवरिती दावून दया!

★

## ३ : सृष्टीची करमणुकीची घटका

[चाल : आजि मी माळिण नवतरणी]

वसन्त ज्या म्हणती, । सकल जन, वसन्त ज्या म्हणती,
ती सकल सृष्टिची करमणुकीची घडी मला दिसती*!
नवीं नवीं येती, । पांखरें, नवीं नवीं येती,
हीं फुलें उधळिती कुणी नभांतुन जणुं वाऱ्यावरती!
तरुवल्ली दिसती नवाभरणमण्डिता,
ये स्फूर्ति पिकादिक गानकलापण्डितां!
वनिं करमणुकीस्तव जमती वनदेवता;
हर्षा नाहि मिती, । खरोखर, हर्षा नाहि मिती!
हे कपोत, केकी नर्तन करिती, ताल झरे धरिती!

नवीं फुलें फुलती, । वसन्तीं, नवीं फुलें फुलती,
जणुं तारे उतरुन करमणुकीस्तव धरणीवर येती!
यजमान निमन्त्रितजनीं जसा वावरे,
हा मंद सुगन्धित वायु तसा संचरे,
इतरांस सौख्य जें तें याचें सुख खरें!

* दिसते.

भ्रमर मला म्हणती, । मुदित हे, भ्रमर मला म्हणती *
ये! वसन्त आहे तो तोंवर करुं ये आपण गुणगुण ती !
सकलश्रमविरति, । खरी ही, सकलश्रमाविरति,
हा वसंत म्हणजे पुन्हा सांगतों करमणूक नुसती !
†हें मूर्त विनोदन सृष्टिसवें संगत,
†हें मनोभावनादर्शामधलें स्मित !
हा प्रसाद काव्यामधला कविसंमत,
ही सृष्टीवरतीं, । खरोखर ही सृष्टीवरतीं,
नरनारींवरतीं कृपा प्रभूची केवळ सुखभुक्ति !

★

## ४ : पर्वतारोहण

(वांईपासून पांचगणीपर्यंतच्या प्रदेशाचें वर्णन. दिवस उन्हाळ्याचे, वेळ सकाळ. )

[ चाल : भला जन्म हा तुला० ]

प्रिय प्रेरणे! थांब गडे, हा पहा लागला गिरि,
अरसिके! धांवसि कां वरिवरी !
हळूहळू चल, चित्र काढुनी ठेवूं हृदयांतरीं,
सखी तें रंगवील वैखरी;
पहा पहा हा उभा राहिला भास्कर वेळेवरी,
बांधुनी मंदिल शिरिं भरजरी;

---

* हे मुदित (आनंदित) भ्रमर मला (कवीला) म्हणतात कीं वसंत आहे तोवर गुणगुण करूं ये. † सृष्टिसमवेत सहवास म्हणजे मूर्तिमंत मनोरंजन आहे. तसेंच मनोमनोभावनांच्या आरशांत प्रतिबिंबित झालेलें स्मित आहे. ‡ कविमान्य.

ही पूर्वदिशा गे गुलाल उधळीतसे,
ही हसे, सृष्टि गे पुलकित झाली दिसे,
रविकरस्पर्शनें डोळे उघडीतसे,
पहा पहा हा शकट आपणां घेउनि चढतो वरी
इकडे पर्वत इकडे दरी. १.

हास्य गिरीला सांडुन गेलें! निर्झर कीं वाळले,
ग्रीष्में वैर कसें साधिलें!
रम्य* आरसे* सृष्टिसतीचे फुटले गे हरपले,
गिरीचें अंगवस्त्र† लोपलें.
हा वैभवनाशें खिन्न दिसेना जरा,
हा गांभीर्याचा पुंज उभा साजरा,
घे यांतुनि थोडें अगा मना पामरा,
पृथ्वीवर हा वसे परंतू सारी दृष्टी वरी!
इकडे पर्वत इकडे दरी. २.

नकळे हृदयीं काय, परी हा उंच धरीतो शिरा
गुरु हा उन्नत दांभिक नरा;
न जाणतां मी उगाच नांवें कां ठेवूं गिरिवरा,
आंतलें ठाउक परमेश्वरा!!
बाहेर दिसे जें ज्ञेय तेंच मानवा,
नच कांहि झांकलें एक सृष्टिच्या धवा
मग कां निंदेनें ही जिव्हा बाटवा!
पर्वतराया, दुरुत्तराची क्षमा मला या करीं;
इकडे पर्वत इकडे दरी. ३.

---

* लहान लहान जलाशय. † हिरवळ. ('अंगवस्त्र' शब्दामुळे 'अनुचितार्थत्व' काव्यदोष झाला आहे.)

घाट पाट हा जणुं शोभेचा वहात आला दिसे,
काञ्ची वनदेवीची वसे;
शूर शिपायी अपुला म्हणुनी सृष्टी ज्या देतसे,
असा हा पट्टा गिरिचा असे;
कीं भांग सृष्टिच्या विगलित* वेणींतला
कीं अन्तःपट हा गिरिदरियुग्मांतला
हा कुंकुम पडुनी ईषदरुण जाहला,
वरखालीं वा जाण्या पथ हा नरजन्माचे परी
इकडे पर्वत इकडे दरी. ४.

रंगदार गालिचे पूर्वींचे गुंडाळुनि ठेविले,
जुने हे जागजागिं पसरले;
ग्रीष्म भिकारी घरासि येतां ही सृष्टी यापरी
तयाच्या अपमानाला करी;
ही असली बैठक दरींत केली असे,
कीं मलिन पटाला नेसुन सृष्टी वसे,
हीं तुटुनि तोरणें तुकडे पडले जसे,
लाज कुठें तव ? जा जा ग्रीष्मा ! परत घरीं लौकरीं !
इकडे पर्वत इकडे दरी. ५.

प्रिये प्रेरणे ! रुसूं नको गे ! थांबविलें तुज तरी
'डोंगर दुरुन रम्य' सुंदरी !
सहजमनोहर सृष्टी येथें रुसुनी ग्रीष्मावरी
दुःखद रूप असें हें धरी;
तर एकान्तीं हिज भेटूं चल, मग तुला—
समजेल हिच्या गे लावण्याची कला;
मग म्हणशिल झाला श्रम हा झाला भला
होईन वेडा तें पाहुनि मी सांभाळुनि तैं घरीं !
इकडे पर्वत इकडे दरी. ६.

---

* मोकळ्या

## सुशीला

[ दिंडी ]

सुशीलेच्या शाळेस सुटी झाली, । मनीं मुलगी ती फार फार धाली ;
म्हणे 'आतां भेटेल मला आई, । बाप, भाऊ, प्रिय ताइ आणि माई.
सोडिल्याला घर दोन तीन होतां । सहा महिने जाहले पुरे आतां !
विरहदुःखाचे कितीदां उम्हाळे । जसे आले तैसेच दाबियेले !
माय माझी भेटेल मला जेव्हां । आसवांनीं न्हाणील मला तेव्हां
मुका बाबा घेतील कपोलाचा, । हसुन भाऊ घेईल गालगुच्चा !
ताइमाई सारुन दुरीं खेळ । धावुनीयां मज मिठ्या मारितील,
ऊनपाउस हीं जशीं एक होती । हसें रडणें होईल त्याच रीतीं !'

*　　　*　　　*

सर्व माझेंपण एकवटे जेथें । जिथें प्रेमाचें राज्य सदाचें तें,
स्वार्थकपटाचा लेश नसे जेथें, । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !
जिथें नाहीं अभिमान कुणा ठावा, । एकमेकांची जिथें सौख्यसेवा ;
जिथें परहित तें स्वहित मानवातें, । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !
भिन्न मूर्तींमधि चित्त एक जेथें, । भोगि दुःखातें अनुभवी सुखातें,
स्वर्ग वाटे हा मर्त्य लोक जेथें ! । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !
मनाच्या ज्या अत्युच्च, रम्य वृत्ति । अंकुरित त्या होऊन वाढताती ;
फुलें, सुफळें येतात त्यांस जेथें, । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !
वीर, पंडित, कवि, संत, सती यांला । सिद्ध करुनी जें देतसे जगाला,
सर्व संसृतिचें मूळ नांव ज्यातें, । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !
ज्ञान अधुलें द्यावया मानवाला । स्वयें देवें स्थापिली पाठशाला ;
दिलें त्यानें 'गृह' नाम मुदा तीतें, । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !
* त्रिवर्गाचा सोपान सिद्ध केला । जगन्नाथें, तो दिला मानवाला ;
देव मंदिर आपुलें गणी ज्यातें । जगीं उपमा कोणती त्या गृहातें !

---

* धर्म, अर्थ आणि काम यांचा.

गृहा आली ती सुंदरी सुशीला, । किती वर्णू जो हर्ष तिला झाला !
हृदय तांचें तें असे हो स्त्रियेचें, । तसें माझें नच साच पूरुषाचें !
जरी कवयित्री कुणी हें करील, । प्रेमहर्षाला तिच्या रंगवील,
तरी काढिल ती चित्र फार नामी ! । प्रतीतीसम* कल्पना न ये कामीं !

बापभावांना हर्ष फार झाला, । मायबहिणींना प्रेमपूर आला;
सहा महिन्यांनीं लाडकी सुशीला । परत आलेली पाहुनी गृहाला.
घरामध्ये पाहून त्या मुलीतें । कामधंदा विसरुनी जाय जें तें !
किती वांट्याला येइ ती कुणाच्या ? । किती आईच्या ! ताइमाइ यांच्या !
रात्र सारी गोष्टींत सरुन गेली, । तया वाटे ती आज अल्प झाली !
उग्रांपरवांचें आज हो जहालें ! । कधीं न घडे तें नवल घडुन आलें !
तोंडिं लावाया प्रेमहसित वाचा, । विनोदाचें रायतें पात्रिं ज्याच्या
मीठ भाकर कोरडी, सुधा त्याला । महाभाग्यांच्या धन्य सागराला !

सकल सुरसांचें मधुर सार काढा, । स्वर्णपात्रीं तें आणुनियां वाढा;
तरी घरचें जें अन्न तेंच थोर, । फिकें होइल पीयूष त्यासमोर !

नवें पाहोनी जुनें विस्मरावें, । बालतरुणांचें शील जगा ठावें;
बाळ पडला कळवळे, रडे भारी । तोंच हासे नव ऐकुनी तुतारी !

असो; आनंदें घालवी सुटीला । मायबापांच्या घरीं ती सुशीला.
नव्या ओव्या, नव तिचे नित्य खेळ, । सदा वाटे तिज थोडकाच वळ.
कुठें शाळा ? तेथील त्या प्रतीती ?† । उगा स्वप्नासम पुढें येति जाती !
मुलीची त्या रंगली गृहीं वृत्ति, । मला जाणें परतून विस्मरे ती !

* * *

ममत्वाचें खालतीं आलवाल,‡ । वरुन विरहाचें ऊनही विलोल,
आसवांचें जल सदा मिळत राहे, । प्रीतिलतिका जगतांत वाढताहे !

सहा महिने कन्यका दूर होती, । म्हणुन झाली लाडकी अधिक हो, ती.
व्यर्थ ठेवीती वियोगास नांवें । मला वाटे तद्वशा नित्य गावें !

---

* अनुभवाप्रमाणें. † अनुभव. ‡ आळें.

तशामध्ये जाणार ही फिरोनी । विचारें या नयनांस येइ पाणी
तिच्या आईच्या, ताइ माइ यांच्या, । मुळा लाघे तें प्रेमवल्लरीच्या !
गृहीं म्हणजे ती प्रेमतरूखालीं । सुखें लीलारत बालिका जहाली;
तया तरुला हालवी गदगदां ती ! । फळें पुष्पें खालतीं सांडताती !

* * *

तिच्या अनुजा तिजहुनी वयें सान । सर्व हारावेती तिचें नवें ज्ञान !
सर्व मोठेपण, सर्व डौल तीचा, । भेद उरला नच वयाचा ! कशाचा !
तयांसंगें रोहिणी* ती पुन्हा हो, । अहा झाला केवढा तिचा लाहो !
बाल्य आठवतां आपुलें कुणाला । प्रेमदुःखाचा येइना उम्हाळा ?

विश्व सारें आनंदमय मुलांना, । कधीं दुःस्वप्नें गांजिती न त्यांना;
प्रेम, आशा, विश्वास या त्रयाची । मिठी पडलेली सदा बालकाची !
स्नेह त्यांचा बाहुल्यासाउल्यांशीं, । वडिल जें जें मांडिती पुढें त्यांशीं,
सृष्टि सारी खेळते तयांसंगें ! । कुठें बाळाचें चित्त न हो रंगें !
काल थोडेसें, उद्यां मुळिंच नाही, । आज बाळाच्या पुढें सदा राही !
कुठुन त्याला अनुताप ? कुठुन चिंता ?। कुठुन संशय त्याचिया शिवे चित्ता ?

* * *

सुशीलेचें परि बाल्य सरत आलें, । स्वप्न पुढचें तें तिनें पाहियेलें !
यौवनाच्या देहलीवरी† राहे । उभी कन्या, आंत हो काय पाहे !
किती किल्ले ती नवे नवे बांधी । किती कार्यें कल्पनाबळें साधी !
कंठिं बाल्याच्या ठेवुनियां हात । फिरे रमणी तारुण्यकाननांत !
क्षणें प्रौढ, पुन्हा क्षणें बाळ व्हावें, । ज्ञान सांगावें, क्षणानें रुसावें;
क्षणें बाळांतुन दूर निघुनि जावें, । क्षणें त्यांसह नर्तना सिद्ध व्हावें !
बाल्य आणी तारुण्य यांजमध्यें । परमसौख्याची स्थिती तिला लाधे;
अभिमताशीं परि पूर्वपरिचिताशीं । अधिक लग्ना ती दिसे शैशवाशीं.‡

---

* नऊ वर्षांची कुमारी. † उंबरठ्यावर. ‡ परंतु अभिमत (प्रिय) आणि पूर्व-परिचित असें जें शैशव त्याला ती अधिक चिकटलेली दिसे.

अर्ध सौरभ * सौंदर्य हृदीं राहे, । अर्ध केवळ बाहेर दिसत आहे;
अर्ध पुष्पपणा पावली कळी ती । बाल्यसीमेवर हसत डुलत होती !

* * *

प्रभू तीचा तिजसवें उभा नित्य । 'मार्ग, जीवन, जो स्वयें महासत्य †'
मधुर त्याचीं जीं पाळण्यांत गीतें । तिनें ऐकीलीं तींच अजुन गाते !

न ती बागेंतिल कळी धनाढ्याच्यां, । तिच्यासाठीं नच पंक्ति रक्षकांच्या,
नसति भिंतीं बागेस तिच्या किंवा । तिची सारी काळजी तिच्या देवा.

धूळ जगताची उठे सभोंवार । प्रभु स्वकरें ती करी परी दूर;
थवे मधुपांचे पाहुनी तयाला । धजति घ्याया नच तिच्या दर्शनाला.

प्राज्ञ म्हणती 'हें सुमन जया व्हावें । पुरें त्यानें देवास शरण जावें;
तोंच उचलुन देईल हा प्रसाद, । दिव्यलोकींचा जणूं मूर्त मोद !'

* * *

प्रभूजवळीं जणुं तिचा नित्य वास, । सदा शास्त्राचा तिला निदिध्यास;
तरी वारें लागलें तिला त्याचें । सर्व अशिवाच्या घोर साधकाचें.

तिला ग्रासी सर्वघ्न‡ अहंकार, । तिला न कळे आपणा हा विकार;
कळीचें त्या सौंदर्य हारवाया । शिरे हृदयीं विषकीट¶ तिज वधाया !

सुशीलेच्या आईस अक्षराची । नसे ओळख, रंगली ती प्रपंचीं;
बाप शिकलेला पूर्विचा विचारा, । असे पारका तो नवीना विचारां.

भाउ थोडेंसें शिकुनि परत आला । साह्य अपुल्या बापास करायाला,
ताइ माई तर अजोनी लहान, । लेंकरांचें त्या किती असे ज्ञान !

आप्त अवघे अज्ञान, अल्पविद्य; । तिच्या गांवीं नच कुणी ज्ञानवद्य§
तिला वाटे पंडिता एक मीच ! । तिला दिसती अपुलेच लोक नीच.

---

* सुगंध

† "Jesus saith unto him, I am the way, the truth and the life: no man cometh unto the Father, but by me."

—*John XIV 6.*

‡ सर्वविनाशक. ¶ विषारी कीटक. § ज्ञानामुळें नांव घेण्याजोगा.



ग्रा. नं. ७०३७०

तिच्या रूपाची फार जगीं ख्याति, । तिचे सद्गुण तिजपुढें किती गाती;
तिची म्हणती प्रभुपदीं खरी भक्ति, । किती गणिती अनुपम्य तिला व्यक्ति
ख्रिस्ताशिष्या गुणवती ती सुशीला । अशा ऐकुन आपुल्या संस्तुतीला;
अहंकारें व्यापली दुजी झाली! । न ती ख्रिस्ताची अतां राहियेली.

* * *

तप्त तैलाचा बिंदु पडे कर्णी । तरी पुरवे ! परि नको कुणीं गाणीं
ऐकवाया मज माझिं अगा ताता । दयासिंधो, वत्सला, जगन्नाथा !

प्रभूपुढतीं कित्येक बैसलेले, । परी अपुल्या गुणगानिं रंगलेले !
पुढें असुनी मध्यान्हसूर्यदीप्ति । किती ठेंचा लागून पतित होती !

किती ऐकति अपुल्या कल्पनांचीं । सूचितें, तीं मानिती ईश्वराचीं !
किती स्वमुखें प्रभुनाम नित्य गाती, । परी आपण अपणास पूजिताती !

किती शास्त्राच्या वाक्यसंग्रहांत । घेति निवडुन अपुलेंच नीच हेत !
मनन अपुलें दर्शनें आपुलींच । तयां प्रभु सोडी असो उंच नीच !

'कुणी नाही निर्गर्व मजसमान,' । गर्व सांगे, 'तूं मान हें प्रमाण,
पुरे इतुका हा पाश मम करांत, । पहा करितों तुज दास मी क्षणांत !'

गुणांमाजी वैगुण्य एक आलें, । दुर्गंध तक्राच्या बिंदुसें जहालें !
सुशीलेचें सच्छील उलट होय ! कुठें गर्वासम कोण करि अपाय ?

घरीं तीच्या कोणास हें कळेना, । प्रेम करितें आंधळे कोण कोणा !
म्हणति सोडुन बाल्यास पुढें गेली । म्हणुन हीची ही वृत्ति भिन्न झाली !

* * *

हौस पुरवावी, खेळ करुन घ्यावा, । पुढें नशिबाला दोष सर्व द्यावा !
भरतखंडीं हा अर्थ विवाहाचा ! । मनुष्याचा, न श्रुतींचा स्मृतींचा !

जन्म झालें ऐकून कन्यकेचें । जिथें होती संकल्प विवाहाचे !
दहा वर्षांच्या मुली प्रौढ जेथें । अशुभ दिसती पतिवांचुनी जनांतें !

तिथें लग्नाचें स्वप्न जिला नाहीं । अशी तरुणी, अज्ञेय कल्पना ही !

निरंकुश कवि हें जरी मला ठावें, । तरी गाणें भलतें न मला भावे. *

*   *   *

ख्रिस्तशिष्या आमुची परि सुशीला । सर्व शाळांहुन भिन्न तिची शाला !
विवाहाचा ती अर्थ करि निराळा । जसा प्रभुनें तिजलागिं बोधियेला;
'पूर्ण विकसित जाहल्यावरी दोन । मनें प्रेमाच्या बंधनेंकरून !
एक करुनी अर्पणें ईश्वराला,' । म्हणे युवती 'उद्वाह † नाम याला.'
तिच्या वडिलांना हेंच मान्य होतें । परी वाटे त्या जुन्या माणसांतें
पुरी उपवर जाहली; अतां लग्न । हिचें लांबविणें मूर्तिमंत विघ्न !
सदा काढीती गृही लग्नगोष्टी, । मनीं मुलगी ऐकून होय कष्टी;
म्हणे 'कन्येचें करोनियां दान, । काय आतां जोडिती महापुण्य !'
तिच्या वडिलां आवडे चारुदत्त, । शील त्याचें अत्युच्च रम्य वृत्त ‡
सुशीलेला अनुरूप सर्वथा तो, । असा जोडा विरळाच जगीं होतो.
परी त्याचें निघतांच नांव कन्या । म्हणे 'जगतीं जन्मून मी अधन्या !
मला देती हीं पुरुषास वन्या¶ । करिती कार्या देवासही अमान्या !'
तिचें गृहिणीपद सर्वथा निराळें, । कल्पनेनें तिज हवें तसें केलें !
रूप त्याचें परिपूर्णतेस नेलें, । तिच्या गर्वानें पुरें रंगवीलें !
कुठें बेगड ! तें खरें कनक कोठें ! । हिरा कोठें ? लघु काचशकल § कोठें ?
सुशीलेनें कल्पिला पुरुष कोठें ! । तिच्या वडिलीं योजिला दीन कोठें ?

*   *   *

सुटी सरली, शाळेस परत आली, । मनीं मुलगी ती खिन्न फार झाली;
म्हणे 'वर्षे मी दोन तीन आतां । न हो भेटेनाचि मायबंधुतातां !
सदा गोष्टी काढिती विवाहाच्या, । चारुदत्ताच्या द्वेषकरा साच्या !
तया आणीती मला भेटण्याला, । काय सुख हो जाऊन त्या घराला ?
सदा नावडत्या वादविवादाला । ऐकण्याचा मज पुरा त्रास आला !
सदा अप्रियदर्शनें दृष्टि झाली । त्रस्त माझी ! वाटतें बरी गेली !

* आवडे † लग्न ‡ वर्तन ¶ रानटी § काचेचा तुकडा.

जगीं कोठें परिशुद्ध सौख्य नाही, । दुःखकलुषित * संसार नित्य पाहीं;
मायबापांच्या पदीं सौख्य पोरां । वृथा भ्रांती ही असे सानथोरां !
न तीं घेती कधिं मुलांचा विचार, । खरा करिती सर्वदा स्वाधिकार !
त्यांत कन्या तर त्यांचिया करांत । मनें † हीना † जडवस्तु जशी येत !'
पुन्हा बोले ' ऐकेन ईश्वराचें, । न मी आईचें ! बंधुचें ! कुणाचें ! '
किती वेडी ! राहिला देव कोठें ! । तिचें गर्वं संत्रस्त चित्त कोठें !

*　　　*　　　*

काय देवाचें चित्त तिला ठावें ! । जरी त्याला ती शरण जिवेंभावें !
मधें येतां तो दुष्ट अहंकार, । भक्त ईश्वर निश्चयें होति दूर,
पुरा वंचक हा अहंकार जाणा । नटे जैसा स्वयमेव देवराणा !
भक्ति करुनीयां घेइ आपुलीच । नराकडुनी हा कपटसिंधु नीच !
शब्द त्याचे वाटती देववाणी ! । दिसे त्याच्या सूचितीं लाभहानि !
मला पुशिलें ' सैतान खरा कोण ? ' । तरी सांगेनाचि ' अहंकार जाण ! '
सर्व विद्या, संपत्ति, कीर्ति, मान । अहंकारें प्राणघ्न ‡ विषसमान ।
अहंकाराचा सर्प जिथें आहे । निधीपासुनि त्या विश्व दूर राहे !

*　　　*　　　*

जिथें विनयानें परिणिली सुविद्या, । तशी धर्मानें मनोवृत्ति वंद्या;
जिथें उपकारा प्रीति माळ घाली, । जिथें न्यायाची शांति सखी झाली !
सद्गुणांचें माहेर असें आलें, । सुशीलेचें तें पूर्णपणें झालें !
परी धिक्कारी त्यास ती बळानें । तिचें तीचेंपण नष्ट दुरभिमानें !
चारुदत्ताची किती चारू चर्या ! । व्यर्थ निंदी ती तया पुरुषवर्या;
प्रेम त्याचें तिजवरी अतोनात, । स्वार्थकपटाचा नसे लेश त्यांत.

*　　　*　　　*

---

* दुःखग्रस्त. † बुद्धिहीन, अचेतन. ‡ प्राणघातक

दिसे गर्वांधा तया मानिनी ती !* | खऱ्या प्रीतीची हीच सदा नीति !
कलंकाला ती म्हणे अलंकार ! | प्रीति वेडी यांतलें हेंच सार !
सुशीलेची पाहून गर्ववृत्ति | खिन्न झाला जरि चारुदत्त चित्तीं,
तरी तेणें तो रुष्ट न हो झाला, | कधीं नाही विसरला स्वप्रियेला
म्हणे ' चंद्राला लागला कलंक, | पद्मजन्माचें स्थान नीच पंक;
रम्य रत्नीं काठिन्य भरुन राहे, | सदा अस्तोदय तारकांस आहे;
गुलाबाला व्यापिलें कंकटांहीं, | केतकीला रस ठाउकाच नाही;
रम्य जें जें जगतांत दिसत आहे, | तयामाजी वैगुण्य नांदताहे !
उणें नाही ज्यामाजि कांहिं ऐसें | एक देवाचें स्वत्व † मात्र भासे !
आम्हि अन्योन्यां व्यर्थ गौरवावें | व्यर्थ निंदाया पुढें पुढें व्हावें !
रूप, यौवन, गुण, कलाज्ञान, विद्या । यांत हीच्यासह मूल नसे सध्या !
जरी अभिमानें युक्त थोडकी ही । तरी इतुका त्यामाजि दोष नाहीं ! '

* * *

मनें चिंतीली एकवार भार्या । वरो अपणा ती वरो न वा आर्या;
स्वसा साऱ्या तिजविना ! हाच अर्थ । खिस्तवचनाचा करी चारुदत्त !
' स्वार्थ राहो, परि परीं ‡ स्वत्व सारें । दिसे जेणें, तें प्रेम जमविणारें
विवाहाला, ईश्वरी योजिताला, । त्रिवर्गाच्या ¶ सुखदायका पथाला !
अशा प्रेमाचें बीज देव पेरी, । तोच त्याची काळ्जी वाहि सारी;
तोच सुफलित त्याजला करून घेतो, । हेतु अपुला सिद्धीस तोच नेतो !
अन्य पुरुषाची जोंवरी सुशीला । नसे, गेली जों न ती अव्ययाला; §
तिच्यासाठीं प्रार्थीन ईश्वराला, । पुढें वाहिन हा देह सदा त्याला ! '
असा निश्चय करुनियां तो कुमार । काळ कंठी, मानसीं खिन्न फार;
दोन वर्षें लोटलीं; सुशीलेची । वृत्ति पहिली तैशीच निर्दयेची !

---

* अन्वयः तया ती गर्वांधा, मानिनी दिसे. † व्यक्तित्व. ‡ दुसऱ्याच्या ठिकाणीं. ¶ धर्म, अर्थ आणि काम यांच्या. § जोंपर्यंत ती चिरंतन स्वरूपाला गेली नाहीं ( जोंपर्यंत तिनें देह ठेवला नाहीं. )

*     *     *

पूर्ण झाली की उषेची प्रभात, । कळीलागीं हो पुष्पपणा प्राप्त
कविस्फूर्तीला काव्यपणा आला । यौवनाढ्या * परिपूर्ण हो सुशीला!

*     *     *

मूल रुसलीं सोडिलें गृह तियेनें, । मायबापांला होय खेद येणें;
अंतिं त्यांनीं तिज सांगितलें, 'बाई! । नसे लग्नाची तुझ्या कांहिं घाई;
तुझ्या इच्छेनें लग्न तुझें होवो, । तुला सुख व्हावें हाच मनीं भावो †–
असे असुच्या, कां उगी रुष्ट होशी? । दुःख आम्हां वृद्धांस किती देशी?,
मायबापांची अशी दीन वाणी । कुणाच्या हो नेत्रां न आणि पाणी?
सुशीलेचे परि अश्रु अहंकारें । रुद्ध केले जागचे जागिं सारे!
मायबापांला शरण आणियेलें, । अंतिं म्हणणें आपुलें खरें केलें,
हाच मानी ती धन्यपणा झाला! । हाच दावाया निघे ती गृहाला!

*     *     *

गृहा आली परि अतां ती निराळी! । सुशीला तीं पहिली न राहियेली!
भीति बहिणी त्या तिच्या तिला भारी, । भाउ राहे सर्वदा दुरीं दूरीं!
राग येइल बाइला लाडकीला । धाक ऐसा सर्वदा माउलीला!
बाप टाकी पाहून तिज उसासा । 'काळ आला विपरीत--' म्हणे '—कैसा!'
तिच्या भावाचा चारुदत्त मित्र, । तिला वाटे दर्शनाही अपात्र!
पाप त्याचें हें एवढेंच झालें, । तिला त्यानें आपुली मानियेलें!
मित्रदर्शनलालसा तया भारी, । परी त्यानें ती संयमुनी सारी
तिच्या प्रीतीस्तव गेह वर्जियेलें. । मनीं तिजला त्याजला स्थापियेलें!
अशा रीतीनें दोन मास गेले, । गृहीं पहिलें सुख त्या न राहियेलें;
स्त्रियांमधला स्त्रीपणा जें हरीतें । असो ऐशा धिक्कार शिक्षणातें!
विनय, शांती, धृति, सहिष्णुता, प्रीति, । सदा परमेशीं एकनिष्ठ भक्ति
स्त्रियांचें हें सौभाग्य अहंकारें । हरुन न्यावें! विद्वत्व हें कसें रे!

---

* यौवनसंपन्न. † भाव, हेतु.

एक दिवशीं आनंदभरें बाला । करित असतां निजविभववर्णनाला
तिच्या भावाचें वृत्तपत्र* आलें, । चित्त तीचें सोत्कंठ फार झालें.
म्हणे 'झालें उत्तीर्ण परीक्षेंत!' । ऐकुनीयां हर्षले बंधुतात;
विजयिनामावलि वाचितां परंतु । सर्व आशेचा क्षणें होय अंतु† !

तिला न कळे हें कशानें जहालें । तिनें दैवाला दोष लावियेले !
वृत्तपत्रा घेऊन पुन्हा हातीं । तीच नामावलि बघे वाचुनी ती !
चारुदत्ताचें नांव पाहियेलें, । म्हणे, याचें हें दैव फळा आलें !
दोन वर्षें याजला नसे शाला, । कुठुन येणें एन्हवीं विजय याला !

* * *

जगत अपणाविण दिसावें लहान, । असें आहे अंधत्व एक जाण !
अशा अंधा गर्वांध नाम देती, । व्यर्थ अवघीं औषधें त्यास होती !
सदा रमली निजदर्शनींच दृष्टि, । सदा अपुल्या वर्णनीं मना तुष्टि;
कोप परगुण पाहतां मना येई, । गर्वरोगाचीं लक्षणें अशीं हीं !
ज्यास जडला हा महारोग, त्यातें । बरा करणें हें साध्य ईश्वरातें !
तया मात्रा तोच दे विपत्तीची, । रोगहरणी विख्यात कीर्ति तीची !

* * *

असो; दैवें पाहिलें त्या मुलीला, । अहंकाराच्या तिच्या सर्व लीला;
एक महिनाभर मृत्युशीं सुशीला । झुजत राहे नच भान तिचें तीला.
माय रात्रंदिन तिची तिच्यापाशीं, । बाप सांभाळी दुज्या लेंकरांशीं;
भाउ वाही संसारभार, त्याला । साह्य करण्याला चारुदत्त आला.
देइ बाळाला माउली कषाया‡ । वृक्षशाखेवर माळि घालि घाय¶!
करी शिक्षा भक्तांस देवराय, । इथें प्रेमाविण अन्य हेतु काय !

* * *

बरी झाली मानिनी, परी गेलें— । तिचें सारें सौंदर्य लया गेलें !
कांति चंद्राची ती तिच्या मुखाची । स्वप्नसृष्टीसम जाहली सदाची !

---

* वर्तमानपत्र. † अंत. ‡ काढा. ¶ घाव.

शुभ्र कमलावर खुले जशी लाली, । तशीं होती जी खुलत तिच्या गालीं—
सर्व गेली ! ती कालिमा* निराळी । तिच्या गालांवर निवासार्थ आली ?
कुणा तरुणीचा असा रूपनाश । दुजा वर्णो कवि कुणी सावकाश !
नको मजला, तें साधणेंच नाही ! । स्तब्ध मति त्या चिंतनें मात्र होई !
'जीव किंवा सौंदर्य, काय देशी ?' । असें पुशिलें जरि कुणी मानिनीशीं
तरी देइल ती जीव ! नसे शंका । मला वेडा तुम्हि कुणी म्हणाना कां ?

* * *

सुशीलेचे परि दिव्यचक्षु आले । अहंकारें जे पुरा † असति नेले;
प्राप्त पहिलें सौंदर्य तिच्या चित्ता । 'खरी देवाला-' म्हणे '—माझि चिंता !
दूर केला त्यानेंच मनोव्याधि, । मला पूर्वी जो पदोपदीं बाधी;
करी पीडा जो जवळ येइ त्याला, । तरुण वृद्धाला, भल्याबाइटाला !'
कोणकोणा दुखविलें कधीं कैसें । स्मरुन दुःखें ती टाकिते उसासे;
'वधस्तंभाला आपुल्या प्रभूला,' । रडे, म्हणुनी, 'मीं कितीदां खिळीला !
कसा माझा मीपणा देव झाला ? । कशी अंतरलें आपुल्या पित्याला ?
तरी गणिलें मी परमभक्तिशील ! । कोण माझी जागीं बरोबारि करील ?'
करी ऐसे ती किती तरि विलाप ! । म्हणे 'केलें मीं फार घोर पाप !'
देह अनुतापें करपलाचि तीचा । न हो तितका व्याधिनेंहि ‡ सतीचा !
गरल अन्नीं मिसळलें तिच्या जेवीं ! । तिच्या तल्पा¶ अनुताप§ आग लावी !
अश्रु तीचे ते जशीं नवीं मोत्यें । किती आवडलीं सांगु ईश्वरातें !
तोच तिजला उचलून जवळ घेई । पुन्हा तिजलागीं, प्रसन्नता देई;
परम सुंदर जाहलें तिचें चित्त, । धन्य झाला निजमनीं चारुदत्त.

* * *

'दला छिद्रें पाडिलीं कीटकांहीं, । म्लान झालें, मधु बिंदुमात्र नाही;
अशा कमला कोणता अलि विचारी ? । प्रेम जगतीं ही मना भ्रांति सारी !

---

* रक्तहीनतेमुळें आलेला काळसरपणा. † पूर्वी. ‡ शारिरीक दुःखानें.
¶ अंथरुणाला § पश्चाताप

वपू,* विद्या, वक्तृत्व, वस्त्र, वित्त । वकारांना या लब्ध मनुजचित्त !
चित्त देवा पाहिजे, नको कांही ! । मला देवाविण कुणी जगीं नाहीं.
रूप असलें घेऊन कुठें जावें ? । मला वाटे गिरिकंदरीं दडावें !'
म्हणत ऐसें ती कुमारी निघाली । घरापासुन काननीं दूर गेली.
म्हणे ' एकान्ता ! तूंच बंधु माझा ! । मित्र माझा तूं ! गड्या धनी राजा
तुझ्यासंगें कंठीन आयु आतां ! । तुझ्यासंगें सेवीन जगन्नाथा !
तुझ्यावांचुन मज कोण विचारील ! । मूर्त दुर्भाग्या मला रे वरील ?
सख्या एकान्ता ! सोडुनी जगाला । सखा जीवाचा तुला मानियेला !'
सदा एकान्तीं रमे ती कुमारी, । गृहीं नच सुख जें तिला वनविहारीं;
नको दर्शन नरनारिचें कुणाचें ! । मनीं बाणे निवृत्ति पुरी तीचे.

* * *

बंधु लोकीं विख्यात जानकीचा ! वृक्ष ऐसा जो रम्य अशोकाचा;
तोच बंधू मानून तयापाशीं । करी युवती एकदा विलापाशीं—
' मायबापांचा लाडका, पसंत !' । म्हणे, ' कोठें तो अतां चारुदत्त ?
काय माझ्या विसरून जाय नांवा ? । भितो माझ्या मीपणा अजुन किंवा ? '
मुखांतोनी हे शब्द जों निघाले । तोंच ऐकूं तिज वाक्य असें आलें—
' सदा सेवेला सिद्ध तुझ्या आहें ! । मनीं माझ्या तव मूर्ति सदा राहे !'
चंद्र मेघांहीं पुरा झांकियेला, । वदनिं सृष्टीच्या खिन्नपणा आला,
तोंच पुनरपि उदयास शशी येई । चकित सस्मित कुमुदिनी वनीं होई !
पुढें आला पाहून चारुदत्त । सुशीला हो भयहर्षकुतुकयुक्त !
म्हणे, ' पडतो अग्निचा वा जलाचा । अतां पाउस मजवरी मौक्तिकांचा ?
विडंबीलें याजला, आज त्याची । फेड करितो हा पुरी पुरी साची !'
म्हणे, ' याची निःसीम खरी प्रीति† । आज किंवा मज होय लाजवीती ?'

* शरीर, शरीरसौंदर्य. † अन्वय : किंवा आज याची खरी निःसीम प्रीति मज लाजवीती होय ?

युवा पुढती येऊन उभा राहे, । तिला वाटे हा रोषभरें पाहे !
मनीं तीच्या कल्पना तशी त्याची। दिसे चर्या तिज, न ती तशी साची !
म्हणे ' कळला तव हेतु ! बोल ! बोल !। क्षतें हृदयींचीं करीं बघूं खोल !
अशानें तरि जाईल हें फुटोनी !। तयासंगें आयुष्यही तुटोनी !'

* * *

चारुदत्तानें तिचे हात दोन्ही। अतिप्रेमानें निजकरीं धरोनी
तिच्या पायां न्हागिलें आसवांहीं !। उभयपक्षीं क्षणमात्र शब्द नाही.
मधुर वाणीनें तिला युवा बोले,। ' सुशीले ! तूं मज नाहि ओळखीलें !
रूपयौवन हें काम्य, परी प्रीति,। न गे यांवर निजजीव सांवरीती * !
शुक्ति नलगे मज हवें खरें मोतीं। रूप नलगे तव, हवी तुझी प्रीती !
पात्र सोन्याचें असो मृत्तिकेचें,। वेड मजला आंतल्या अमृताचें !
सुशीले ! तूं मज सांग तुझी माता। तुला कमती प्रिय मानि काय आतां !
अगे वेडे ! हीच गे तव विपत्ति। तुझ्यावरची वाढवी तिची प्रीति !
तात तुजला मानितो कशी सांग,। काय करिती तव बंधुभगिनि, राग !
असो त्यांचें; परि किती ईश्वराचें। प्रेम कमि झालें सांग बघूं साचें !
तुझें पाहोनी दुःख, तुझ्या ठायीं-। प्रभुप्रीती वाढली न का कांही !
कमी माझी होईल कशी सांग,। स्पष्ट वदण्याचा नको मानुं राग !
जया वल्लीला तरुवरें वरीलें। तेज तीचें जरि सर्व लया गेलें;
तरी काय तिला झुगारून देतो-। दूर तरुवर, सुंदरी ! मज वदें, तो !
प्रेमदृष्टी सौंदर्य म्हणे ज्यातें,। अन्यदृष्टीला दिसेना तसें तें;
जगीं जन्मवरी तूंच अद्वितीय। मला सुंदर दिसशील वंदनीय !
सुशीला तूं आहेस तशी मातें। जरी दिधली प्रेमलें जगन्नाथें
काय सांगूं ! तुज शिरीं वागवीन !। प्रतिक्षण गे त्याजला मी स्तवीन !

---

* सांबरीते.

शेवटीं मी सांगतों एक नूतें । तुझें परक्याचें नको मशीं नातें
तीन * नात्यांतून एक कोणतेंही । जोड, होईल मज मान्य, बोल कांही !'
' अतां मजला सांभाळ सख्या नाथा !' । शब्द इतुके बोलून अश्रुपाता-
करी स्कंधीं त्याचिया, जणूं त्याला । स्वयें प्रणयें अभिषेक आज केला !

* * *

झालें मंगलकार्य—ती गृहवती झाली सुशीला सती !
झालें मंगलकार्य— वैभव नवें ये चारुदत्ताप्रती !
झालें मंगलकार्य— देव निवडी संयुक्त त्यांना करी !
झालें मंगलकार्य— पूर्ण फुलली ही प्रेमवल्ली खरी !

★

## गुच्छ पांचवा — माझी भार्या

[ हें काव्य १८८७ सालांत प्रसिद्ध झालेलें आहे. तें कवीकडून बरेंच सुधारून घेऊन येथें दिलें आहे. या काव्याच्या प्रथमावृत्तीच्या शेवटीं हा श्लोक दिलेला आहे—

केलें काव्य, परन्तु यांत मम हो सम्बन्ध कांही नसे,
मित्रांनो ! जरि वाचितांच अपुल्या वाटेल चित्ता तसें
येथें नायक काल्पिला करितसे भार्यागुणांची स्तुति,
तेणें ती नकळे मदीय अथवा मद्देहिनीची स्थिति !

यावरून हें काव्य केवळ कल्पनेची लीला आहे, किंवा कवीच्या स्वानुभवाचा प्रवाह आहे, हें ठरविणें कठीण आहे.—संपादक ]

त्रिवर्गाची† दात्री, भवजलधिची केवळ मुदी,‡
सुखा दुःखा हस्तीं धरुन बसलेली सबलधी;
जिच्यायोगें लोकीं शुभ अशुभ हें कर्म घडतें,
तया स्त्रीजातीला मम मति मुदा आधिं नमितें !

---

* आई, बहीण, पत्नी. † धर्म अर्थ आणि काम यांची. ‡ चांदणें.

नमीतों मातेला–जगत गणितें दैवत तिला;
नमीतों कांतेला–नृपपद उणें जीस तिजला;
नमीतों मैत्रीला–परगृहगताही* भगिनिला,
नमीतों कन्येला–सतनु ममता तीच विमला !

मला कोणी कोणी उगिच जन हे स्त्रैण म्हणती
न जाणोनी, कीं स्त्रीपुरुष मिळुनी दोन नसती;
अहा ! अंगें जीचीं, अनुपम अशीं शक्ति विलसे ;
पसारा तीचा हा ! तिजविण कुठें कांहिच नसे !
असो, हें राहूं द्या; परि खचित सांगा मज कुणी,
कुडीला जीवानें अलग गणणें काय म्हणुनी ?
मला सांगा वाणीसह युत सदा अर्थ असला
म्हणानी तो स्त्रैण प्रकट† बुध, हा न्याय कसला ?

असो हेंही; माझ्या प्रिय सखिस मी प्राण गणितों,
गणीतों कंठींचा प्रिय अतुल, निर्मूल्य मणि तो !
अहा ! याची आहे रसिक जनहो कारणतति‡,
पुढें ठेवीतों ती सविनय, पहा मात्र पुरती !
न चन्द्राची किंवा मुख न कमळाची करि सरी,
न वर्ण स्वर्णाचा लवहि दयितेचा मद हरी;¶
न तीच्या मध्याला बघुन हरि रानांत लपला,
अती साधी, रूपें, प्रिय मम सखी एक अबला !

नटावें कैसें तें मुळिंच न कधीं ठाउक तिला,
न ती वेडी भोळी शिकलि कधिं मत्तेभगतिला !§
विलासांनीं युक्त स्मित नच तिचें, तें सहज ये,
कटाक्षक्षेपाची रुचिर सरणी ती तिज न ये !

---

* लग्न होऊन दुसऱ्याच्या घरीं गेलेली असतांहि. † स्पष्ट, उघड उघड (स्त्रैण शब्दाचें विशेषण) ‡ कारणसमूह ¶ दयितेचा वर्ण स्वर्णाचा मद लवहि न हरी (दूरान्वय दोष) § उन्मत्त हत्तिच्या चाली.

उषा साधी, स्मेरीं* भरित मधु† साधेंपण तिच्या
अहा ! हारी साधी म्हणुन मन सायंतनरुचा‡
स्वभावोक्ती साधी म्हणुनच अलंकारिं सरसा,
प्रिया माझी साधी म्हणुन मम तो स्वर्गच जसा !

तिची वाणी साधी परम मधुरा यास्तव मला !
रहाणी ती साधी म्हणुनच तिला-जीव भुलला !
जशी सृष्टी तुष्टिप्रद सरल, अव्याज म्हणुनी,
तशी माझी वाटे मज सुखद ती रम्य गृहिणी !

मुखीं शांति, प्रीती विनय अकृतोपाय¶ दिसती,
अहा नेत्रीं तीच्या सतत सहजानन्द वसती !
अहा औदार्याचें प्रियसदन तें भाल दिसतें, !
कपोलीं साध्वीच्या शुचि, विमल माधुर्य रमतें !

सुवर्णा ज्या कामी, कृपण, अथवा चोर विकले,
सुवर्णी त्या माझें अनुरत कधीं चित्त कसलें ?
करी ज्याच्या योगें मजसि अपुला याचक जसा !
सुवर्णा त्या तीच्या जगिं न उपमा लभ्य सहसा !

कवि प्राणा देती-कवि§ म्हणाति-सौन्दर्य बघतां,
प्रभू सौन्दर्याचा जगदधिप विश्वेश रचिता;
न मी निन्दीं त्याला, समज उलटा हा नच करा,
न मी सांगायाला सबल अपुलें चित्त इतरां.

वरी शुक्ती मोठी सुबक, तरि ती गण्य न मला,
तिच्या पोटीं मुक्ताफल मम तया जीव भुलला !
बरा जो पीयूषें दिसत मज मृत्कुंभ भरला,
न रत्नस्वर्णाचा मधुरहि जलाचा घट भला !

---

* स्मितांत. † मधुर. ‡ संध्याकाळची शोभा. ¶ अकृत्रिम § 'Poets die for beauty' हें मिसेस ब्राउनिंगचें वचन आहे.

पहिल्या दोन ओळींचा अन्वय : उषा साधी; तिच्या स्मेरीं मधु साधेपण भरित (असे). अहा ! सायंतनरुचा साधी म्हणून मन हारी.

‘ अरे, वेड्या गोळा पदरिं पडला, त्याप्रति जरी
असा जीवापेक्षां अधिक जपसी मोहुन, तरी
किती नेणों रम्भा मिळति मग होतासचि पिसा,’
अशा छद्मोक्तीनें किति जन मला टोंचिति जसा.

न वाटे रम्भांचें कुतुक मजला रेसभर तें,
पुढें तीच्या त्यांचें सकल सरतें तेज, नुरतें !
कलांचा रूपांचा किति जरि मुलामा चढविला,
खरें जें त्याची ये तरि कधिं तयाला नच तुला !

स्वभावांतोनी जें, नच कधिं गळ्यांतून निघतें
अशा गाना* रम्भा अपरिचित, हें ज्ञात पुरतें !
प्रिया माझी गाते मग सकल हें विश्व डुलतें !
अहा अन्तःसृष्टी हसत सुटते ! पूर्ण फुलते !

कुणा नाही ठावें, परि मम सखी नर्तनपरा !
तिच्या नृत्यीं झाला मजसि दिसला खण्ड न जरा !
सदा प्रेमें तीचें हृदय भरलेल्या नदिपरी
पुढें माझ्या वाहे मधुनिमधुनी तांडव करी !

अशा या नृत्याचें मिळवुन न वैदग्ध्य † मिळणें,
शिकोनी रम्भांना नच असतिना हें उमजणें !
कला त्यांची त्यांना, असतिल तयांचे अनुग ‡ जे-
तयांना, आम्हाला अरसिक जनां काय समजे ?

तपस्या भंगावी, सुमति गत व्हावी, सकल भा- ¶
विरावी, कीं व्हावी अशुभसरणी § मात्र सुलभा;
असें तें रम्भांचें अमरनुत || लावण्य असलें,
तरी तें व्हावें हो मज अरसिका मान्य कसलें ?

---

*अन्वय : जें स्वभावांतोनि-- ( निघतें ) गळ्यांतून कधीं नच निघतें अशा गाना. † कौशल्य ‡ अनुगामी अनुयायी. ¶ प्रभा, तेज. §अकल्याणाची परंपरा. || देवांनीं वाखाणलेलें.

जिच्या लावण्यानें तम दुर पळे, चित्त उजळे,
उषेच्या लावण्यें जगत उजळे जेविं सगळें!
असो काळी गोरी, त्रिभुवनिं तिचें रूप वहिलें! *
निळें वा गोरें वा मज पुरवलें रत्न † असलें!

जगीं निर्द्रव्याला जनकहि गणा शत्रुच जसा,
न देती मानाला, समजति तया बान्धव पिसा;
जगो किंवा जावो मरुन जग त्याला नच पुसे,
तयाची भार्याही बहुतकरुनी त्या छळितसे.

परी माझी भार्या सकलधन जीचें स्वपति ती
अहा! या दारिद्र्या परमसुखदायी म्हणविती! ‡
अशा या अन्धारीं ममगृहशशी तो उगवला,
द्रवे ज्याच्या तेजें उपल ¶ मजऐसा नरमला, §

जियेची आहे कीं मजवरति निष्काम ममता,
सुखीं वा दुःखीं वा अवगत न जीतें विषमता;
सखी माझी ऐशी मज गणितसे प्राण दुसरा!
अशी भाग्यें हीना || सहज मिळणें-गोष्ट विसरा!

अहा प्रीती प्रीती म्हणुन धरुनी वृत्ति भलती
करीती नृत्यातें विकट नरनारी जगिं किती!
जळो तें कामाचें विलसित! पुरा कौशिकमुनि
अशा या प्रीतीनें अधम ठरला हाय! अजुनी!
अशा या प्रीतीनें भट,+ बुध, मुनी, भूप फसले,
अशा या प्रीतीनें यश, गुण, सुधी सर्व रुसले!
अशा या प्रीतीनें जगतिं किती झाली कुलहति ʃ!
अशा या प्रीतीनें अरसिक खुलेना मम मति!
अशा या प्रीतीनें अमरपातिचे हेतु पुरती,
अशा या प्रीतीनें तरि न जित वेडी मम मति,

---

* पहिलें † रत्न निळें (म्हणजे नीलमणी असो, गोरे (म्हणजे हिरा) असो, तें रत्न असलें म्हणजे झालें. ‡ म्हणवितें. ¶ दगड. § मऊ झालेला, मऊ होऊन. || अभाग्याला + वीर. ʃ वंशक्षय.

अशा या प्रीतीनें प्रिय न मजला माझि गृहिणी,
तिचा प्रीती माही अवगत कुणालाच अजुनी !

तिच्या त्या प्रीतीनें मजपुढतिं शुद्धत्व विलसे,
तिच्या त्या प्रीतीनें कृपणपण सारेंच निरसे;
तिच्या त्या प्रीतीनें विलय बघतो स्वार्थ अवघा,
तिच्या त्या प्रीतीनें मम सकल हो वृत्ति अनघा *

तिच्या त्या प्रीतीनें शुभमय जगीं स्त्रीत्व दिसतें,
दिसे तें स्वर्गींचें धरणिवरचें दिव्य नुसतें !
कशाचें स्वर्गींचें ? अहह ! चुकलों, त्याहुन किती—
विशुद्धची प्रीती अभिनव सदा, उच्चतर ती !

विचारोच्चारांना लवभरहि जे आकळति ना,
अहा ज्याचे त्याला ! इतर कवणाला कळति ना;
असे कांही कांही अनुभव, तयांमाजि पहिला
तयाला प्रीती मी म्हणत, उपमा नाहिं हिजला !

अशा या प्रीतीची कधिं न सरणारी खनि सती
मला लाधे, तींची किति किति तरी गाउं महती;
नको कांही ! नाही तिजविण अपेक्षा जगिं मला !
हसा ! निंदा ! बोला ' विगतलिमती मूर्ख कुठला !

प्रियासाठीं 'मी'† चा विसर पडणें हेंच पहिलें
स्ववृत्तें ‡ प्रीतीचें मज शिकवि ते ¶ लक्षण भलें,
दिसेना कीं मानी पति म्हणुन ती दैवत मला,
मलाही पूजेची रुचि न, रुचते प्रीति विमला !

तिचा स्वामी मी, ती ममचरणदासी न अथवा,
न देतें हें नातें तिज मज कधींही सुखलवा;
**खरी प्रीती, सेवा उभय अनवद्या § सहचरी !**
हिला ती, तीला ही, त्यजुन वसती ना क्षण दुरीं !

---

* निष्पाप. † 'अहं'भावाचा. ‡ आपल्या वर्तनानें. ¶ ती. § वाखाणण्या सारख्या.

अणूंहीं केलेलें वितत अवघें हें जग जसें,
मिळोनी झालेलें लघु लघु कृती जीवित तसें;
ममत्वाच्या लाटा मृदु लघु असंख्यात उठती
गृहार्थी मर्त्यीं * हे अमरहि सुखानें वितरती ! †

तिच्या अल्पा स्वल्पा कृति, लघु तिचीं चाटुगदितें ‡
तिचीं प्रेमस्वप्नें मनिं, नयनिं, वाणींत उदितें; ¶
तिच्या दीनासाठीं अविरत दयेच्या लघु कृति,
तिचे ते हेतू जे सहज हळु बाहेर पडती.

तिचें थोडें थोडें पडत हसुं जें बाहिर पडे;
तयासंगें थोडें मिसळत मिळे जें मृदु रडें;
तिचें थोडें थोडें रुसुन बसणें, तें त्यजुनियां–
पुन्हा रंगीं येणें परि धरुनियां पूर्ण विनया.

तिचें थोडें थोडें नकळत मला बोध करणें,
मला थोडें थोडें परि दृढ सुमार्गांत धरणें;
तिचें थोडें थोडें अमृतकण सारें चरित तें !
अनन्या रत्नांची खनि मज वृथा ती न दिसते !
प्रसू§ बाल्यीं गेली त्यजुन अमराच्या वसतिला,
नको शंका, चिंता छळि मम तिथेंही सुमतिला !
तिच्या त्या चिन्तेचें हरण करणारी तिज परी
सखी माझी भेटे सदय गृहिणी एकच खरी.

नका ठेवूं नांवें मम वचन ऐसें परिसुनी.
पुरा बोलीजेले गृहिणिसहि भोज्येषु जननी !||
समस्तां नात्यांची दिसत मज ही पूर्ति सुमति !
प्रतीती ही माझी परि तिजहुनी हीहि कमती !

---

* मर्त्य लोकीं. † उतरतात-अवतार घेतात. ‡ गोड भाषणें. ¶ उगवलेलीं, दिसून येणारीं. § आई. || 'कार्येषु मंत्री वचनेषु दासी । भोज्येषु माता' इत्यादि श्लोक प्रसिद्ध आहे.

अहो तत्त्वज्ञांनो ! किति जरि समीक्षित गढलां
तरी तो आहे का अनुभव घडे जो मधु मला ?
सखी माझी द्वैतीं विमल मज अद्वैत पढवी !
न राहे धन्या ती पढवुन परी अर्थ पटवी !

पुरे झालें; भूती अनुपम अनिर्वाच्य सतिची,
यजावें वर्णू ही पुरि मम परीक्षाच मतिची !
क्षमा कीजे आर्ये ! तुज न रुचते त्वद्‌गुणनुति*
करूं कैसें ? माझ्याकडुन दुसरे हें करविती !

अरे माझ्या मित्रा, चतुर सचिवा, हे गुरुवरा,
प्रिये शिष्ये, भार्ये, मम सकल रे पुण्यनिकरा !
पहा हे प्रेमाश्रू तव चरणयुग्मीं वितरती !
मनोवृत्ती माझ्या मधुसुमनवृष्टीच करिती !

★

* तुझ्या गुणांची स्तुति.

## १ : महारथी

तुझ्यासम महारथी बघुन एकला निष्क्रिय,
अहर्निश मला गड्या, परमदुःख हो विस्मय;
पुढें रथ विलोलसा,* सुखद, दिव्य संसार हा!
पहा, न मुनिसारखा जगीं उगा बसोनी रहा.

बनेन तव सारथी तुज जपेन जीवापरी,
असो सरल मार्ग, वा गिरी असो, असो वा दरी;
जगज्जनकयोजना, तशि मदीय उद्योगिता
रथा सबल अश्विनि,† करुं नको विलंबा अतां!

पहा 'इह' 'परत्र' हीं उभय रम्य चक्रें किती!
न केवळ विभूषणें, परि रथास देती गति;
सदा तुजपुढें उभा जुळुन मी करां सारथी,
त्यजून भय, हो पुढें! धर बघूं सुवीरा धृति! ‡

तुला मृदु विशेषणीं कवि सदैव संबोधिती,
म्हणून दिसतें मला तवहि भीरु झाली मति;
पुरे! त्यजुनि मोह हा समजुनी स्वरूपा निजा
स्वकार्यरत हो बघूं! अनुग सारथी मी तुझा!

★

## २ : नर्तन

[चाल : शारदे दासकामदे० ]

नर्तना। हर्षवर्तना!। करीना प्राणी,।
नच दुजा अभागी त्यासम जगिं कोणी!

ही धरा। दिसे सुस्थिरा,। तरी ही नाचे,।
रविभोंतीं चालू रंगण हें हीचें।

---

* चंचल, गतिमान. † घोडी. ‡ धैर्य.

हा शशी, । पहा दिननिशी, । पृथ्विच्या भोंतीं ।
करि नृत्य, नाचवी तयां हिची प्रीति !
हे खगोल वेडेपिसे-भासती !
हे सदा नाचती ! कसे-हासती !
क्षणविश्रान्तीची नसे-यां स्मृति.
बघ गडे, । या ढगांकडे, । नाचती सारे, ।
ही नाचे चपला, नाचतात वारे ! १
पशुपक्षि । नाचती लक्षि, । अरण्यहि नाचे, ।
हे चलतृणांकुर* पुलक† जणूं याचे !
तरुलता । नर्तनीं रता, । नाचती पानें, ।
हे भ्रमर नाचती, नाचतात सुमनें !
या सरिता नर्तनपरा-पाहातो,
हा सागर, लहरी‡ खरा-नाचतो,
हा प्रेमें नारीनरां-सांगतो,
मज नृत्य, । आवडे नित्य । असो सज भरती, ।
कीं खुशाल जावो रुसून ती परती ! २
बाहिरी । तसें अन्तरीं । नाचतें सारें, ।
जा मनःसृष्टिला विचार भरभारें !
नाचती¶ । मुदा अनुरति§ । तीच संसृति || !
हे लोक जीमधें रंगुनियां जाती !
दे सोडुन वेडेपणा-ये पुढें !
कर माझ्या करपीडना + !-ये ! गडे ! ʃ
करुं, सन्तन चल नर्तना-यापुढें !
इहपरत्र । चालवूं सत्र । नृत्यगानाचें !
हें कार्य आपुलें प्रेमसुधा प्याल्यांचें !× ३

---

* हलणारे गवताचे अंकुर. † रोमांच. ‡ लहरी स्वभावाचा; किंवा लहरी म्हणजे लाटांनीं युक्त. ¶ नाचते. § अनुराग, प्रीति. || संसार. + करग्रहणा. ʃ माझी जोडीदार म्हणून माझ्या हाताचा स्वीकार कर; माझा हात धर. × प्यालेल्याचे.

## ३ : मानिनीचें वेडेपण

[ चाल—वीरा भ्रमरा०

[ आपण मनानें वरिलेल्या आणि ज्याच्याशीं आपला विवाह ठरला आहे अशा पुरुषाला आपल्या मानी स्वभावाला अनुसरून क्षुल्लक कारणानें दूर करणाऱ्या एका तरुणीची विरहव्यथा व पश्चात्ताप हा या कवितेचा विषय आहे. —संपादक. ]

प्रेमस्पर्शें पाणी पाणी हृदयाचें जाहलें,
वहाया नयनांतुनि लागलें;
याच जलानें तरू एक मीं आनंदें शिंपिला,
धरी तो मधुर मधुरतर फुलां !
तीं फुलें धरीं मी प्रेमभरें उरिंशिरीं,
तीं मला लाधलीं अपूर्व रत्नें खरीं,
मी जपलें त्यांना रात्रंदिन किति तरी,
विचित्र लीला अविवेकाची, तरूस त्या खांडिलें
मीच या हस्तांनीं आपुले !

फुलें वेंचिलीं, कोमुनि गेलीं पाहुन नयनीं असें,
लागलें पुरेंच मजला पिसें !
नवकुंड अग्निचें चेतविलें मीं पहा !
कीं दिलें फेंकुनी त्यांत पुष्पसंग्रहा ।
ती राख फांसुनी अपुल्या देहा अहा
रडत हिंडतें संगें घेउनि नशीब हें आपुलें !
मृत्युही पाहुन मजला पळे !

★

## ४ : विरह

गगन नटलें हें तारांहीं मनोरम हें जना,
असह परि हें देतें माझ्या मनाप्रति वेदना;
नच गवसते येथें तारा मला प्रिय ती जरी
असुनि नसुनी व्यर्था साऱ्या दुज्या मजला तरी !

मधुर कुसुमें हीं उद्यानीं स्मिता करिती किती,
कितिक हसती बोलावीती किती रसिकांप्रती
परि सुमन तें माझें सोधें दिसे न मला इथें !
अरसिकच मी येथें माझें न हो मन लागतें !

सतत नटली ही रत्नांहीं अनर्घ्य * वसुंधरा,
प्रिय मम परी रत्नाला ही न दे, स्मयनिर्भरा †
मज म्हणतेस हें घे तें घे, खरोखर ही पिशी,
हिजसि न कळे सौंदर्याची प्रसू ममता कशी !

सरस सरला सालंकारा नव्या गुणसुंदर
कृति मजपुढें मांडीती हे उदार कवीश्वर;
परि मज जिनें वेडा केला न ती मज दाविती,
अरसिक पुरा अन्यीं मी हें कवीहि न जाणती !

बुध म्हणति कीं या काळाच्या तटीं दुसऱ्या वसे
प्रिय तुजसि तें, जा तूं तेथें उपाय दुजा नसे;
मम मन परी गेलें आहे पुढें परतेल तें—
कधिं तिथुन, हें सांगा आधीं मला बघुं जाणते

★

---

* अमूल्य ( संबंध 'रत्नांहीं'कडे † आश्चर्यपूर्णा.

# ५ : शुद्ध प्रेम आणि वियोग

( मंदाक्रांता० )

उत्साहाचा कर धरुनियां शुद्ध अव्याज चित्तें
जेथें प्रीती अविरत अहा चालवी ताण्डवातें;
दीप्ती ज्यांची अनुपम मला अर्पि संजीवनाला,
नेत्रें कैशीं विसरुं तरि तीं ? केवढा घोर घाला !

मोठे मोठे विलसति जिथ हेतु संवेदनाहि, *
कार्पण्याचा † लवभर जिला स्वप्निंहि स्पर्श नाही;
आतां माझ्या नयनपार्थी ती भ्रूस्थली ‡ ये कशाची !
नाही नाही असह गुटिका याहुनीयां विषाची !

जेथें नांदे मति, अनुरती, धैर्य, निर्धारशक्ति,
जेथें भासे भरुन उरली उत्तमीं पूर्ण भक्ति !
ओढी जावा मम सतत तें पाहुं कोठें कपाल ?
दैवा माझे कितितरि तुवां मांडिले सांग हाल !

प्रेमावीणें दिसत न जिथें एकही दुर्विकार,
ज्यांचे बाळासम गमति ते गोड सारे विहार;
स्पर्शे ज्यांच्या विलय पुरता होय दुर्वासनांचा,
त्या ओष्ठांना मुकुन बसलों ! संपली सर्व वाचा !

तें तूझें गे चलनवलन प्रेमगंगे शुभांगी !
पाहोनीयां मनिं सहज हो पूज्यबुद्धीच जागी;
कोठें पाहूं ? जरि विमल मी तूंहि तैशी मनाची,
स्वप्नीं नाही अशिच घडुनी गोष्ट येईल साची !

वेडे जाती जणुं दिनकरा झांकण्याला करांहीं !
सर्वांची या सुमति चळली यांत संदेह नाही !
या देहाचीं विविध शकलें पाडुनी जाळिलीं तीं–
प्रेमाला या मम तरि नसे बाध ! कोठून भीति ?

---

* जाणीव, भावना. † क्षुद्रता, कंजूषपणा. ‡ भ्रूप्रांत, भुंवया.

## ६ : ओझरतें दर्शन

( चाल : अरसिक किति हा शेला० )

नायक—

ओझरतें मुख मजला । तव दिसतां किति हो हर्ष मनाला !
वीज अमावास्येला । जणुं आली क्षणभर द्योतविण्याला !
गाढतमोहृत * गिरिला । जणुं उषाच आली भेटायाला !
चंद्र ढगांतुनि आला । मज दिसला ! हसला ! पुनरपि लपला !
पर्णाआडुन मजला । हें फूल दिसे, नच उपमा ज्याला !
हस्तीं निजवदनाला । जणुं झांकुनि करिशी तूंच स्मिताला !
स्फूर्ती कविची कविला । ही भेटे क्षणभर खेदनताला † !
वंदूं दुर्मिळतेला । कीं निंदूं नकळे मज वेड्याला !

नायिका—

ओझरतें मुख मजला । तें दिसतां किति हो हर्ष जाहाला !
मेघाआडुन महिला ‡ । रवि दिसला, प्रियकर चिरविरहिणिला !
क्षणभर संग जहाला । हा मेघ-विजेचा ! नाहीं टिकला !
चंद्र ढगांतुनि आला । मज दिसला ! हसला ! पुनरपि लपला !
पर्णी झांकुनि गेला । हा पुष्पगुच्छ मम मजला दिसला !
किंवा कवयित्रीला । हा काव्यानंदच भेटुनि गेला !
वंदूं दुर्मिळतेला । कीं निंदूं नकळे मज वेडीला !

★

## ७ : कुणी सांगा बघूं नांव

( चाल : सुनो ऐ जान मन तुमको यहांसे कूच करना है )

असें कांहीं वसे विश्वीं कुणी सांगा बघूं नांव !
जिथें नांदे अहा तें हो तिथें नांदे सदा देव !
रुजे भूमींत दुःखाच्या, पिई पाऊस अश्रूंचा,

---

* दाट अंधारानें व्याप्त. † दुःखग्रस्त, दुःखानें वाकलेला. ‡ पृथ्वीला.

किती वाढे, रवी * जेव्हां तपे तेजें वियोगाचा.
धरेपासूनियां स्वर्गीं सदा राहे जिची धाव,
अशी वल्ली जगीं नांदे; कुणी सांगा बघूं नांव !

जिच्या स्पर्शें मृतालाही नवें चैतन्य लाधावें,
जिच्या स्पर्शें अहा मूकें नव्या गानांत रंगावें,
जिच्या स्पर्शें अहा अंधा दिसे सारें पुढें दिव्य,
अशी मात्रा जगीं आहे; कुणी सांगा तिचें नांव !

जगीं वेडा पिसा दावी, करी चित्तांत शाहाणा,
अहा 'मी-तूं' करी दूरों नव्या देवोनियां ज्ञाना,
सदा स्वर्गीं रमे तो हो जया लागे हिचा ठाव,
अशी जादू जगीं आहे; कुणी सांगा बघूं नांव !

★

## ८ : अगाध कांहीं तरी

( चाल : आम्रमञ्जरी तुला अर्पितें० )

अगाध कांहीतरी, । समज हें अजरामर सुन्दरी !
व्योमधरेचा चुम्बनविधि हा, ।
सरे न कल्पान्तरीं ! । समज हा अजरामर सुन्दरी !
निसर्ग आणी उषा सुहास्या
निष्कामत्वें करी । समज हें अजरामर सुन्दरी !
कोठें प्रस्तर † ! कुठें कौमुदी !
अन्योन्यीं रति तरी, । समज ही अजरामर सुन्दरी !
रूप निराळें, नाम निराळें,
अभिन्न उभयें परी; । समज हीं अजरामर सुन्दरी !
मीपण, तूंपण अपुलें म्हणजे
प्रिये एकता खरी ! । समज ही अजरामर सुन्दरी !

* संबंध 'वियोगाचा' कडे, वियोगाचा रवी. † दगड, पक्षीं चंद्रकांतमणि.

## ९ : मला काय मिळालें आहे !

( चाल : शारदे दासकामदे० )

मज कळे । काय मज मिळे, । मला आंधळे ।
म्हणुत ते कांहीं ! । मज पर्वा त्याची लेशमात्र नाही !
शिम्पला । जनें निन्दिला । म्यांच उचलिला !
त्यांतलें मोतीं । मज धन्य करी हो धन्य धन्य धनवन्तीं ! *
नच घटी कशी काय ती-पाहिली,
मति तींतिल अमृताप्रती-मोहली !
मीं उचलुन ओष्ठास ती-लाविली !
ही सुधा ! । परम सौख्यदा । जरी सर्वदा ।
जाहली माझी । तरि अधिक काय हो विश्वाच्याही राज्यीं !
सामान्य । न हें लावण्य ! । खरोखर वन्य †
तेच जे हसती । मज वेडा किंवा प्रेममुग्ध जे म्हणती;
ही प्रीतिनीतिशान्तिची-वाहिनी ‡ !
ही दुजी क्षमेची शुची § -मेदिनी ¶ !
ही पवित्र मधु हेतुची-साधनी !
सौंदर्य । रसज्ञध्येय । याहुनी काय ।
कळेना मजला, । हा देह ! जीव हा या लाभाला विकला !

★

## १० : प्रेम समाधि

( चाल : अंकित पदाम्बुजाची दासी० या चालीवर कांहींसें )

मजलां झोंप सदाची आली-प्रियतमे !
झोंप सदाची आली ग !
एकच मूर्ती नयनीं भरली । व्यापुनि हृदया ठेली ग !
एक्या स्वप्नीं मति माझी ही । पूर्ण रंगुनी गेली ग !

---

* श्रीमंतांमध्यें. † रानटी. ‡ नदी. § पवित्र. ¶ पृथ्वी; पृथ्वीचेंहि हें नांव आहे, म्हणून येथें वल्लभेला मेदिनी म्हटले आहे.

विचार अवघे कार्ये अवघीं । समाप्त येथें झाली ग !
काय जगाचें माझें नातें ? । तृप्ति जगाला मेली ग !
मला निजूं दे ! कुणी न उठवो ! । निर्दय, मज कधिकालीं ग !

★

## ११ : वेडा

( चाल : भूपती खरे ते )

हा वेडा झाला, आज जगाला मेला । कां छळितां विसरा सकल बंधुनो ! याला.
आकाश पेटलें ! वायु तयाच्या ज्वाला ! । आकाश फुल* ! मधुगंधवायु हा सुटला !

मज पुढें वाढिला सुखदु:खांचा काला† । मज सुखें जेवुं द्या! कां करितां विघ्नाला?
हे अश्रु तोंडि लावाया–घेउं द्या !
मम वेड मला हसवाया–राहुं द्या !
नच कुणी मला उठवाया–येउं द्या !
स्वप्नांत रमावें हीच आवडे लीला । कां छळितां ? विसरा सकल बंधुनो, याला !

मम चिंतन, माझें श्वसन अन्न, मम पाणी; । मम बुद्धी, हेतू विचार, माझी वाणी;
मम माझें यांच्या मागिल काढा सारें । मग कळून येईल कोठें मी परभारें !
मी बसेन विपिनीं कोनीं–यापुढें,
मजपुढें विषामृत दोन्ही–यापुढें,
मज नका छळूं हो कोणी–यापुढें,
जो जगींच नाही त्रासवितां कां त्याला? । कां छळितां? विसरा सकल बंधुनो, याला!

★

## १२ : कुणास्तव कुणीतरी

सरोष घन वर्षती, तरुलतांशिं वारा झुंजे,
विराम नच ठाउका क्षणहि नाचतांना विजे;
भयानकचि ‡ संचरे सकल सृष्टि हो घाबरी
कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरीं !

---

* फुलतें † अनेक खाद्य पदार्थांचें मिश्रण. ‡ भयानक रस.

ग्रं. ७४० ... ३/१२/५

स्वप्रतिस्वामुळें बधिर जीव सारे जरीं;
निनाद करिते अहा ! श्रवण चाहुलीचा तरी; *
उठे दचकुनी तडित् दुसरि नर्तनाला करी,
कुणास्तव कुणीतरी कितिक येरझारा करी !
खुशाल कर वृष्टिला, तुज न तो भिणारा घना !
पिशाचसम तूं खुशाल कर गे विजे नर्तना !
महीधर समीरणा ! धरुनि लोळवीं भूवरी,
कुणास्तव कुणीतरी निघत यावयाला घरीं !
घनप्रसर † माजला, नभिं न एक तारा दिसे,
परंतु हसरा सदा सुखद चंद्र गेहीं वसे;
अहा द्रवविता कुणा सहज चंद्रकान्ताप्रतीं
कुणास बघुनी कुणीतरि हसेल हर्षे किती !
अहा चरणधावना कलशपूर्ण उष्णोदकें
रुचिप्रद वरान्न जें करिल हो सुधेला फिकें !
फुलांहुनि मऊ असें शयन रम्य मंचावरी,
कुणास्तव कुणीतरी घरिं अशी तयारी करी.
रसाळ वचनावली विविध तोंडिं लावावया
मिळेल, उपमा उरे मग न भोजनाला तया
पडेल मग विस्मृती सकलही श्रमांची क्षणीं,
कुणाप्रति कुणीतरी निरखितां प्रसन्नेक्षणीं !
तया प्रणयनिर्झरा प्रणयनिर्झरीला तिला
सदा सुखद भोंवरा विहरण्यास ऐसा मुला
बळेंच उठवी कुणी ! उभयतांस आलिंगुनी
कुणीतरि धरील तें विषय अन्य कैंचा मनीं !
तमास अपसारुनी उन पडेल त्या मंदिरीं,
तशांत पडतील हो मधुनि पावसाच्या सरी,

---

* अन्वय : तरी हा ! चाहुलीचा निनाद श्रवण करिते. † ढगांचा पसारा

कुणीतरि धरोनियां कर करीं कुणाचा तरी,
स्तवील परमेश्वरा जलद, सूर्य ज्याच्या करीं *

★

## २३ : आवड आणि प्रेम

( चाल : धरी रे ध्यानीं। जग अळवावरचें पाणी० )

फूल आवडलें-मज, जाउन तें मी खुडिलें,
खुडिलें, धरिलें नेत्रांपुढतीं,
हुंगुन हुंगुन केली माती,
फेंकुन दिधली ती मग परती,
एक पळ गेलें,-मम सारें स्मरण बुजालें
दुसरें दिवशीं दुसरें आलें,
मम कर्णाला भूषण झालें,
तेथुन केव्हां नकळे गळलें,
कुणीं तुडवीलें,-कीं उष्णीं करपुन रे
तिसरें, चवथें, शंभर झालीं,
जोंवर माझी लतिका फुलली,
तोंवर अपुली हौस पुरविली,
प्रेमच असलें मम पुष्पावरचें वाहिलें !
गेलीं, गळलीं म्लान जहालीं;
तीं तीं सुमनें वेंचुन नेलीं,
म्हणे मला ' हीं आजच फुललीं ! '
पिसें † हें असलें-मज रसिका उलटें हसलें !
रसज्ञतेचें याचें ‡ तेढें,
तरी वदे हें मजला वेडें §
' इथेंच जग हें चुकतें थोडें,
आवडीवाहिलें ¶ हें प्रेम न याला कळलें. '

---

* या कवितेला एका इंग्रजी कवितेचा आधार आहे.-संपादक.
† वेडें, वेड लागलेली व्यक्ति ‡ ' पिशा ' चें. § रसज्ञतेचें आणि वेड्याचें वांकडें असतें तरी हा वेडा मला म्हणतो ¶ आवडीहून निराळें.

## १ : रानांत एकटेंच पडलेलें फूल

[ चाल : नृपममता रामावरती० ]

वन सर्व सुगंधित झालें । मन माझें मोहुन गेलें–किति तरी !
मीं सारें वन हुडकीलें । फुल कोठें नकळे फुललें- मज तरी,
स्वर्गांत । दिव्य वृक्षास । बहर ये खास, ।
असें कल्पीलें- असें कल्पीलें; । मन माझें मोहुन गेलें–किति तरी !
परि फिरतां फिरतां दिसलें । फुल दगडाआड लपालें–लहानसें *
दिसण्यांत । फार तें साधें, । परी आमोदें †
जगामधिं पहिलें-जगामधिं पहिलें; । मन माझें मोहुन गेलें-किति तरी !
मी प्रेमें वदलों त्याशीं । ' कां येथें दडुनी बसशी–प्रिय फुला ?
तूं गडे । फुलांची राणी, ! तुला गे कोणीं ।
रानिं धाडलें–रानिं लावीलें ? । मन माझें मोहुन गेलें–किति तरी !
तें लाजत लाजत सुमन । मज म्हणे थोडकें हसुन
' निवाडिलें । प्रभूनें स्थान । रम्य उद्यान ।
तेंच मज झालें,–तेंच मज झालें.' । मन माझें मोहुन गेलें–किति तरी !

## २ : गुलाब

★

१

गुलाबांनो ! न्यायास तुम्हां आलों,
असें म्हणुनी मी हसत पुढें झालों;
हसुनि माना त्यांनींहि डोलवील्या;
वृत्ति माझ्या सप्रेम हालवील्या.

२

जगीं अवघ्या अनुपम्य, रम्य कान्ति,
सरस, कोमल, आनन्दमयी वृत्ति;
सुखद सौरभ, यांपुढें क्षुद्र कांटे,
कुणा त्यांचें रसिकास काय वाटे ?

३

किती पर्णांसह गुच्छ घेउनी मी
परत आलों आपुल्या सुखें धामीं;
पुष्पपात्रीं ते सर्व ठेवियेले,
सदन आणी उद्यान एक केलें !

४

जसा माझा आवास‡ तसा मीहि
धन्य झालों त्या रम्य गुलाबांहीं !
सर्व सोडोनी त्यांजकडे पाहीं !
वेळ किति गेला स्मरण मला नाहीं !

---

* ( मात्रादोष ) † सुगंधानें. ‡ निवासस्थान.

५

असो; केला मीं प्रश्न गुलाबांला,
'जन्मदेशा मुकविलें मीं तुम्हांला;
सर्व तुमचे सम्बन्धि दूर केले,
स्थलीं परक्या आणून बैसवीलें.

६

तुम्ही रमतां तरि मला रंजवीतां,
स्थला परक्याही नवश्रीस देतां;
शील तुमचें हें धन्य, गुलाबांनों!
कोण वानिल तो कवी यास वानो

७

प्रश्न ऐकुन त्यांतलें पुष्प एक
पूर्ण फुललेलें, कान्तिनें सुरेख,
पुढें होउन थोडकें म्हणे "देव-
म्हणे, कोठेंही सुखद व्हा सदैव!"

८

शब्द इतुके बोलुनी स्तब्ध झालें,
पुन्हा पहिल्यासम हसत उभें ठेलें;
जणूं प्रश्नोत्तर जाहलेंच नाही!
पुढें माझ्या निश्चिन्त असें राही.

९

मीहि सोडुन गृह दूर अन्यदेशीं
स्वयें होतों तैं अन्यगेहवासी;
मीहि वदलें "सांगतो मला देव-
जगीं कोठेंही सुखद व्हा सदैव!"

१०

पुन्हा वदलों मी तया गुलाबाशी,
"सख्या! आपण सारेच रे विदेशीं;
गेह अपुलें राहिलें दूर, येथें
देउं सर्वां, सर्वत्र, चल, सुखातें।"

★

## ३ : लेकरांची जिज्ञासा

ईषत्प्रफुल्लसुमना* करिं बाळगावें,
किंवा मृदुस्मित मुलाप्रति खेळवावें;
कीं तन्मनःकुमुद रम्य करीं धरावें,
उत्फुल्ल शिक्षणसुधांशुकरीं† करावें.
रेणूहुनीहि अति सूक्ष्म बियांत राही,
विस्तीर्ण पिप्पल, जयासम वृक्ष नाही;
या अल्प मुग्ध शिशुच्या लघुचेतसांत ‡

* किंचित् उमललेल्या फुलाला. † शिक्षणरूपी चंद्राच्या - किरणांनीं .
‡ चेतस् =मन. विकासक्षम मनांत.

नांदे तसाच गुणवृक्ष, जया न अंत !

हा बाळ पाहुन अनेकविधां पदार्थां
नाचे इसे पुसतसे वडिलांस अर्थां
जिज्ञासु हा सकल विश्व शिकावयाला,
तो धन्य ! तो सुकृति ! जो शिकवील याला.

ही अल्पशी निरखुनी हसतो शलाका, *
छायेस पाहुन धरी मनिं फार धाका;
हा पांखरांसह करी मधु भाषणाला,
तो धन्य ! तो सुकृति ! जो शिकवील याला.

गर्जे नभांत घन, ऐकुन बाळ नाचे,
'हें काय हो ?' पुसुनियां वडिलां सुवाचें;
'सासू तुझी दळप हें दळिते मुला रे !
अव्याज † तें मन गणीत खरेंच सारें !

'हें काय ?' देव वाडिलें म्हणतात बाऊ
तें चित्त निर्मळ धरीत तसाच भावू ; ‡
वाढो सुबुद्धिलतिका, अथवा बिचारी,–
हो जीर्ण अंगिंच ! तरी न कुणी विचारी,

हें फूल पाहत असे उमलावयाला,
हें चंद्रबिंब चढतें उदयाचलाला;
बाहेर अंकुर निघों बघतो द्रुमाचा
होतो विकास शिशुच्या मृदुमानसाचा
जो होउनी अनिल हें फुलवील फूल,
सारील दूर शशिचें घनमेघजाल;

---

* काडी. † निष्पाप, सरळ बोलण्यांतले पांचपेच न जाणणारें. ‡ भाव.

कीं अंकुरास जल जो पुरवील माळी,
तो धन्य यत्करगता शिशुबुद्धि झाली.
सारें नवीन शिशुला बहु दर्शनीय,
त्या कौतुकास दुसरी सरि * लोकिं काय?
" हें काय हो? " सतत हीच करीत पृच्छा,
तो धन्य जो करिल पूर्ण तदीय इच्छा.

जरि असेल रसज्ञपणा पुरा,
जरि परोपकृतीच मनोहरा;
जरि असे चतुरत्व, तरी मुला
शिकविण्यासम छंद नसे भला!

★

## ४ दोन फुलें

घेऊन आली नव फूल हातीं, । सप्रेम झाली मज तेंच देती;
सुगंध त्याचा सदनांत कोंदे । मीही हसें, तीहि हसे प्रमोदें.
थोड्याच वेळांत विशीर्ण झालें, । कामांतुनी तें नव फूल गेलें;
परंतु माझ्या पुढचेंच फूल । मीं घेतलें अंकिं सुहास्य लोल!
कोमेजलें हें न परंतु थालें । अंकींच निद्रासुखमग्न झालें;
मीं चुंबिलें त्या, कुरवाळिलें त्या, । सहर्ष वंदून जगन्नियंत्या!

★

## ५ : धुंबनासारखें औषध नाही!

' चल चल चल ताई, चालशी पाहुं कैशी! '
परिसुन मम वाणी विस्मरोनी भयासी
उठुन झडकरीं जों पावलें टाकिताहे,
उपडि मुल पडे तों, आयु ऐसें असे हें!

---

* सर, तुलना.

व्रतच जगीं नराचें चालतांना हसावें,
पतित परि बघोनी आपणाला रडावें;
अवलच मुलगी ती लागली तैं रडाया;
हृदय मम विदारूं लागली तेंवि माया.

दचकलों, उठलों, सरलों पुढें, । उचलुनी तिजला वदलों ' गडे !
रडुं नको, चल चुंबुन टाकितों, । सकल गे दुखणें तव वारितों. '
प्रथमतः निढळाप्रति चुंबिलें, । सकल दुःख तिचें गत जाहलें;
फुल जणूं फुललें मुख हासलें; । धरुन तेंहि सुखें मग चुंबिलें !

होते कपोल भिजले नव अश्रुपातें,
तीच्या स्मितेंहि दिधली नवभा* मुखातें !
पाऊस ऊन्ह भिडतांक्षणिं एक ठायीं
सृष्टी तशीच दिसली मज माझि ताई !

माझ्याहि वत्सलपणाप्रति पूर आला,
माझा तसाच उन्हपाउस शीघ्र झाला;
कल्पून, मीहि रडतों मज दुःख कांहीं
व्यापी मला मुलगि ती मधु चुंबनांहीं !

त्या वेदनाच नुसत्या विसरे न बाला
' मी एकवार पडलें ' विसरेहि याला !
या चुंबनासम दुजें जगतांत कांहीं
नाहीच औषध खरोखर एक नाहीं !

तत्त्वज्ञानविशारदांस विनती माझी करां जोडुनी !
सांगा नित्य नवीन अर्थ मजला ऐकेन शास्त्रांतुनी !
माझा ईश्वर बाप नित्य मजला वाटो मला चुंबितो
विश्वासास हरावयास मम या भेटो न कोणीच तो.

---

* नवीन प्रभा, शोभा.

## ६ : मुलीच्या वाढदिवसाला अनुलक्षून बापाचे उद्‌गार

(चाल : नृपममता रामावरती०)

तो दिवस सुखाचा पहिला । मजपुढें उभा राहीला, कन्यके !
नव तारा ये उदयाला, । मजपुढें नवाङ्कुर आला, कन्यके !
सुस्वप्न* खरा मम झाला, । तव लाभ मला जाहाला ! कन्यके !
तो दिवस आज अनुभवीं, । धन्य मी भवीं† । खरा वैभवी !
कृपाघन द्रवला, दयाघन वळला ! । वर्षाव मजवरी झाला ! कन्यके !

तूं वत्सलतेचा अर्थ, । तुज देतों अपुलें चित्त ! कन्यके !
हें मात्र जन्मदिवसाचें । साजेल उपायन‡ साचें तुज गडे !
घे हेंच चिरञ्जीविनी, । मनोहारिणी । मुली, निशिदिनीं —
देव गे तुजला, देव हा तुजला । पुरविता कृपादानाला, लाडके !

★

## ७ : माझी ताई

(चाल : जन हे दोष जयां म्हणती० )

ताइ, तूं फूल गडे माझें, ताइ, तूं नक्षत्राचि माझें !
ताइ, तूं रत्न गडे माझें ! । ताइ, तूं पांखरुं गे माझें !
या सर्वांहुन गोड गोड गे शील रूप तूझें । यांची उपमा नच साजे !

फूल हें हसतें, तूं हसशी । परी तव अर्थ किती हास्यीं !
काय फुलाच्या मला पाकळ्या दावितील मौजे । जसे हे ओठ गडे तूझे !

तूं तर तेजस्वी करिशी । येइल जवळ तुझ्या त्याशीं;
नक्षत्रांचा गण चमके गे हा उसन्या तेजें, । निराळें वैभव तव तें जें !

रत्नें चम चम चम करितीं । परी तीं कठिण किती असती;
सांठविलेलें तेज किती तें वाढत नाहीं जें । वाढतें तेज गडे तूझें !

गाई पांखरुं गानाला । एकविध अर्थ नसे त्याला;
गान तुझें परिसुनी स्वर्गिंचे दूत गानपटु जें । नाचती सुखें, ताइ माझें !

---

* [संस्कृतांत पुल्लिंगी] चांगलें स्वप्न. † संसारीं. ‡ वाढदिवसासारख्या विशिष्ट प्रसंगीं भेट म्हणून दिलेली वस्तु.

## ८ : विरह फुलांचा नाहि बरा !

(चाल : फटक्याची)

[कवि एका सन्मान्य गृहस्थाच्या घरीं बरेच दिवस आतिथ्यसुखाचा अनुभव घेत राहिला होता. तेथून गेल्यावर त्यानें पत्राच्या ऐवजीं पुढें दिलेलें पद्य त्या गृहस्थाला सादर केलें.]

छायेखालीं तुझ्या पावलों जरी विसावा वृक्षवरा, । तरी फुलांचा लोभ खरा !

भक्षुनि तुझिया तुष्ट जहालों पुष्ट फलांना अति रुचिरा,
विरह तुझा मज दुःखद, परि हा विरह फुलांचा नाहि बरा !
मधुर फुलांनीं गंधित वारा या पुढतीं मज नाहि खरा
हास्यवदन हीं फुलें मनाला चैन न पडुं देतील जरा;
पाहुन तारे आकाशीं, । गातांना द्विजरायांसी
हसतां किंवा चंद्रासी ।
पदोपदीं हीं फुलेंच दिसतिल पुढें मला विरहार्त नरा ।
हींच आणितिल परत घरा !

★

हा अश्रूंचा पूर लोटला ! आला, धावत आला !
सावध, सावध व्हा ! रसिकांनो, सांभाळा अपणाला !
हीं प्रीतीचीं फुलें सांडतीं, अगणित, किति वेंचाल ?
जाल कुठें हें टाळुन येउन पडलें मायाजाल ?
हें बापाचें हृदय विवेकस्तंभा * भेदुन आलें,
तुमच्यापुढतीं हें करुणाचें भाजन † रिक्त जहालें !
झालें संगत कविहृदयाशीं, आतां पुसणें नलगे !
जगीं प्रवाहापुढें अशा या विरक्त योगी न तगे !
सृष्टिसुंदरी कामरूपिणी कविची सखी सदाची,
सखी तशी ती विदित जगाला रसज्ञ चित्रकराची.
सख्य जिथें निष्काम, तिथें नच कधीं मत्सरा थारा;
चंद्रदर्शनें प्रस्तर ‡ हर्षे, कुमुदांचाहि पसारा !
कोण असें जें चित्रकराला पाहुनि हासत नाही ?
डोलत नाही ? 'ये ये सखया !' ऐसें बोलत नाही ?
जड जगताला दिसती ते ते पदार्थ चित्रकराचे
मित्र बोलके प्रेमळ भारी जैसे कविरायाचे.
चित्रकराची जशी ईषिका ¶ तशी वर्णिका § कविची,
अंध, अरसिकांवांचुन भिन्न न कार्यें कवणा यांचीं.
चित्रकार नव मित्र कवीचा जगतीं आला, गेला;
कवी एकला पडला, विरहें अतितर आकुल झाला.

---

* विवेकाच्या अडथळयाला. † पात्र, भांडें. ‡ दगड (चंद्रकांत.) ¶ ब्रश, कुंचली. § लेखणी.

शब्दावांचुन जसा अर्थ हो पडे जागच्या जागीं,
तसा कवीही मित्राविण हो* मूक, विपन्न, अभागीं.

ढाळी अश्रू खळ खळ खळ खळ, त्यासह अवघी सृष्टी
निज अश्रूंचा अंजलि सोडी मित्रवियोगें कष्टी.

त्या दोघांच्या त्या अश्रूंचे प्रवाह एक जहाले,
परंतु एका क्षणांत जाउन सिंधूमाजि निमाले!

व्यक्तित्वाला† मुकले अवघे सिंधु रूप ते झाले,
चित्रकराच्या जनकविलापीं विलाप त्यांचे मुरले!

असें सिंधुचें तसेंच त्याही जनकाचें सच्छील,
परंतु झाला दुःखाचा हा कळस कसा सोशील!

अमूल्य मोत्यें, भिकार शिंपा, शंख, असो कांहीही
संग्रह त्याचा करी सर्वदा, त्रास सिंधुला नाही!
जलचर नानापरिंचे करिती हृदयीं, पृष्ठिं विहार,
उदारधी हा सागर केवळ शमांप्रती आधार!

एकाएकीं परंतु आला धावत झंझावात!
निजमित्राचें साह्य कराया सज्ज मेघ गगनांत!

तद्यांत सुटली वीज वरोनी सागरहृदयीं शिरली!
सागर नाचे थय थय! त्याची पहिली वृत्ती नुरली.
आतां ह्याच्या लाटा वाटे गिळितिल विश्वच सारें!
शमकोपाचा क्षणामधे हा विनिमय‡ होय कसा रे!

ज्ञाना! ज्ञाना! अरे विवेका! किती दावितां प्रौढी?
न चले तुमचें कांही जेव्हां स्वभाव मनुजा ओढी!
उपनिषदांची धेनू दोही गोपाळांचा राजा, §
पिई दुग्ध तें पार्थ, म्हणे, कीं मोहा आतां जा जा!

---

* झाला. † निरनिराळेपणाला. ‡ अदलाबदल.
§ सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः।
पार्थो वत्सः सुधीभोक्ता दुग्धं गीतामृतं महत्॥

निजपुत्राचें * पतन परी त्या रडवी हरिशिष्याला,
आत्मबोध तो सर्व निमाला ! क्षोभ मनाचा झाला.
वसिष्ठ योगी, शिष्य तयाचा रामचंद्र विख्यात,
सीताविरहें वृक्षलतांना आलिंगी रानांत !

ज्ञानस्तंभा † भेदुन आला स्वभाव आप्तवियोगीं,
करुणरसाची नदी वहावी कुणीहि बुडण्याजोगी.
थोर थोर वीरांस आपुले करून घेउन लोकीं
निवृत्ती ही प्रवृत्तीशीं झुंजे नित्य विलोकीं !
किती काळ हें युद्ध चाललें ! पराभूत किती झाली !
तरि निवृत्ती अजून झुंजे, नाही लवही धाली !
सांगे हा इतिहास कवीला थोर असो वेदान्त,
तरी तयाला कधीं न करवे प्रेमोद्भवखेदान्त ‡
कां खेदाचा अन्त करावा ? खेदकर्दमीं बीज
प्रीतिलतेचें रुजे, नवें मी हें न सांगतों आज.
फुलें तिचीं तीं रम्य आसवें कां हो नष्ट करावीं ?
ज्ञान कसें तें ज्यानें असली अरसिक वृत्ति वरावी !
विलाप व्हावा ! अश्रू व्हावे ! संसृति अवघी व्हावी !
अंधाराची व्याप्ती व्हावी ! ज्योत्स्ना सुंदर व्हावी !

यापरि गर्जे स्वभाव, त्याचा प्रतिध्वनी होताहे
ज्ञानपर्वतीं, असा जगाचा सदैव अनुभव राहे !
झाला विव्हल शोकें प्रेमल जनिता चित्रकराचा,
म्हणे ' वामना ! ' पुढें जहाली स्तब्ध तयाची वाचा !
विचार झाले स्तब्ध, तयांच्यामागें ते उच्चार,
स्तब्ध जहाले त्या दीनाचे अशेष हो आचार.

* अभिमन्यूचें. † ज्ञानाच्या अटकावाला. ‡ प्रेमापासून ज्याचा उद्भव आहे अशा खेदाचा शेवट.

हृदयीं मूर्ती निजपुत्राची, मागें, पुढतीं भोंतीं !
जिकडे तिकडे तीच ! जहाली तन्मय त्याची वृत्ती !

शून्यदृष्टिनें पाही, राही मिटून डोळे शांत,
दीर्घोच्छ्वासा सोडी, नाहीं परि अश्रूंचा पात !

कांही क्षण चैतन्यरहित तो पुतळा होउन बसला;
पुतळा तो करुणाचा केवळ कविनयनांला दिसला.

तेविस वर्षे झालिं मुलाला, काल दीर्घ हा भासे,
परि त्या जनका तेविस महिने दिसती गेले जैसे.

बाल्यापासुन जें जें घडलें तें तें पुढतीं आलें,
निजपुत्राचें चरित चित्रवत् पुढें तयाच्या ठेलें.

चरितपटीं त्या घटिका त्याच्या जन्माची लिहिलेली,
पहिलें रोदन, हसणें पहिलें, वाचा लिहिली पहिली !

कसें वामनें प्रथम आपल्या मुखाकडे पाहीलें,
तयास आपण चुंबनरूपें प्रेम कसें वाहीलें !

कसा रांगला, कसा राहिला उभा प्रथम तो भीत;
प्रथम पाउलें टाकायाची कशी तयाची रीत.

दुडदुड धावे, पावे पतना, फिरूनि धावे उठुनी,
हसे खदखदां एकवर्णमय* शब्द कांहितरि वदुनी.

चित्रपटीं त्या सर्व रेखिल्या बाळपणींच्या लीला;
विरहें आतां रंग चढविले नवीन, रम्य तयांला !

जें जें पाहे त्याचा त्याचा पुनरनुभव त्या घडला !
आला बाहिर हुंवरडा जो कंठिं तयाच्या दडला.

रम्य रोपडें वाढत वाढत कैसें गेलें पाहे,
त्या जनकाच्या नयनांतोनी पूर अश्रुचा वाहे.

---

* एकाक्षरी

हा अंकुर! हीं रम्य नव दलें! या शाखा! ही उंची!
फुलें! पुढें ही इच्छा त्याची रम्य फळें ववण्याची.
तोंच कडाडे वीज वरोनी! घात तरुणवृक्षाचा!
झाला! न कळे कसा न झाला पितयाच्या वक्षाचा!

रहोपवनिंच्या इतर तरुलता यद्रक्षणिं तो दक्ष
लक्ष तयाचें वेधुनि घेती, सांवरितां तें वक्ष!

माय रडे, हम्बरडे फोडी! ऐकुन ते तिजसाठीं
क्षणैक अपुले अश्रु आंवरी, सांगे विवेकगोष्टी

रडती बघुनी दुजीं लेकरें जवळ तयांना घेई,
पुशी आसवें, कुरवाळीं, त्यां धैर्य द्यावया पाही!

'रडूं नका रे!' म्हणतां म्हणतां मधेंच त्या जनकाला
रडूं कोसळे! काय म्हणावें न कळे या वेडाला!

हें आईचें, हें बापाचें, हृदय बंधुभगिनींचें,
समानसंवेदिता * करी या निरसन भिन्नपणाचें.

हीच तया जनकाच्या हृदया फुटतां फुटतां जोडी!
हीच भयंकर, विषमय कंटक नैराश्याचा मोडी.

कुणा वर्णवे परंपरा जी अशिवाची † जगतांत!
फुलें तरूचीं गळतीं; मरतीं! तरु राहे जीवंत!

प्रभंजनानें ‡ तरुही उमळे, माळी रडे बघोनी;
कधीं कधीं परि तोच जाय हो उद्याना टाकोनी!

वृद्ध रहाती, तरणे जाती! स्वैरगती हा काल,
तयास नाही भेद ठाउका वृद्ध तरुण वा बाल!

क्षेत्रामध्यें शिरे घेउनी तीक्ष्ण शस्त्र तो कापी
पुढें येइ तें, विचार त्याच्या न शिवे मना कदापि!

---

* एकच संवेदना (दुःखाचा अनुभव) † अशुभाची ‡ झंझावातानें

पिकलीं कणसें, नवीं कोंवळीं समान दोन्ही त्याला !
निंदा वंदा पर्वा त्याची नसे कधीं वेड्याला !
रडवी याचें वेड परी हें बुडवी दुस्तर शोकीं
नरनारींना जिणें नकोसें करून सोडी लोकीं !
काळ न वेडा; परंतु आम्ही वेडे यांत न शंका !
बधिरां आम्हां ऐकुं न येई 'नश्वर जग' हा डंका.
किंवा ह्यांतहि नवल कशाच ? मायेच्या डंक्यांहीं
दुसरे डंके लुप्त जहाले ! उपाय अमुचा नाही !
शुभाशुभाचा संकर म्हणजे अमुचा हा संसार !
सुखदुःखाचें परिवर्तन हें जिणें असे साचार !
कधीं हसावें ! कधीं रडावें ! हेंच कार्य जीवाचें !
'जय ! जय !' केव्हां 'हा ! हा !' केव्हां हीच घोषणा वाचे

असो आठवुन निजतनयाचें चरित अल्प, परि दिव्य
जनक म्हणे तो जगीं मृत्युहुन दुःसह मज वास्तव्य !
पुत्रनाम* तूं प्रिया वामना, आत्मा माझा होशी,
तुझ्याविना या शून्य तनूची यात्रा करूं कैशी ?
गेला आत्मा त्यजुन आतां श्वासोच्छ्वासापुरता
मत्प्राणांनो ! काय करीतां मम देहाचा भाता ?
सोडा, सोडा, सोडा आग्रह आतां मत्प्राणांहो !
त्यजा मला, जा ! यांतच तुमचा, या देहाचा लाहो.†
काळा ! कोठें तोंड लपविशी नेउन मम बाळाला ?
फुटले का तव कान ? किती रे हांका मारूं तुजला !

* 'आत्मा वै पुत्रनामाऽसि.' † लाभ.

नको नको जीं म्हणती त्यांवर कशी घालिशी धाड !
ये ये म्हणतां मागें सरशी, खरा क्रूर तूं द्वाड
तरुण आमुचे कल्पतरूचे अंकुर खुडुनी न्यावे,
आधीं ही हतभाग्य आर्यभू, त्यांत हिला रडवावें !
वृद्ध पंगु मी, परंतु आहे पुरुष, असूं दे माझें,
दुःखद व्हावे परी स्त्रियांना; शील तुझें तुज साजे !
जगांत अवघ्या भरतभूमिला देवानें नटवीलें !
सकल कवींना, चित्रकरांना काम्य रूप हिज दिधलें !
जन्मभूमिचें रूप रम्य हें आनंदें सजवीता,
वामन माझा, कीर्ती हीची नेता साच दिगंता !
देता कविंना स्फूर्ती, तेही गाते हिच्या यशाला,
त्या गानानें उभी रहाती नववीरांची माला !
तुवां परी हें केलें हीचें स्वप्नांतिल रे राज्य,
तुवां ओतिलें हें दुःखाच्या ज्वलदग्नीवर आज्य*
म्हणशिल, काळा ! 'तव आज्ञेला मोडुन कां मग आला !'
तरी तुझें हें वचन अन्यथा ! तुला सांगतों काला !
पितृभक्त तो पुत्र, तयाची निंदा करुनी ऐशी
उगाच काळा ! महापाप तूं माथीं अपुल्या घेशी;
पुत्र न केवळ, शिष्यहि, मित्रहि ! बाळक माझा होता !
तुला न ठाउक, परी गुरू मम होउन मज शिकवीता !
परी मदाज्ञाभंग तयाला स्वप्नीं ठाउक नव्हतां,
काळा तूं तर सर्व जाणशी ! सांग खरें तरि आतां !
तुझाच काळा ! असे सर्व हा दुष्टपणाचा खेळ !
नेला उचलुन हिरा साधिली तुवांच चोरा वेळ !

* तूप

माझा आत्मा, मम पत्नीचा प्राणच एक, तुवां हा
हरिला काळा ! पहा पहा रे ! तिची अवस्था पाहा !
बाहेरुन नच, परि हृदयांतुन कांहीतरि हारवलें !
असेंच वाटें त्या जननीला, नको जिणें तिज झालें !
अजिंक्य तूं रे वीर खरोखर ! म्हणून अबलांवरतीं !
शस्त्र धरीशी, अधमा ! शोभो तुलाच तव ही नीती !
भाऊ म्हणजे मूर्त विसावा, पाठिंबा बहिणींचा,
तुवां उचलिला काय म्हणावें तुजला अदया ! नीचा !
वडिल धाकुटा भेद विसरले बंधु प्रेमभरांत
भाऊ भाऊ, परंतु सललें दुष्टा तव नयनांत !
म्हणून माझा वामन ऐसा अकस्मात तूं नेला,
बरें न बघवे तुला कुणाचें ! दुष्टपणा तव लीला !

शोकक्षोभीं सजीव किंवा पदार्थ हा निर्जीव
भेद न राहे; मानव म्हणतो कुणी तरी करु कींव,
वृक्षलतांना, नदीपर्वतां, पशुद्विजांना पृच्छा —
करीत फिरला राघव, पुरविल म्हणे कुणीतरि इच्छा.
अमूर्त काळासवें विवादा करी जनक तो खिन्न,
अनुपस्थित वा उपस्थित तयां न दिसे नयनीं भिन्न !
पुन्हा बघे तो गतपुत्राला अपुल्या दृष्टीपुढतीं
म्हणे ' बाळका ! कोठें जाशी रुसून माझ्यावरतीं ?
अर्धोन्मीलित कलिका, सौरभ* हृदयीं जीच्या लपलें,
बुद्धि तुझी तिजसमान तेव्हांपासुन सख्यच अपलें.
कोठें जाशी ? कशास जाशी ? सांग, एकदा येई !
कधीं न ठाउक तुला दुराग्रह, आज वृत्ति तव कां ही ?

---

* सौरभ ( सं. नपुंसकलिंग ) = सुगंध. ज्या कलिकेचा सुगंध अजून दरवळूं लागला नाहीं.

किंवा स्वर्गी दिव्यपणा जो त्याचें चित्र सुरम्य
लिहून घेउन येशिल परतुन? होय हेंच तव काम्य* !
बाळा प्राणप्रिया वामना ! बाळपणींच तुला मीं
ओळखिलें कीं चित्रकार तूं विश्वनिदर्शनकामी.
जें जें येई पुढें तुझ्या तें सांठवुनी मनिं घेशी,
मला कळे कीं मनामधें तूं रंग नवे त्या देशी.
गगनीं बघुनी नक्षत्रें तव वदनांतिल नक्षत्रें
हास्यमिषानें चमचम करिती, सौंदर्याचीं पात्रें !
आकाशाचे रंग पाहुनी दंग कितीदा होशी,
स्मृतिमंजूषीं जणूं ओतुनी सारे तूं ते घेशी !
मला आठवे आपण दोघे नौकेमध्यें होतों,
सागरदर्शन तुला वाटलें अपूर्व हो लाहो तो !
लहरीमागुन लहरी मिधिच्या पाहुन चित्रकरा रे !
तुझ्याहि हृदयीं उठती लहरी, तन्मय तव मन सारें !
मुखें न वदवे शब्द एक तुज, परि तव नयनें वदती
अवघे जे जे विचार तुझिया चित्तीं येती जाती.
"कधीं एकदा तुझें सागरा रंगवीन मी चित्र !"
शब्द तुझे हे अजुन ऐकतों; दैव परंतु विचित्र !
अक्षयतेच्या पैलतटीं तूं आतां जाउन बसशी,
कालसमुद्रा जणूं तेथुनी रेखुन बाळा घेशी !
चित्र तुझें हें पहावयाला लौकर मी येईन !
तुला बाळका आलिंगोनी प्रेमाश्रू वाहीन !

'कोठवरी मम वास जगीं या न कळे वाच्यापुरतों,
निवास येथिल विवास† ! केवळ छळणुक माझी पुरती !
अन्तःसृष्टी, बाह्यसृष्टि ही विषण्ण तुजविण झाली,
सांत्वन 'हीचें' माझें कर्ता‡ न दिसे कोठें वाली.

---

* इच्छा. † हद्दपारी, विदेशवास. ‡ करणारा.

तुझा मित्र कवि पुराच झाला दिसतो क्षीणोपाय,
रडे मजसवें दीन बिचारा करील दुसरें काय ?
उगाच आतां कोठें हिंडूं वनीं, पर्वतीं सांग ?
शून्य दिसे जग, शोभा याची हरपे, न तिचा थांग.
झालों मी आंधळा तुझ्याविण, मेली मजला सृष्टी !
दृश्य असोनीं नसल्यासम त्या ज्यास मोकली* दृष्टी !

'गगन फाटलें ! दुःख दाटलें ! सौख्य आटलें सारें !
पाप सांठलें ! जगीं सुटलें दुर्दैन्याचें वारें !
काय करूं रे ? सांग मला तू ! उपाय माझे हरले !
अश्रुस्नानें देह शांतवूं तरि सारे ते सरले !
" तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु † " असें किति वेळां मी वदलों,
परंतु नाहीं क्षणार्ध बाळा तुजला मी विस्मरलों !
अस्तंगत चंद्रमा, त्यामधे तारा लुप्त घनांहीं
काढ चित्र हें, मनःसृष्टि मम या चित्रासम पाहीं !
विलाप माझे ऐकुन आत्मा खिन्न तुझा होईल,
म्हणून आतां पुरे करीतों, तुझें कोंवळें शील.
खिन्न मला पाहून खिन्न तूं होशी सत्पुत्रारे !
किती आठवूं प्रेमाचे तव अनुभव मज जे सारे ?
जसा चंद्रमा तसें चांदणें, जसा मी तसा तूंही !
पितापुत्र हा भिन्नपणा, परि वृत्तिभिन्नता नाही !
तो तूं आतां आर्तशब्द हे ऐकुन माझे शांत,
नको कल्पना करावया ही होय जरी कल्पान्त !
खरें; परी मी जरी राहिलों मुका, तरी तूं बाळा !
काय जाणशी न ह्या माझिया दुःखें दग्ध मनाला ?'

---

* सोडी, सोडून जाई. † जें जें घडेल तें ब्रह्मार्पण असो.

मना माझिया संस्मर त्याला ! जिव्हे, करीं विलाप !
हे नेत्रांनो, गाळा अश्रू ! होवो तनुला ताप !
ये बाळाच्या जननी ! याहो भावंडांनो सारे !
प्रेमाश्रूंचे अंजलि सोडूं सर्व सुखाचे थारे !
ये ये सृष्टी ! याहो कविंनो ! तुम्हांस कां वगळावें ?
अश्रुपातविधि करावयाला रसिकांनींही यावें !

*　　　*　　　*

गेला बाळक त्यां जनकाला व्यर्थ असा व्यामोह,
प्रेमाला नच मरण कधींही, शांत नको संदेह.
गेला नाही; हृदयीं त्याच्या नित्य अधिष्टित झाला !
येथें तेथें, काल उद्यां, हा भेद सदाचा गेला !
प्रभु मृत्युंजय* अक्षयतेचें† दर्शन जनका देवो !
अश्रु पुसो हे, ह्या करुणाचा शांतरसीं लय होवो !

---

* मृत्युवर जय मिळविणारा प्रभु = येशू ख्रिस्त. † चिरंतनत्व.

—×—

ही विलापिका १९०९ सालीं मित्रमंडळापुरती स्वतंत्रपणें छापली होती. आवरणपृष्ठावर —

This lovely bud, so young, so fair
Cull'd hence by early doom,
Just came to show how sweet a flower,
In paradise would bloom.

— *Coleridge*

या ओळी उद्धृत केल्या आहेत आणि आंतल्या पानावर —

परलोकवासी　वामन विनायक साठे
भरतभूचा एक अत्युत्तम परंतु अज्ञात चित्रकार यांस,
हें संस्मृतिकाव्य अर्पिलें आहे.

जन्म २५ नोव्हेंबर, १८८५]　　　[मृत्यु ५ मार्च, १९०९

अशी अर्पणपत्रिका जोडली होती.

## १ : केवढें हें क्रौर्य !

क्षणोक्षणिं पडे, उठे परि बळें, उडे बापडी,
चुके पथहि येउनी स्तिमित दृष्टिला झांपडी;
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी.

म्हणे निजशिशूंप्रती 'अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतिचा कवळ* एक मीं आणिला;
करा मधुर हा ! चला ! भरवितें तुम्हां एकदा
करो जतन यापुढें प्रभु पिता अनाथा सदा !

अहा ! मधुर गाउनी रमविलें सकाळीं जनां,
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना !
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुनि घांस झाडावरी
क्षणैक बसलें न तों, शिरत बाण माझ्या उरीं !

निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला ! किती दया ! कसा हा नय † !
उदार बहु शूर हा नर खरोखरीं जाहला
वधून मज पांखरा निरपराध कीं दुर्बला !

म्हणाल भुलली जगा, विसरली प्रियां लेकरां,
म्हणून अतिसंकटें उडत पातलें मी घरा;
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मजबरोबरी परि दयाघना ईश्वरा.'

असो; रुधिर वाहुनी नच मिज़ो सुशय्या तरी
म्हणून तरुच्या तळीं निजलि ती द्विजा‡ भूवरी;
जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल¶
नरें धरुनि नाशिलें, खचित थोर बुद्धी, बल.

---

* घांस. † नीति. ‡ पक्षिणी. ¶ कमल.

मातींत ते पसरले अतिरम्य पंख,
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक.!
चंचू तशीच उघडी, पद लांबवीलें,
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले!

★

## २ : स्वर्गनिवासिनी मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल

(चाल : हलवा ग बायांनो परसरामाला०)

हे आर्तांचे माते ! । सत्कर्मांचें गाथे !
नित्य वंदूं तूतें । मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !
धन्य तूझी वाणी ! । धन्य तूझी करणी !
औदार्याच्या खाणी । मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !
तूं तारा अंधारीं, । संतापामाझारीं;
अमृताची तूं झारी । मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !
सिंहाचें कोकरूं । झालें, लागे मरूं !
तें तूझें लेकरूं । मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !
तूझीं कृत्यें, उक्तें* । आम्हां मानवातें
उंचावीती, माते । मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !
सत्प्रेमाची मूर्ति, । तूं देवाची दूति !
येथें तेथें गाती । 'मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !'
तूझा आत्मा येथें, । शोभे तो गे तेथें !
मृत्यू नाही तूतें । मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !
प्रेमार्णवीं नामी† । ऊठलेली ऊर्मि
आली, गेली धामीं ! मिस् फ्लॉरेन्स् नाइटिंगेल !

---

* वचनें. † उत्कृष्ट.

9.10.7...80 ... 7246 नों. 3/9

## ३ : शुष्क गुलाब

अक्षयतेच्या अलीकडे मज सोडुन, पैलतटाला –
गेली माझी भगिनी, वत्सर अर्ध जाउनी झाला.

चित्र तियेचें स्मृतिमंजूषा उघडुनि मीं पाहीलें,
प्रेमाश्रूंचे अंजलि त्याला दहापांच वाहीले !

तिनें दिलेला ग्रंथ एक मीं नकळे कां उचलीला.
नच वाचीला ! परंतु कितिदां उघडीला चाळीला !

मधे तयाच्या विशीर्ण झाला गुलाब दृष्टिस पडला,
मला आणखी रडवायाला आजवरी जो दडला !

हातीं घेउन तयास आधीं खळखळ अश्रुजलाचे
ओघ सोडुनी मार्ग करोनी दिला आपल्या वाचे.

वदलों मग मी त्या पुष्पाला 'रंग तुझा पाहोनी
लाजत होती उषा परी तो गेला तुज टाकोनी !

खरा सखा तो वायु गुलाबा ! वृक्षलता सुमनांचा
जसा असें मी जायापतिंचा त्यांच्या रम्य मुलांचा.

परन्तु तोही मनापासुनी तुला विचारित नाही,
जो तव पूर्वी सौरभकीर्ती दिशांदिशांना वाही !
रविनें पूर्वी लांबवुनी कर तुजला कुरवाळावें,
क्षणोक्षणीं गालींच्या वर्णा तुझ्या गड्या बदलावें !
सृष्टीनें हिममिषें मनोहर नवमोत्यांची जाळी
घालावी तुजवरी हसावें हर्षें तूं त्या काळीं !
सदा करावें पुढें पुढें तव, गाणें तुजला गावें,
क्षणोक्षणीं बिलगावें मधुपें तुजला सोडुन द्यावें !

पंख कांपती थरथर ! नाहीं शुद्धी निजदेहाची !
मला आठवे कशी स्थिति हो, रसलोलुप मधुपाची.
तोच अतां जवळून जातसे परी शिवेना तुजला !
ओळख याची तुझी न केव्हां, असेंच भासे मजला

योग्य न आतां रहावया तूं असल्या अंध जगांत
खरोखरी ये ताईसंगें राहीं मम हृदयांत.

वेत पूर्विंचा मम भगिनीचा मजला ठाउक नाही,
दया करी परि ती तुजलागीं येथें ठेवुन देई !
उषा, वायु, रवि, मधुप, सृष्टि हीं अंध जाहलीं सारीं,
सख्या गुलाबा ! पहिल्यासरसा* रम्य मला तूं भारी !

वेडे म्हणती मम बहिणीला, कीं ती गेली मेली;
खोटें सारें ! ती तर माझ्या हृदयमंदिरीं रमली !

समानशीलीं सख्य, तरी ये, ताईजवळी राहीं,
सख्या गुलाबा ! प्रीतिस कोठें मरण ऐकिलें नाही !

---

* पहिल्यासारखा

★

## ४ : एक अमेरिकन मुलगी

१

पाठीवरी रुळति धूसर* मुक्त बाल,
जैसे गुलाब फुलले दिसतात गाल;
विस्तीर्ण हें निढळ पानच केवड्याचें
जेथें सुभाग्य, मतिमत्त्व खुशाल नाचे.

२

या केवड्यावर अली बसले मधून,
तैसेच हे कुरळ शोभति दोन तीन;
या रम्य वक्र भिवया म्हणतात 'येथें--
थारा नसे कृपण दीन मनोरथातें !'

३

साधें प्रसन्न मधु बाल्य करी विहार
नेत्रांत जें करि तयांप्रति लोल फार;
रत्ना ! तुझें हरपलें जणुं सर्व पाणी
हीं रम्य दीर्घ नयनें गमतें बघोनी !

४

हें वेत्र सुंदर दिसे मज चारुतेचें,
सारल्य अग्रनति‡मान† अपूर्व ज्याचें;
सोक्रेटि‡ नासिक हिचें म्हणतें जगाला
आर्यान्वयोद्भव¶ खरोखर रम्य बाला !

---

*भुरकट रंगाचे. †टोकाकडे निमुळतें होत जाणारें. ‡उभार,उंच. ¶आर्यवंशोत्पन्न

५

किंचित् प्रभात समयीं कळिनें फुलावें
कीं अंतरंग लपवून पुढें करावें;
हें हासरें मुख हिचें करि तीच लीला
दावी पुन्हा लपविते रदनावलीला.

६

आरक्त ओष्ठ जणुं बेलच पोंवळ्यांचे
तेही गमे विरमतील* पुढें तयांचे;
किंचित् विभक्त दिसती, जणुं सांगताती
निश्चिंत निर्मल मुखी किति बालवृत्ति !

७

वाटे उषाच हसते फिरते जगांत !
कीं स्फूर्ति हीच कविची मधुरूप घेत !
अव्याजता रसिकता जणुं मूल झाली
स्वर्गांतुनी सहज भूवर आज आली.

★

## ५ : पांखरा ! येशिल का परतून ?

(चाल : खचित बाई व्यर्थ आम्ही०)

पांखरा ! येशिल का परतून ?
मत्प्रेमानें दिल्या खुणांतुन । एक तरी अठवून ? पांखरा !
हवेसवें मिसळल्या माझिया । निःश्वासा वळखून ? पांखरा !
वाऱ्यावरचा तरंग चंचल ! जाशिल तूं भडकून ! पांखरा !
थांब, घेउं दे रूप तुझें हें । हृदयीं पूर्ण भरून ! पांखरा !
जन्मवरी मजसवें पहा ही । तव चंचूची खूण ! पांखरा !
विसर मला, परि अमर्याद जग । राहीं नित्य जपून ! पांखरा !
ये आतां घे शेवटचे हे । अश्रू दोन पिऊन ! पांखरा !

---

* खजील होतील.

## १ : आमचे तिंबूनाना

'Some men were born for great things,
Some were born for small;
Some—it is not on record
Why they were born at all;
But Uncle Sammy was certain he had
a legitimate call.'

—*Will Carleton*

महापराक्रम साधायास्तव कोणी जन्मा येती,
क्षुद्र कृती उरकणें कुणाची हीच जन्मुनी नियति.*
कोणी जन्मा कशास आले हेंच कुणास कळेना,
कार्यविशेषा परी जन्मले अमुचे तिंबूनाना !
बुद्धिवैभवा घेउन संगें कितीक जन्मा येती,
उच्चपदावर कुणी उपजले, कुणासवें संपत्ति.
धरिती एका करीं प्रमाणां, दुसऱ्या करीं विधाना,
अशा रीतिनें जन्म पावले अमुचे तिंबूनाना !
तर्कवितर्कात्मक तें त्यांचें जीवन उसळे भारी,
नेत्रीं त्यांच्या सदैव विलसे चमक तयाची सारी.
निरर्थ रडती पोरें दुसरी श्रमवाया वडिलांना
रडती म्हणजे विवाद करिती अमुचे तिंबूनाना !
निर्णय लावी जगणें बरवें किंवा बरवें मरण,
रुदन जन म्हणे तें बाळाचें स्वगत परी व्याख्यान !
दिवस असो वा रात्र असो, क्षण चैन पडेना त्यांना,
पूर्वोत्तरपक्षांत रंगले अमुचे तिंबूनाना !

* दैव.

ऊहापोहा करितां करितां सत्य गवसलें अंतीं,
मृत्यूला, 'जा' म्हणून जगले तिंबूनाना जगतीं.
तर्कवितर्कीं ढकलित ढकलित पुढें ढकलिलें त्यांना,
बाल्यांतुन तारुण्यीं आले अमुचे तिंबूनाना !

वादविवादा करितां करितां लग्न तयांचें झालें,
वादविवादीं तयांस झालीं चार मनोहर बाळें.
वादविवादीं न कळे त्यांना प्रपंचसुख वा दैना,
वादविवादीं अढळ सदाचे अमुचे तिंबूनाना !

इकडुन धावे तर्क, तिकडुनी वितर्क धांवत आला,
संसाराच्या महानदीं तो भयद भोंवरा झाला.
बघून त्याला किती झांकिती, किती फिरविती नयनां,
अशा भोंवऱ्यामधें पोहती खुशाल तिंबूनाना !

परि अर्धांगी उलटी सुलटी गरगर फिरली फिरली
भोंवऱ्यांत त्या, उसंत न तिला; पुरती जर्जर झाली.
दिले तिला तर्कांचे वळसे, उपाय केले नाना,
व्यर्थ जहाले अवघे; उघडे पडले तिंबूनाना !

त्या दुःखाच्या झंझावातें महामेघ तर्कांचे
किती खवळले, कसे घसरले; शक्य न वर्णन वाचे !
प्रलयकाल हा समीप आला वाटे चराचरांना,
जें तें प्रार्थी 'पुरे करा हो सदया तिंबूनाना !'

चार मिळाले मित्र, माजला वाद पुन्हा घनघोर
अहोरात्र महिनाभर ! अंतीं ठरला एक विचार !
'पांचां मुखिं परमेश्वर' म्हणुनी तयां देउनी माना
पुन्हा एकदा जगीं चतुर्भुज झाले तिंबूनाना !

विधान चुकलें, प्रमाण फसलें, तर्क कुतर्क जहाला,
नानाजींच्या गळयांत पडली घोरपडीची माला !

तिनें आणिली गोळा करुनी आप्तजनांची सेना,
जिला पहातां चकित जहाले अमुचे तिंबूनाना !

तिचें, तियेच्या आप्तांचें जें म्हणणें तो सिद्धान्त !
'मर्जी माझी !' याविण दुसरें प्रमाण न तिला विदित !

समर चाललें संवत्सरभर तरीहि तें थांबेना !
तहनाम्यावर सही ठोकिती अंतीं तिंबूनाना !

अजिंक्य म्हणुनी प्रसिद्ध अवघ्या जगामधे वाग्वीर,
शस्त्रास्त्रांचा असा जहाला अवचित त्याच्या चूर !

नखें गळालीं, दंत भंगले, अंधपणा ये नयनां,
त्या सिंहासम दीन जहाले अमुचे तिंबूनाना !

पुन्हा एकदा तें बाल्यींचें कोडें पुढतीं आलें,
या समयीं मरणेंच चांगलें असें तयांचें ठरलें !

जन म्हणती हे मुके जहाले, काय कळे अज्ञांना ?
कालासह चर्चेंत गुंतले अमुचे तिंबूनाना !

अंतीं त्या चर्चेच्या ठरलें, वादविवादीं धूर्त
असा एक निवडावा स्वर्गीं सर्व सुरांनीं दूत;

नानांनीं त्यासवें करावें स्वर्लोकाला गमना,
देहत्यागा सिद्ध जहाले अमुचे तिंबूनाना !

हासत बोलत डोलत गेले देहा त्यजुनी नाना,
असें सांगती ते जे बघती प्रेतमुखावर चिन्हा;

कोटिक्रम लढवीत सुखानें अंतिममार्गक्रमणा
करिते झाले, शंका न लगे, अमुचे तिंबूनाना !

स्वर्गीं अपुलें होइल कैसें हीच तयांना चिंता,
परी सुरांचा राजा झाला स्वयें तियेचा हर्ता.

बृहस्पतीला म्हणे 'गुरूजी! घ्या सांभाळा यांना!'
सूर्यचंद्र तोंवरी विवादीं रमले तिंबूनाना !

★

## २ : तो आम्हांला भ्याला !

मधेंच लपवी सस्मित वदना तरुपर्णांच्या आड,
खदखद हासे, इंदू ऐसे सृष्टीसह करि लाड !
नभोविहारी पूर्ण चंद्रमा नामी लीला दावी,
अंध अरसिकांवांचुनि इतरां वेड आपुलें लावी !
युवजन युवती मनीं रंगल्या, कैरवपंक्ती* धाल्या,
प्रस्तरांतुनी† कविजन म्हणती प्रेमोर्मीहि निघाल्या !
पतित चोर रात्रिंचर दुसरे म्हणती 'वैरी आला'
कोणी कांहीं म्हणो, न परवा त्याची शीतकराला ‡ !
असो ! पहा हे परंतु जमले ग्रामसिंह अति नीच,
म्हणती 'देऊं हांकुनि याला ! धन्य तरी आम्हीच !'
सारे मिळुनी बळें भोंकती वृद्ध तरुण कीं पोरें !
दांत काढुनी म्हणती, 'चंद्रया पाहीं तीक्ष्ण कसे रे !'
जों जों हासें अधिक चंद्रमा तों तों अधिक बळानें
आरडती हे, मरतिल वाटे अंतीं उर फुटल्यानें !
त्रासुनि कोणी दंड हाणिती, शिलाशकलही कोणी,
दाद न त्याची ! 'देऊं चंद्रा—' म्हणती हे '—हांकोनी !'
रजनी सरली, परमेशाच्या नियमाला अनुसरुनी
आनंदानें जाय चंद्रमा लोकान्तरा निघोनी
ग्रामसिंह ते परन्तु चित्तीं धन्य आपणां म्हणती !
म्हणती, 'भिउनी कसा पळाला आम्हां चंद्रच अंतीं !'

---

* चंद्रविकासी पांढरीं कमळें. † दगडांतून (चंद्रकांत मण्यातून.) ‡ चंद्राला

## ३ : सुंदर सुवासिक आंबा !

पीतांबरावर सुरेख अपूर्व लाली
मोहें स्वयें हळुच ही दिसते दिलेली !
आम्रा ! खरोखर तुझ्यासम तूंच रम्य !
कोणा जगीं अरसिकाप्रति तूं न काम्य ?

कोणास हा मधुर गंध न वेड लावी ?
तो मात्र कल्पतरु जो, सखया, तुला वी * !
तूं वाटलास मज केवळ दिव्य लोकीं,
मी धन्य पावुन तुला किति जाहलों कीं !

प्रेमें तुझ्या प्रथम एकच चुंबनाला
घेतां, परी किति तरी तुज रोष आला !
माधुर्य सर्व सरलें तव तें क्षणांत !
' जिव्हा चिरीन !' म्हणशी, ' उपटीन दांत ! '

★

## ४ : नगा न ओळख अथवा पारख !

(अंजनी गीत)

कपी घेउनी बसला वीणा, । घूक † लागला घेऊं ताना,
रसिक न कोणी । जनीं म्हणोनी । श्मशान गानागार ! ‡
प्रबंध घेउन आला होला, ¶ । रुसला ! गेला ! निश्चय झाला–
' त्यजीन जगता, । अपणापुरता । करीन वाग्विस्तार.'
मंडूकानें प्रवचन केलें, । अरसिक जग हें दूर पळालें;
जगा सोडिलें, । तीर्थ पाहिलें, । तिथेंच मंत्रोच्चार !
आवडतें तें लाभे काका, । मारी अवघ्या जगता हांका;
कुणी न हाले । बघुनी बोले— । ' मीच करीतों पार ! ' §

* जन्म देतो. † घुबड. ‡ गायनशाळा. ¶ एक पक्षी. § मीच फन्ना उडवतों.

शिबिरासन्निध गर्दभ गेला, । महागर्जना करुनी थकला,
सेना न उठे । म्हणत तो सुटे— । ‘ भला जगीं कुंभार ! ’
इकडे तिकडे ससा धावला, । जगीं न जोडी तया मिळाला,
मंद जगाला । पुसे कशाला ? । रानीं विवरिं विहार !
वनीं, श्मशानीं वा एकान्तीं, । गेल्या, रमल्या किती विभूती !
जगा न ओळख । अथवा पारख, । हेंच यांतलें सार !

★

## ५ : जन्मा आला हेला, पाणी वाहतां मेला !

( अंजनी गीत )

जन्मा आले कितीक हेले । भार वाहुनी मरून गेले !
तुम्हां त्यांतले । चार मासले । दाखवितों मी आज
सधनमंदिरीं, अधनागारीं । देवद्वारीं, वा बाजारीं,
भरून उरले । असले हेले, । त्रिटला यांस समाज !
फुटकी कवडी, रुका, अधेला, । पैसा, रुपया कसाहि आला,
तरी घेतला । भरिला थैला, । नाहि कशाची लाज !
स्तवनें, पदव्या, मानपत्रकें, । कुठून आलें तरी सारखें !
बहु मानवला । म्हणे, ‘ घातला मीं पाठीवर साज ! ’
जगांत जितुकी घाण मिळाली, । उपसुन तितकी पखाल भरिली !
नुरली जागा, । करुनी त्रागा । म्हणे ‘ न कांहि इलाज ! ’
जन्मापासुन जे जे कांटे, । रुतले पत्थर, दीन सराटे,
वेंचुन ते ते । भरिलें पोतें । हेंच साधिलें काज !
दूर कराया यांचीं ओझीं । जाउं नका, ही विनती माझी;
अर्धे मेले । तरी बिथरले ! । सदैव यांना माज !

★

## ६ : माझीं फुलें काय झालीं ?

[ एक वृद्ध गृहस्थ होते. त्यांचा व कवीचा पारमार्थिक विषयासंबंधानें बराच पत्रव्यवहार झाला होता. या कविता प्रथमतः कवीनें त्यांना करून पाठविल्या. यांच्यायोगानें त्यांचें लक्ष पारमार्थिक गोष्टींकडे लागलें. ते म्हणत असत, कीं ' जरी या कवितेंत तुम्हीं माझी फजितीच केली आहे, तरी ती खरी आहे, व तेणेंकरून माझें लक्ष परमात्म्याकडे जात आहे. ' —संपादक ]

माझा मान, मदीय कीर्ति, मम हा संसार, हें जीवित,
विद्या, विक्रम सर्व ! सर्व जगतीं ज्यांच्याच हस्तंगत;
त्यांच्या पूज्य पदारविंदयुगलीं भूदैवतांच्या मम
माझीं मीं निवडून अर्पिलिं फुलें अत्यंत चित्तंगम

खालीं जीं उरलीं तयांतुन भलीं वेंचून मीं घेतलीं
गात्रें, हारतुरे करून, अपुलीं सानंद शृंगारिलीं;
झालीं सर्व फुलें, उगाच उरला जो गाळ हो खालतीं
त्यानें मीं समजाविले न गणती ते भीकमागे किती !

झालीं कांहि विशीर्ण , कीं हरवलीं , चोरीस गेलीं किती
कांहीं मूर्खपणें दिलीं अरसिकां साक्षात् विनाशाप्रती !
कांहीं मत्सररौरवांत पडलीं तद्रूपता पावलीं,
ख्रिस्ता त्वच्चरणांस वाहुं कुठुनी, झालीं, फुलें संपलीं !

झालों वृद्ध अतां, कसा फिरुं कुठें, आणूं फुलें कोठुनी–
अर्पाया तुज ईश्वरा ? विसरलों कैसा तुला यौवनीं !
घे घे एक मनःप्रसून उरलें या देहपात्रासह
वाटो हें तुज वत्सला प्रभुवरा ! अत्यंत सौख्यावह.

★

## ७ : माझि चिलीम्

( चाल : भुत जबर मोठें बाई ग० )

माझि चिलीम सारें माझें !
हिजपुढें तुच्छ शतराज्यें ! । माझि चिलीम् !

अनुबंध* सर्व तोडीला,
संसार सर्व सोडीला, । माझि चिलीम् !
घेतली नरोटी हातीं,
देहाची केली माती ! । माझि चिलीम् !
हिजसाठिं जगांतुन उठलों,
जीवंत असुन मी मेलों ! । माझि चिलीम् !
हिज कधीं न मी त्यजणार
जरि कोणीं केलें ठार ! । माझि चिलीम् !
हीं पृथ्वी, जल, नभ, वारा,
हें तेज, पसारा सारा ! । माझि चिलीम् !
हीं तत्त्वें हीच्या पोटीं,
देवता अनन्या मोठी ! । माझि चिलीम् !
मी हिला, मला ही राजी,
जीवितेश्वरी खरि माझी ! । माझि चिलीम् !
आकाश धरेचें जैसें
चुंबन हें अमुचें तैसें, । माझि चिलीम् !
नच सरलें, नच सरणार !
मेलों मी तरि उरणार ! । माझि चिलीम् !
तें कसें काय सांगावें !
तें मजला, हिजला ठावें ! । माझि चिलीम् !
चन हिला, मला पोशीती,
ही गणिती पुण्यप्राप्ति, । माझि चिलीम् !
या उदार हिंदिस्तानीं
मी धन्य ! धन्य जन्मोनी ! । माझि चिलीम्

* पाश, बंधन, संसारपाश.

## १ : नूतन संवत्सर

( वर्षप्रतिपदेवरून सुचलेले विचार )

हें कार्य, हें कारण या वचांहीं । स्वरूप ज्याचें उपलब्ध नाहीं;
काला तया कोण गणील कैसा ? । हें वर्ष, हा मास, वितर्क* जैसा !
प्रारंभ कोठें न कुणास ठावा, । संपेल केव्हां न कुणा सुगावा;
काला तया कोण गणील कैसा ? । हें वर्ष, हा मास, वितर्क जैसा !
थांबावयाचा निमिषार्ध नाहीं, । कधीं न ज्याला प्रतिबंध कांही;
काला तया कोण गणील कैसा ? । हें वर्ष, हा मास, वितर्क जैसा !
जें दृश्य जें ज्ञेय तयास नांवें । द्यावीं, कसेंही मन रंजवावें;
हा अर्थ तूझा लघु मानवा रे ! । निरर्थ तूझे व्यवहार सारे !
जुनें नवें भेद हवा कशाला ? । ही वर्षमासादिकनाममाला ? †
जो अक्षयीं पूर्ण विलीन झाला, । जगीं सदा सर्व नवीन त्याला
मी लेकरूं त्या परमेश्वराचें, । सदैव माझें नव वर्ष साचें !
माझा मला प्रत्यय सांगताहे । कालाहुनी उच्च मनुष्यता हे ! ‡

★

## २ : नवें वर्ष

( चाल : अर्पिलें सुमन० )

ही कालतरूवर नूतन कलिका फुलली,
ही दिसे रसें थबथबली, । पाहतां वाट हो कसली ?
माधुरी घ्या खरी म्लान जों न जाहली !
ही कालतरूवर नूतन कलिका फुलली,
ही कुणा विषारी दिसली, । प्रभुकरीं तरी ती रमली,
ही सुधा ! या, सुधा ¶ भ्रांति नाहि चांगली !

---

* कल्पना. † वर्षे, मास, हीं नांवें तरी कशाला हवींत ? ‡ ही. ¶ व्यर्थ.

ही कालतरूवर नूतन कलिका फुलली,
ही असे खरोखर अपुली, । ईश्वरें आपणां दिधली,
चिंतुनी त्या मनीं, व्हा इच्यांतले अली * !

★

## ३ : थोडें थोडें ! हळूहळू !

(चाल : भला जन्म हा० )

थोडा थोडा म्हणतां म्हणतां काळ चालला कसा
करांतुन सुटलेला बाणसा !

जीव रंगला प्रपंचरंगीं बघे न त्याच्याकडे
दिसेना तया, पुढें सांकडें !
सदा उसासे, तयास भासे मंदाहुन मंद हा,
स्ववंचक मानव तितुका पहा !
पळ पळे, तयाच्या मागुन घटि धावते,
घटिमागुन दिन, ही परंपरा लागते,
वय वारितरंगाहुनी तरल भासतें !
सुखदुःखाच्या जालामधुनी संतत धावे पिसा
काळ हा घेउनियां माणसा !

थोडी थोडी नभोमंडलीं प्रसन्नता शोभली,
हळु हळू रवि ये उदयाचलीं.
थोडा थोडा हासत हासत दिवस खदखदां हसे !
गुदगुल्या करितां बालक जसें !
हळुहळू पावली प्रसार ही साउली,
हळुहळू पुढें ही संध्या सरसावली,
हळुहळू अंधिका † सत्तेला पावली,

* भुंगे. † रात्र.

हळूहळू अधिकार प्राप्त हो जगांत निद्रालसा,*
तांतडी शब्द न कोठें जसा !

हळूच लाजत पुढें येउनी एक नभीं तारका
दावितें अपुल्या सस्मित मुखा;

हळूच दुसरी, तिसरी, चौथी–अगण्य तारावलि
अंबरीं चमकाया लागली !
हळुहळू उदित हें चंद्रबिंब जाहलें,
हळुहळू विरलता तारामय पावलें,
हळुहळू रजनिनें पद मागें घेतलें,
हळूच सारी दूर तमाचें पांघरूण ही रसा, †
उदेला दिनही पहिल्या असा !

'थोडें थोडें, हळू हळू' हें ध्रुवपद ज्या जोडिलें
असें हें गायन मधु चाललें;
नादें याच्या जीव सकलही अपणांला विसरले
कालचें, पुढचें कोणा कळे !
हा काल हसे ही मौज अशी पाहुन,
परि उभा न राही केव्हां कोठें क्षण !
हा पळे सदाचा जीवांना घेउन !
'ऐका ऐका गायन' बोले 'नाचा, डोला हसा !
शेवटीं फसाल तेव्हां, फसा !'

हळूच उठला जाउन बसला कोणी कोठें तरी
मुखच्छवि‡ गंभीर परि हासरी !
हळूच उचली वीणा अपुली चढवी तारा वरी,
स्वताशीं गानारंभा करी;
हा काल धरोनी ताल डुले गायनीं,
दशदिशा रंगल्या सहजपणें नर्तनीं,

* झोपाळू माणसाला. † पृथ्वी. ‡ मुखकांति.

फल काय कुणाला गुह्य* उगा सांगुनी !
एक करा, या ! या गवयाच्या चरणाजवळीं वसा !
येइल अनुभव मग अल्पसा.

★

## ४ : एका उन्मनस्काला पाहून

(चाल : मी साहिन हाल सुखानें०)

त्वां काय पाहिलें सांग ? । त्यज किंतू†, सांगच तूं,
त्वां काय पाहिलें सांग .

मूर्च्छित होसी, धावत सुटसी,
रडसी, हससी, नससी, असस़ी,
हें सांग कशाचे ढंग. त्यज किंतू, सांगच तूं,
त्वां काय पाहिलें सांग .

विस्मृतिच्या तूं बुडसी डोहीं,
स्मृती तुला परिरंभुनि‡ राही,
हे सांग कशाचे रंग. । त्यज किंतू, सांगच तूं,
त्वां काय पाहिलें सांग.

दिससी येथें, रमसी तेथें,
विसरुनि जासी परि उभयांतें,
तुज तुझाच नाही थांग¶ ! । त्यज किंतू, सांगच तूं,
त्वां काय पाहिलें सांग ?

स्थिती, अस्थिती, ही किंवा ती ?
किंवा दोन्ही एकच होती ?
हा काय वियोगीं योग ! । त्यज किंतू, सांगच तूं,
त्वां काय पाहिलें सांग.

प्रेमरसायन, हें मधुगायन, । नितान्त सुंदर हेंच मुकेपण !
हें काय ! सांग ! मज सांग ! । त्यज किंतू, सांगच तूं,
त्वां काय पाहिलें सांग.

---

* रहस्य. † शंका. ‡ आलिंगुनि, बिलगून. ¶ शुद्धबुद्ध.

## ५ : मधमाशीला

[ ‘ मासिक मनोरंजना’च्या १९११ जुलैच्या अंकांत ‘ Bee ’ नामक कवीची एक सुंदर कविता प्रसिद्ध झाली होती. त्या कवीला उद्देशून ही कविता रचिली गेली आहे. —संपादक. ]

( चाल : पहा उघडिलें हृदयाला० )

जीवन, जीवन, जीवन गे !
वर खालीं जीवन अवघें !
मधे अष्टदल पद्म डुलें,
हृदय तयाचें सदा खुलें !

तूं मधमाशी । गुं गुं करिशी, । सदा बिलगशी
या कमला; तूं, खरि मधुप !
अन्य न तुज ठावा व्याप !

गुं गुं गुं गुं चालूं दे !
विश्व झुलो याच्या नादें !
तूंच वसंताची आई !
खेळव, म्हण त्यां अंगाई !

रसज्ञ, हौशी, । तूं मधमाशी; । सदैव तुजशी
सुखद सृष्टिचा आटोप,*
वेदान्त्यां अध्यारोप† !

‘ मी नच माझी, नच त्याची, ’
‘ मी न तुझी ’ म्हण ‘ कोणाची !’
विस्मरणाचा पी प्याला
डुलव, खुलव या कमळाला !

स्वार्थपरायण । आम्ही त्यांतुन । करूं मधु सेवन !
विसरुनि चोरांना साफ !
असेच कर तूं आलाप !

---

* पसारा, व्याप. † वेदान्ती दृश्य पसारा परमार्थतः मिथ्या मानतात. असल्या रज्जूवर नसल्या सर्पाचा आपण अंधारांत आरोप करितों, तद्वत् असल्या सत्तत्वावर आपण नसल्या जगताचा आरोप करितों असें त्यांचें मत आहे.

## ६ : कारण मी वेडा नुसता !

[एकदा कवीनें एका सन्मान्य गृहस्थाला कांहीं कामानिमित्त चिठ्ठी लिहिली असतां तींत चुकून शिष्टसांप्रदायाचा भंग झाला व त्यामुळें सदहू गृहस्थाला थोडें वाईट वाटलें. हा गृहस्थ केवळ साधु असून याचा व कवीचा अप्रतिम स्नेह होता. त्या नात्याला अनुसरून कवि प्रांजलपणें त्याला म्हणत आहे—]

( चाल : पहा उघडिलें हृदयाला • )

सोडा अवघा राग अतां, । ओळखून घ्या मज पुरता !

गिरिशिखरावर उभा असो, । दरींत किंवा कुणीं वसो;
समान दोघेही मजला, । कारण, मी पुरताच खुळा !
'वरी खालती' । जगांत म्हणती, । परन्तु दिसतीं *
एकच मज अवघी सत्ता ! । कारण, मी वेडा नुसता !

गगनीं तारक चमचमतीं, । भूगर्भी रत्नें दडतीं,
फुलें मुदा आम्हांपुढतीं । करितीं स्मित, खदखद हंसतीं !
एकच दिसते । सुन्दरता ते ! मनांत उठते
लहरी, ती † एकच बघतां ! । कारण मी वेडा नुसता !

बाळक खांद्यावर चढलें, । हें अंकीं दुसेंर रमलें;
तिजें बिलगलें हें हृदयीं, । चवथें करि गृहिं अंगाई,
असो सन्तति । कुठेंहि परती ! । परन्तु दिसती
उभी एक ही वत्सलता । कारण, मी वेडा नुसता !

महापदीं हा विराजला, । खनींत खणुनी हा दमला,
सेवक दोघे एकाचे । संस्रातिचे ! तत्कर्त्याचे !
सूर्य नभींचा, । दीप गृहींचा । भेद न यांचा
म्हणाल तें मज म्हणा अतां ! । खराच मी वेडा नुसता !

---

* दिसते. † सुंदरता.

दहा लाख रुपये याचें, । एकवार हसणें त्याचें;
एकच मजला । काय करूं । मी नसलों जर पोटभरू !
हा चुंबीतो, । तो ताडीतो, । पण मी म्हणतों—
'एकच अवघी प्रेमलता !' । कारण, मी वेडा नुसता !

बुद्बुद, लहरी बघतांना । म्हणती जन हा उंचपणा !
बुद्बुद, लहरी फुटतांना । पुन्हा तयाला नीचपणा !
परन्तु जीवन । एक चिरन्तन ! । मजला यांतुन
दावुन किती दमले द्वैता ! । कारण, मी वेडा नुसता

मजहुन मोठा एकच मी ! । पुन्हा मजहुनी मीच कमी !
केवळ माझ्या ! मम हस्तीं । लहान मोठें या वृत्ति !
कशास रुसतां ? । कलहा करितां ? । वृथैव दमतां
कां मजपुढतीं आरडतां ? । खराच मी वेडा नुसता !

★

## ७ : आंधळा झालों तर—

[ बारा वर्षांपूर्वी कवीचे डोळे येउन आतां ते जातात अशी स्थिति प्राप्त झाली असतां, कवीच्या मुखांतून हे उद्गार निघालेले आहेत—]

मेला होशिल तूं जगास म्हणती झालों जरी आंधळा;
खोटें हें भय; काय चित्त सकलव्यापी नसे हें मला ?
सृष्टीचें मधु बाह्य रूप न दिसो डोळ्यांस चिंता न ते *
ती † हंसीसम मानसीं मम सदा सानंद हो खेळते !

मूर्ती मोहक ज्या पुढेंच दिसती स्वप्नांत जागेपणीं
त्या त्या काय विलोकितों सकल मी, सांगा, मला लोचनीं ?
ज्या अत्युत्तम लाडक्या अधिक त्या संस्पष्ट होती मला
जेव्हां मी नयनां मिटून बघतों प्रेमें पुढें त्यांजला.

* ती. † सृष्टी.

होती शंभर कोस दूर मजला सोडून मूर्ती प्रिया,
मध्यें डोंगर उंच उंच टपले दृष्टीस झांकावया,
होतों पाहत मी तिला परि सदा, आश्चर्य हें काय न ?
नेत्रें इष्ट मला; परंतु नच हें नेत्रावलंबी मन !

जरी नेत्रें गेलीं तरि अनुरती काय सरली ?
जरी नेत्रें गेलीं तरि मति मला का विसरली ?
जरी नेत्रें गेलीं तरि हृदय हें का हरपलें ?
जरी नेत्रें गेलीं तरि अशुभ तें काय घडलें ?

सृष्टी अमर्याद नवीन कांही
पुढें तुला रे दिसणार नाही
खरें; प तूं नवसृष्टिकर्त्री
माझी सखी दूर न काव्यशक्ति.

आजवरी सम जी सुखदुःखीं,
अंधपणीं कशि ती मज टाकी ?
दाविल नित्य नव्या मज गोष्टी,
देइल ही कविता नव तुष्टी.*

ज्याला कोणि जगांत मौन म्हणती, किंवा कुणी स्तब्धता,
त्याची ही श्रवणांविणा परिसतों मी गोड वाचालता;
किंवा अक्षयता जयेस म्हणती आद्यन्त तीचा दिसे,
झालों मी जरि आज अंधबहिरा तें दुःख मातें नसे !

अनेकविध दर्शनीं मन चळे तुझ्यापासुनी,
म्हणून जग चिंतितें तुज विलोचनां झांकुनी;
बघेन तुजलाच मी सतत अंध झालों तरी,
नकोत नयनें ! प्रभो ! वसति मन्मनीं तूं करीं !

---

* संतोष.

## ८ : अश्रुगुच्छ

[ खरा मनुष्य जसा आपल्या परिस्थितीचा, तसाच अन्तःस्थितीचा स्वामी आहे, हें कवीचें मत व श्रद्धा हीं या कवितेंत उत्तम रीतीनें व्यक्त झालीं आहेत. —संपादक. ] ( चाल : पहा उघडिलें हृदयाला० )

किति वेळां सांगूं तुजला ? । ऋतु शोकाचा अवतरला !
प्रेमतरू सारा फुलला ! वेंच अश्रुंच्या सुमनांला;
वेंच कशाला ? । हालव याला ! । वधुं दे झाला
सडा फुलांचा जगताला, । पैल तिरीं रमला त्याला !
तुझ्यासवें चल मी येतों, । उशीर कसला आतां तो ?
पाउस सुमनांचा वर्षो ! । फुलवेडा तितका हर्षो !
हात धरीं मम । ये ! मोसमम । नाचूं ! हे श्रम—
म्हणेल वेडा गणुं त्याला । ज्ञात्याच्या आजोबाला !
प्रेमतरूवर चढूं चढूं । तेथुनि वरवर उडूं उडूं !
एक भरारी, मग दुसरी, । दुसरी, तिसरी कितीतरी !
नको भिऊं, चल, । मीच तुझें बल, । जगताचें बल
मींच ! मुखीं मम तो प्याला । जो न सुरांला असुरांला !
यांतुनि थेंबच घे एक, । मौज कशी होते देख !
संगें मग नलगे कोणी । फिरशिल मग भृंगावाणी !
भृंग कशाचा ? । तुला पिशाचा, । भिईल वाचा !
कुठून दे मग नामाला ? * । पिशाच म्हटलें उगिच तुला ?
मनोवृत्तिचीं फुलें फुलें ! त्यांत रंगले दोन खुळे !
तूं, मी फुललें हसूं रडूं ! । मनास माने तेंच खुडूं !
अरे ! विसरलों ! । अरे ! वसरलों ! । उगा उतरलों !
विश्वच सुमनांचा झेला, । चल परतूं त्या ठायाला !

---

* बाघाच तुला भ्याल्यावर तुला ती नांव तरी कसें देणार ?

## ९ : अतां कोण्या वसंताचें म्हणूं सांगा मला गाणें ?

( चाल : सुनो ऐ जानमन तुमको यहांसे कूच करना है० )

तुम्हां जैसें रुचे तैसें रसज्ञांनो ! कसें गाऊं ?
कुठें गेलों कुणा ठावें ! कसा वाटेवरी येऊं ?
क्षमा मागें, नका रागें भरूं, ऐकून घ्या सारें,
कसें केव्हां किती माझ्या भरे अंगीं नवें वारें !

वनीं एका दिनीं गेलें पहायाला वसंताला,
विचारीतां कुणालाहि नसे ठावें कुठें गेला !
मनीं नाही, जनीं नाही, वनीं भेटेल आशा ही
मला होती; परी आशा दुजी स्वप्नाहुनी नाही !

घरीं येणार, तों कोणी मला भासे मला बाही,*
क्षणामध्यें पुढें येई, करीं माझ्या करा घेई.
अहो ! दिव्याहुनी दिव्य स्वरूपाची जणूं खाणी !
अहो ! ब्रह्माण्डगोलाची उभी तेजस्विनी राणी !

तिला पाहून स्वत्वाचें त्यजी सारें मला भान,
कुणा ठावें कुठें होती वपू † होते कुठें प्राण !
पुन्हा झालों क्षणें जागा, क्षणें होणार जों मुग्ध, ‡
¶ तिचें आणी मला शुद्धीवरी संबोधवैदग्ध्य. §

मला सप्रेम गोंजारी, पडे तेणें मला भूल—
वयाची वा प्रतीतीची, || क्षणार्धीं मी बनें मूल !
मला अंकावरी घेई जशी माझीच ती आई !
बघे प्रेमें, हसे प्रेमें नुरे प्रेमाविना कांही !

---

* बोलावी. † शरीर. ‡ बेभान. ¶ ब्रह्माण्डाच्या राणीचें. § हाक मारण्याचें कौशल्य. || अनुभवाची.

जिथें प्रीती तिथं भीती, न हें केव्हांहि होणारें !
नये बोलूं प्रकाशाला स्वयें पाहीन अंधारें !
करें झांकी पसारा हा, वदे आतां दिसे काय ?
अहा ! सारेंच सौंदर्य–प्रमोदें मी म्हणें–माय !
करा काढी, म्हणे पाहों जगीं कोठें दिसेना तें !
मुका झालों बघोनी मी नव्या सौंदर्यविश्वातें !
गुलाबाचीं फुलें रम्यें दिसे तैशीच कोन्हाटी !
नुरे भिन्नत्व जें सांचे मनुष्याच्या सदा हाटीं. *
फुलें सारींच नक्षत्रें; खडे सारे हिरे होती !
भरे सौंदर्य हें विश्वीं, भरे नेत्रीं ! भरे चित्तीं !
म्हणे 'जाऊं चला स्वर्गी !' 'नको देवी !' म्हणालों मी,
'तिथें नाही नवें कांही घरीना जें इथें भूमि !'
म्हणे 'जा जा, वसंताला तुझ्या कोठेंहि धुंडाळ !'
म्हणालों मी 'वसंताच्या मुठीमध्ये दिशा काळ !'
बरें माना, बुरें माना, खरें सारें; दिसो गूढ,
गणी गूढा न हो खोटें कधीं ज्ञाता, परी मूढ.
अतां कोण्या वसंताचें म्हणूं सांगा मला गाणें ?
निधीमाजी † रमे मासा कशाला तो घडा ‡ जाणे ?
असो, आशा रसज्ञांनो ! तरी आतांहि गाईन–
तशा रागामधे संज्ञा जया देतां तुम्ही मौन !

---

* बाजारांत. † पयोनिधीमध्ये, समुद्रामध्ये. ‡ घट, मडकें.

★

## १० : श्रमसौंदर्य

[ पुष्कळ लोकांना असें वाटतें कीं, कवि एकान्तांत, निवृत्तावस्थेंत असला आणि त्याला नुसतें फुलें गुंफावयाचेंच काम असलें, म्हणजे तो उत्कृष्ट काव्यें करील. पण संसार, तत्संबंधीं चिंता व श्रम हें सारें आनंदजनक व स्फूर्तिदायक आहे; कारण आनंद व स्फूर्ति यांचें मूळ बाहेर नसून मनुष्याच्या अंतःकरणांत आहे व त्याचा खरा विस्तार प्रवृत्तावस्थेंतच होत असतो, असें समजणाऱ्या या कवीचें म्हणणें निराळें असून, तेंच तो या कवितेंत विशद करून दाखवीत आहे. —संपादक. ]

( चा : प्रेमा ऊठ चल उघड झांकिली मूठ• )

फुलें गुंफावीं ! तुज म्हणुनी जन्मप्राप्ति !
  तूं फुलमाळी, नलगे भ्रांति !
  कुऱ्हाड परि तव खांद्यावरतीं,
  हा काष्ठांचा डोंगर पुढतीं,
पुरी रे फजिती ! तव जन्माची ही माती !
  मातींतच परि फुलें उगवतीं,
  मातीहुनि जरि भिन्न दिसतीं,
  अंधाराच्या उदरीं येतीं,
रम्य नक्षत्रें ! ही परमेशाची नीति !
  कुऱ्हाडिचें मम बघ रे पातें,
  रत्नकेतकीपर्णच नुसतें !
  नागासम मज हें डुलवीतें !
अहा देवाची ! मजवरी दया ही पुरती
  देहतरू हा माझा फुलला
  घर्मबिंदुंनीं म्हणशिल ओला,
  म्हण; परि सुमनांचा हा मेळा
मला दे शोभा ! ती अभिनव अवघ्या जगतीं !

आघातांनीं चिन्हें केलीं
म्हणशिल, म्हण; परि सुमनें सगळीं !
मुठींत माझ्या मीं सांठविलीं,
सदा फुललेलीं ! हीं म्लान न केव्हां होतीं !

बघ या अधरीं, बघ या नयनीं,
फुलें किती हीं भरलीं खचुनी !
हीं स्वर्गांतुनि पडलीं गळुनी !
हींच उधळीतों ! मी ज्याच्या त्याच्यावरतीं !

★

## ११ : कोलाहल-मौन-गान

[ घरांत, बाहेर व अर्थात् मनांतहि शांतीला लवमात्र जागा नसतां एकदा कवी आनंदानें गात असलेला पाहून एकानें त्याला विचारलें "तुम्हांला अशा प्रसंगीं गाणें सुचतें तरी कसें ?" त्यावर कवीनें त्याला हें उत्तर दिलें.— ]

हा कोलाहल चराचरा । पुरापुरा व्यापुन उरला,
उरला ! परि यावर सरला, सरला, मधुरव सरसरला !

भेसुर बेसुर ! मेदुर* अंबर ! । त्यांत एक परि मधुर, मृदु स्वर,
नका कोणता पुसूं मला, ठाऊक तो माझा मजला !

कलकल कलकल कलकल सारी, । कलरव हींतच चेतोहारी !
नका कोणता पुसूं मला, ठाऊक तो माझा मजला !

ही विश्वाची भयकर घरघर, । त्यांतच पंचम कोमल मधुतर,
नका कोणता पुसूं मला, ठाऊक तो माझा मजला.

प्रपंच अवघा धूमधडाका, । त्यांतच गाते एक सारिका,
नका कोणती पुसूं मला, ठाऊक ती माझी मजला.

अन्तर्यामीं गडबड जंगी । तिथेंहि वाजे परि सारंगी !
नका कोणती पुसूं मला, ठाउक ती माझी मजला !

वाढो कोलाहल हा शतगुण, । जे जे बसतिल मौना बिल्गुन,
ऐकवीन तें त्यां सकलां, जें ठाउक माझें मजला !

---

* मेघैर्मेदुरं = मेघव्याप्त.

# १ : माझ्या जन्मभूमीचें नांव

सृष्टी तुला वाहुनी धन्य ! माते, अशी रूपसम्पन्न तूं निस्तुला*
तूं कामधेनू ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला;
या वैभवाला तुझ्या पाहुनीयां मला स्फूर्ति कृतार्थ होते जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी !

माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते, तुझे शूर योध्दे, तुझे सत्कवि,
श्रेणी† ययांची सदा माझिया गे मना पूजनीं आपुल्या वांकवी !
यांचीं यशें ज्या नव्या सद्गुणांना मला अर्पिती, ध्येय ते गे जरी,
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी !

तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी
झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी !
आई ! गुरुस्थान अन्तीं जगाचें तुझें ! यांत शका न कांही जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं कोठें तरी !

वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला मला लाधला ! भाग्य हें केवढें !
माते ! स्वयें देशि जें अन्नपाणी, सुधा बापुडी कायशी त्यापुढें !
तूं बाळगीशी मला स्कन्धि अंकीं ! सुखाची खरी हीच सीमा पुरी !
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी !

---

* अतुल, निरुपम. † मालिका.

## २ : राजनिष्ठा

[ वीणाकाव्य चतुर्दशक ]

राजनिष्ठ हो राजनिष्ठ हें विश्व दिसे मजला,
शिकुन घेतला या विश्वानें धडाच हा पहिला.

पोरवयीं तर बाष्पच केवळ ही चंचल धरणी,
काय कळे हिज ? तरी ओळखी निज राजा तरणि.

नियम तयाचा कसा कळे हिज ? परि निष्ठेनें त्या
समर्याद ही, जरी स्वैरिणी बालवृत्ति जाल्या.*

तारुण्याच्या भरांत किंवा आतां प्रौढपणीं,
या निष्ठेनें सदैव धरिलें हिजला आंवरुनी.

इकडुन ओढी हिज, हा तिकडुन तों ओढी दुसरा,
एकमार्गवर्तिनी तरीही कोणी कांहि करा.

गिरगिर गिरक्या हिच्याभोंवतीं रात्रंदिन घाली,
अशासही ही नियम सोडुनी वश नाही झाली.

निजरायाच्या चरणीं निष्ठा हीच हीची शक्ति
हीच इयेची भुक्ती, हीची ही जीवन्मुक्ति !

अहो जलांनो ! सांगा सांगा स्वभावतरलांनो !
तुम्हा आंवरी कोण ? तूमची भिन्न गिरा वानो.†

बोल निर्झरा ! म्हणणें अपुलें दावीं गावोनी,
महासागरा ! सांग ऐकवीं गाढ तुझी वाणी.

करा करा गडगडाट घन हो ! द्या उत्तर याचें,
सरोवरा ! हस, मला समजती सर्व अर्थ त्याचे.

---

* उपजत. † वर्णो.

हिमबिंदो तूं सांगच अपुल्या कानांतच माझ्या,
कोण तूमचा आश्रय ? शास्ता ? कोण बरें राजा ?
ज्या धरणीच्या अंकीं, स्कंधीं आनंदें रमतां,
हसतां, रडतां, प्रेमाश्रूंनीं तिजला भिजवीतां;
ती तुमची प्रिय माता वंदी ज्याच्या नियमाला,
राजा तुमचा तोच रवी ना ? ऐकूं द्या मजला.
राजनिष्ठ तुम्हि म्हणुन वाटतें तुमच्या तोंडानें
ऐकावीं मधु, भक्तिरसें युत त्याचीं जयगानें
आस्तिक्याचें जनक तूं, महापात्र जीवनाचें,
जिकडे तिकडे विश्वीं भूर्ती* तेजा ! तव नाचे !
तमोनिवारण हें तव कारण, मारण मरणाचें
तूंच तूंच रे ! तेजा ! दर्शन तूं अक्षयतेचें † !
मला वाटतें प्राण तूं खरा पंचमहाभूतीं,
कळो मनाला, परि रसनेला अवर्ण्य तव महती !
तुझींहि निष्ठा निज रायाच्या नियमीं अनिवार,
राजनिष्ठ ते विजयी विश्वीं, हेंच यांत सार.
प्रभाव तेजा ! तुझा विचरतो जगांत संदेष्टा, ‡
सांगत कीं ही सर्वसाधिका राजपदीं निष्ठा.
निज रायाचें अनुसारी ¶ तूं, तूंच रूप त्याचें,
वैभव त्याचें, ऐक्य अलौकिक केवळ हें तुमचें !
तेजा ! तव हें चारित्र बघतां, महती बघतां हे,
वाटे जग हें आहे, कारण राजनिष्ठ आहे.
रुष्ट या क्षणीं, तुष्ट त्या क्षणीं, हा चंचल वारा,
स्वैरपणाचा जणों निर्मिला परमेशें थारा.

* महत्व. † चिरंतनत्व. ‡ प्रचारक. ¶ अनुयायी.

हाही म्हणतो राजनिष्ठ मी, राजाज्ञाबद्ध,
उच्छृंखल मी दिसलें किंवा दिसलें मृदु, मंद;
रोषतोष हीं रूपें नांवें भिन्न, परी वृत्ति
एकच माझी, राजनिष्ठ ही एकाच्या हातीं.

त्या एकाच्या नियमें प्रेरित, कर्तव्यीं दक्ष,
कोण काय बोलतो न इकडे लव हीचें लक्ष.

मला विलासी म्हणती कोणी, म्हणती हा छंदी,
अदय मी पुन्हा सदय, लोक हा मज निंदी वंदी.

राजनियमनें जनपदकार्यी * रत जो जो त्याचें
दैव हें असें ! अनुभव ज्याला तोच म्हणो साचें.

राजशासनाविना इकडचें तिकडे पान न हो,
दुबळें अवघें विश्व त्याविना, मी तर मेला हो.

असे मांडलिक अशा प्रजा ज्या त्यांचें अधिकरण
तूं आकाशा, तुलाच शोभे अनंत अभिधान.

तुझ्या भुजिष्या † सदा ‡ शोभती या दाही आशा ¶
अमर्याद हा काल बंधु तव कीर्तित अवकाशा.

अनंत कोटी विस्ताराचें पिधान § तूं व्योमा,
ज्यानें तुज निर्मिलें जाणतो तोच तुझा भूमा. ||

कार्यावेक्षण ** नियोग †† तव हा अगा अन्तरीक्षा !
द्यावापृथ्वीमधे उभा तूं लावुनियां लक्षा.

कोणाचा हा नियम ! नियोजन कोणाचें सांग !
कोण करी हा तुझ्यावरी रे राजा अनुराग !

पुन्हा एकदा दुंदुभिघनरव, प्रद्योतन §§ करुनी
जयजयकारें निजरायाच्या टाक विश्व भरुनी !

---

* देशकार्यी. † दासी. ‡ सहनशील. ¶ दिशा. § झांकण. || महत्त्वविस्तार.
** देखरेखीचें काम. †† नेमून दिलेलें काम. §§ प्रकाश, लकलकाट.

राजनिष्ठ मी देतों चढवुन वीणेच्या तारा,
देउं दणाणुन चल ये आपण विस्तर हा सारा !
तूं संकर्षकबिंदुच* केवळ हे अन्तःसृष्टि !
विश्वें घ्यावीं सांठवून ही एक तुझी जुष्टी. †
कौतुक करिशी तूं चुंबीशी, तूं आलिंगीशी
विश्व सकल हें, क्रीडाकंदुक याचा तूं करिशी !
कारणकार्यामधला तूं गे सुंदर सोपान,
तूंच समापन‡ याचें, तव गे ज्ञेय सती ज्ञान.
गती तुझी याच्याहि पलिकडे तूंच जशी राणी
सकल जगाची दिसशी न जणों तुज शास्ता कोणी.
परंतु न असें, तूंच मात्र गे आकळिशी त्याला,
अन्तःसृष्टी, व्यापुन उरला जो या दिक्काला.
राजनिष्ठ तूं, या राजाच्या ध्यानदर्शनांत
रत तूं, यास्तव त्यासम तुजही नाहिं कदा अंत.
अन्तःसृष्टि, प्रतिनिधि अपुल्या तूं गे स्वामीची,
भक्ति तुझी तत्पदीं तोंवरी अजिंक्य तूं साची
हे संसारा ! तुझी प्रतिज्ञा कीं जें अनुभविलें
तेंच म्हणावें खरें, न तितुकें मान्य तुला वहिलें.§
तुझा आमुचा संग न तैसा जगतीं कोणाचा,
त्रिवर्ग¶ म्हणती तो साधाया मार्गच तूं अमुचा.
शास्ता शासन यांविण नांदे असें तुझें अंग
एक जरी असलें तरि तें मज कृपा करुन सांग.
जें जें जगतीं घडे तयाचें माहेरचि पहिलें
ऐसें गृह, हें सांग मला का शास्त्याविण चालें ?

* Focus. † आनंद. ‡ समाप्ति. § त्याहून निराळें. ¶ धर्म, अर्थ आणि काम.

ही राणी, हा प्रधान, ही प्रियप्रजा एकनिष्ठ,
मिळुनी गृह हें संसारा, तव कार्य करी इष्ट.

तूं संसारा! सागर विस्तृन तुजवरतीं नौका
असंख्य परि या सुकर्णधारांविनाच तरती का!

अधिष्ठानपद* पूज्य म्हणोनी तूं, तव विस्तार,
राजनिष्ठ तूं, तुझे भक्त; हें यांत खरें सार!

हिंदभूमि! तूं राजनिष्ठ हें मज, जगता ठावें;
ये, गाऊं ये निज रायाला जयगीतें भावें.

आंग्लभूमि तूं भगिनी, जुळिलें हें ज्यानें नातें
चल ये, वंदू ऋणी होउन त्याच्या चरणातें.

दर्शन त्याचें तुला घडे हें महाभाग्य जाण,
नाही नाही तुला कशाची यापुढतीं वाण!

ध्याऊं ये गे, परात्पराला प्रार्थू कीं त्यानें.
द्यावीं प्रिय राजास राणिला सदैव वरदानें.

प्रेमतरूंना धरून हलवूं ये आपण दोघें,
अश्रुसुमांचा सडाच होइल मग जननी ओघें.

या सुमनांनीं पूजूं आपण ये राजाराणी,
ताल धरीं तूं, मीं म्हणतों ये मधुरमधुर गाणीं!

राजनिष्ठ तूं, तुझीं लेकरें पाहुन जगदीश
करो आपणां सकलांवरतीं कृपादानवर्ष!

---

* मुख्य चालकाचें पद.

★

## ३ : शुभाशुभाचा संगम हा !

विचार ज्याचे उच्च अति, । तयाचीच अति नीच कृति;
हें जेथें अनुपम शौर्य, । तिथेंच हें पशुचें क्रौर्य;
हा उत्साही, । परंतु नाही । विचार कांही;
उदात्त याची हेतुतति,* । परंतु दुर्बल, भीरु मति !
दयापूर्ण याचें चित्त, । प्राणप्रियतर परि वित्त;
कपट न याला कधीं शिवे, । क्रोधानें परि वेडावें;
याची ज्ञप्ति † । अद्भुत, परि ती । केवळ माती !
विषयासक्तीनें दैना । केली ! जाळा त्या ज्ञाना !
कार्यक्षम‡ हा खरा खरा, । आत्मस्तुतिचा दास पुरा;
शूर खरोखर हा दानीं, । परंतु भारी अभिमानी;
ईश्वरचिंतन । करी चिरंतन । परंतु अंत न
द्वेषी जगताला याला, ¶ । स्वार्थाला केवळ विकला !
एक असे तों एक नसे । मनुष्यपण हें असें असे !
शुभाशुभाचा संगम हा ! । मोहाचा आवर्त महा !
अशा नराला । तारायाला । एकच झाला
जगामधें अवघ्या त्राता, । दिव्यशुद्धजीवनदाता.

---

* हेतूंची रांग. † ज्ञान. ‡ कर्तृत्वशाली. ¶ या जगताला.

★

## ४ : वैचित्र्य आणि ऐक्य

भिन्न भिन्न या छाया रंगहि भिन्न भिन्न जगतांत,
संमेलन हें यांचें निर्मी रमणीयता नितान्त
भिन्न फुलांचें संमेलन हें उपवन चेतोहारी,
भिन्न मुलांचें संमेलन हें गृह अमुचें सुखकारी;
भिन्न रसांचें संमेलन हें काव्य जगांत सुरेख,
भिन्न नभींचे तेजोराशी मिळुन दिव्यता एक;

भिन्न सुरांचें संमेलन हें मनोहारि संगीत,
भिन्नांगांचें मधु संमेलन सौंदर्य प्रख्यात;
भिन्न वृत्तिंचें संमेलन हें अंतःकरण नराचें,
भिन्न भिन्न हीं अंतःकरणें अंतःकरण जगाचें !
ब्रिटॅनिए ! हें नव्हतें, नाही अंतःकरण जगाला !
असलें तरि तें शतधा केवळ कारण संत्रासाला.
अंतःकरणें भिन्न भिन्न हीं हळूहळू तूं जुळिशी,
कालेंकरुनी होइल यांचा परममनोहर राशी.
हा राशी, हा समुच्चय, मनःसंमेलन, हें ऐक्य
करील या जगताचा अमुच्या दुसरा स्वर्ग सुरेख,
या विश्वाचें रचिणारें मग अंतःकरण रमेल
या स्वर्गीं नव, सुखशांतीचें निधान हेंच गमेल !*

★

## ५ : ऐक्याचा आभास

वात्याचक्रें† एक रंगणीं भिन्न भिन्न रेणूंना
नाचाविलें; वा पूर कालवी पदार्थ डोहीं नाना.
किंवा येथें कीटक, दडला महाव्यालही तेथें,
पक्षी येथें, संघ पशूंचा शरण इथें छायेतें.
कीटक अवघे, महाव्याल तो, पशुपक्षी हे गाती
'माझा ! माझा !' म्हणुनी तरुला प्रेमें गौरव देती.
धनी तरूचा या सर्वांहुन करी उच्चतर वाणी,
म्हणे 'तरूचा स्वामी मी हो ! जगीं न दुसरा कोणी !'
भिन्न भिन्न हीं सत्त्वें, यांचें ममत्व एका ठायीं,
या संसारीं स्वार्था तुजसम विक्रमशाली नाही !*

---

* ४ व ५ ह्या कविता 'ब्रिटानिया' नांवाच्या काव्यांतून घेतलेल्या आहेत.
† वावटळीनें.

हा स्वार्थोद्भव खरा खरा निजदेशाचा अभिमान;
परंतु याला वृथैव देणें ऐक्य असें अभिधान.
कनकनाम हा पलाश, तैसा क्षुद्र झुण्ट * धत्तुर ,
कनकनाम कोविदार † तरुवर, कनकनाम कर्बूर, ‡
यास्तव यांचें ऐक्य ! एक हें वर्णत्रय,¶ हे पक्षी,
द्विजनामक हे दंत आमुचे यांतच आले लक्षी !
परहितसाधक शील जयांचें असे मंत वा दैत्य
एकच ! कारण, पुण्यजनाभिध दोघेहि प्रख्यात !
वितान एकच आकाशाचें चराचरावर पसरे,
ग्रहगोलांवर पसरे, यास्तव एकच एकच सारें !
हे ऐक्याचे प्रकार जगतीं असतिल मान्य कुणातें,
परंतु यांहुन भिन्न परममधु बंधुत्वाचें नातें.

★

## ६ : खरे पुढारी

( चाल : वीरा भ्रमरा )

खरे पुढारी कधीं जन्मती हिन्द म्हणे ईश्वरा !
सांग रे बापा करुणाकरा !

वीर्यवन्त नर उदार हृदयें, सत्त्वधीर जे खरे,
मनानें सिद्ध वाणिनें करें;

अधिकाराच्या मोहीं पडुनी मेले होऊं जनीं
अशी नच भीति जयांच्या मनीं;

अधिकारोद्भव वित्तराशिला विकले जाऊं स्वयें
कल्पना अशी जयांना न ये,

---

* झुडप. † बिसू. ‡ सोनें. ¶ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य.

अभिप्राय गंभीर जयांचे, निश्चय ज्यांचा पुरा,
मानधन ! सत्य जयांची गिरा;
जनवंचक* वदती मायाबहुलोक्तिला,†
नच भीति ठाउकी निषेधिनां त्यजला,
ज्यां नको मुगुट बहुरत्नीं शृंगारिला,
परी आवडे कंटकमुकुटें विडंबिलेलें शिरा,
पुढारी योग्य नांव त्या नरा !

उंच उंच रविमंडळ ज्याच्या विभूतिला भेटतें,
शिवेना धूळ जगाची जिथें;
मनांत किंवा जनांत किंवा वनांत जे सारखे,
जगाचे तेच पुढारी सखे !
बळें चढविलीं घोड्यावरतीं कळसूत्री बाहुलीं !
जोंवर पुढाकार पावलीं !
मुठींत धरुनी धर्म मूठभर पुढतीं सरसावलीं
स्वार्थे वृथैव भांबावलीं !
हीं उदार भारी समर्थ बोलावया !
परि कृता पाहतां मनांत उपजे दया !
हीं बुभुक्षितें जणुं भुतेंच नाचावया !
पुढें धावतीं जोंवर तोंवर आशेच्या अंकुरा
दिसेना तिळप्राय आसरा !

हे स्वातंत्र्या ! रडत बैस तूं जाउनि कोठें तरी !
अनीती ! खुशाल मौजा करीं !
वाट पाहुनी दमलिस आतां नीज नीतिसुंदरी !
अभाग्या ! राज्यसूत्र घे करीं !

---

* लोकांची फसवणूक करणारे. † कपटपूर्ण भाषणें. : माया + बहुल + उक्ति : माया = खोटी; बहुल = घन; उक्ति = भाषण

निर्लज्जत्वा ! नाच नाच रे हर्षानें तोंवरी—
पिशाचें घुमतीं हीं जोंवरी !
अविचाराची पेठ उघडली जाउनि सवदे करीं,
स्वार्था ! वीक तुझी खापरी !
घ्या करुनि मजा ! जों दया न ये ईश्वरा,
जों दिला न त्यानें पुरा पुढारी खरा;
परि देव विसरला नसे कधीं पामरा;
हिन्दभूमिची खरी प्रार्थना तया दयासागरा
आणिल भरतीच्या निर्भरा* !

★

## ७ : सेवा

( चाल : आज मीं ब्रह्म पाहिलें० )

खरोखर ती सेवा सेवा !
सर्व पूजनांहुनी मान्य जी ।
सर्व साधनांहुनी मान्य जी होय सदा देवा.
प्रेमनिधी ईश्वर, ही जगती, । सेवक यांचा, खरी त्रिमूर्ति !
हिच्यापुढें मी दास नाचतों वाजवुनी पांवा !
परहितसाधन अन्न गणीती, । परहितचिंतन ही विश्रांति,
जनसेवक ते, अन्य धरीती चोर, तया नांवा !
नको कीर्तिची नको साउली, । ती दम्भाची खरी माउली,
नको उपसणें भयद घनाच्या † गरलाच्या पेवा !
वाक्य 'न मातुः परदैवतमिति' । केवळ सेवेची ही उक्ति,
सेवक ईश्वर म्हणुनी करिती जन त्याचा धावा !
मी सेवक, मम पत्नी सेवा, । प्रेम लाडका अमुचा छावा !
पुरें ! याच संसारीं माझा आत्मा रत व्हावा.

---

* पूर्णतेला. ( या कवितेला एका इंग्रजी कवितेचा आधार आहे. – संपादक )
† द्रव्यरूपी विषाचा सांठा.

## ८ : लोकमित्र

( चाल : आज मीं ब्रह्म पाहिलें )

खरोखर लोकमित्र ते
सेवक आपण सकल जनाचे, ।
स्वप्नीं ठाउक अन्य न अपुलें ज्यांस जगीं नातें.
उदार हृदयें गभीर वृत्ति, । जी जीवीं ती सत्यीं, प्रीति;
रविमंडलही भेदुन भूती * संतत शोभे ते † !
रुची न ज्यांची भिकार वित्तीं, । बुद्बुद केवळ ज्यांना कीर्ति,
कार्य न ज्यांच्या क्षणही चित्तीं लोकहितापरतें.
लोकहितीं पितयाची चिंता, । संवर्धनिं मातेची ममता,
धरिती जनपरिचर्या करितां सृष्टीसम समते.
जनसेवा ही ईश्वरसेवा, । याविण दुसरा हेतु न ठावा,
प्रेम आणखी देव दिसावा एक सदा ज्यांतें
धन्य ! धन्य ! या धन्य विभूति ! । प्राप्ति यांची स्वर्गप्राप्ति !
देवा ! यांची भारतजगती ‡ वाट सदा बघते !

★

## ९ : सहकारित्व

( चाल : आनंदी आनंद गडे• )

सहकारी हो सहकारी ! । विश्व सकल हें सहकारी !
सांभाया, मापायाला । शक्त न केव्हां कुणि ज्याला,
चला, विचारा त्या काला, । ऐका त्याच्या वचनाला,
' मम अंगातें । मंडित करितें, । सांभाळीतें, ।
त्या सहकारित्वीं सारी । माझि सदाची सिस्त खरी ! '
आप, तेज, धरणी, अनिल, । व्योम, महाभूतें सकल
सहकारी, यास्तव वसतें, । नातरि विश्वच हें नसतें !

---

* व्यक्तिमत्व किंवा थोरवी, ऐश्वर्य. † ती. ‡ भारतभूमि.

या ग्रहगोलां । सवाल केला, । तर अपणांला–
म्हणतिल हे 'अमुची सारी । सहकारित्वीं भिस्त खरी !'

या खालीं या, वनीं चला, । विचारुनी घ्या या अचला,*
चला, पुसः या झऱ्यांप्रती, । घ्या एकून हे जें म्हणती;
पर्वत, पाणी, । वृक्षश्रेणी, । अवघे प्राणी
म्हणतिल हे 'अमुची सारी । सहकारित्वीं भिस्त खरी !'

ऐका काय म्हणे रान, । किंवा नरवसतिस्थान,
फार कशाला ? पिपीलिका† । काय म्हणे तें या ऐका !
जेथें तेथें, । जें तें करितें, । सदा ध्वनीतें, ।
कीं 'आहे अमुचा सारी । सहकारित्वीं भिस्त खरी !'

दूर कशाला ? या देहीं । सहकारित्वाविण कांही
न दिसे; अन्तःसृष्टी ही । सहकारित्वाविण नाही !
लोकीं म्हणती । जिला संसृति‡ । ती तर नुसती ।
सहकारित्वाच्या लहरी ! । सहकारित्वीं भुक्ति¶ खरी !

सहकारित्वें परमेश । आश्रय, भक्तांची आस !
सहकारित्वें भजन घडे, । चरणीं त्याच्या चित्त जडे;
इहपरलोकीं । एकसारखी । महती निरखीं
सहकारित्वा । परोपरी । बघ त्याला विश्वाभितरीं.

सहकारित्वा ! जे त्यजिती । पुरी पुरी त्यांची फजिती !
विश्व हसे त्या भ्रान्तांना । सदा यातना त्यां नाना !
देव सांगतो, । निसर्ग म्हणतो, । मीही गातों,
'अन्योन्यांचे सहकारी । व्हा व्हा आधीं संसारीं !'

---

* पर्वताला † मुंगी ‡ संसार ¶ उपभोग

## १० : रणशिंग

(चाल : पड़दा उघाडिलें हृदयाला०)

गिरिवर माझ्या मी चढतों । शिंग एकदा फुंकीतों !

घा, जा ! पड तिकडे सनई ! । काम तुझें येथें नाहीं.
सकल गुणांहीं सदा नव । हें माझें रणशिंग हवें !
स्तब्ध बैसले, । थकले, निजले, । भुलले, मेले,
अवघे उठातिल तें करितों । शिंग एकदा फुंकीतों !

'नवयुग ! नवयुग ! नवयुग हो !' । शिंग फोडितें हा टाहो !
या रणवाद्या शरण रिघा । जा नाहीं तर मरा निघा !
पूर धावला, । कोण तयाला । अडवायाला
समर्थ बंधु पुढती येतो ! । तरेल जो पोहेलाचि तो.

हात धरीला कालानें । धावा त्यासह हौसेनें;
नेइल वा फरफरीत हा । करील जीवाची अपहा.*
व्यर्थ बोंगडें† । करिल लंगडें । बरवें न मढें
खांद्यावर ! सावध करितों । शिंग एकदा फुंकीतों !

'मेले मेल्यां मुठमाती । देतिल' ही वाणी घुमती
नव्या युगाची विश्रांत, । तीच माझिया शिंगांत;
चला पुढें व्हा ! । जगास दावा । करुनी नांवा !
हिंदपुत्रहो ! मी म्हणतों । शिंग एकदा फुंकीतों !

अंधारांतुन उजेड ये । तत्त्व नवें हें सदा नवें !
अशुभ निराशेच्या उदरीं । देवी आशा जन्म वरी,

---

* छावि, त्रेधा. † लोढणें.

हिचे भक्त ते । विजयी पुरते ! । तयांस नुसतें
क्रीडांगण हा भव दिसतो । शिंग एकदा फुंकीतों !

परिस्थितीहुन मी माझ्या । मोठा; मजपुढती गमज्या—
काय चालतिल काळाच्या । दैवाच्या ! दुःस्वप्नाच्या !
नवयुग आलें, । माझें, झालें । मन्मन धालें !
म्हणून जयगीता गातों । शिंग एकदा फुंकीतों !

नवयुग अर्पी नवेंपण । घे घे तें अपुलें करुन
कितीक आले मग निपुण । तरी जिंकशील तूंच पण !
हें न दुज्याचें, । असेल लघुचें— । परंतु कविचें
भाकित, तुजला बजावितों ! । शिंग एकदा फुंकीतों !

## ११ : ब्राह्मण किंवा महार

( चाल : आनंदी आनंद गडे• )

मी ब्राह्मण वा महार मी, । गणीं न कवणालाच कमी.

या सृष्टींतिल दिव्यपण; । तेंच तेंच हें मनुजपण;
मांगल्याची ही ठेव, । हीस्तव देइन मी जीव;
हिच्याहि* मोला । गणी न त्याला, । महाखलाला
नीच, नीचतर गणीन मी । मन्मभूमिसेवाधर्मी.†

हिंदभूमि माझी जननी, । आले हीच्या कुशींतुनी—
हिरेच अवघे माझे ते । मन्मन त्यां मोहुन जातें;
मलांत पडले,‡ । खनींत दडले,¶ । मुकुटीं जडले,§
अवघे उचलुन घेइन मी । जन्मभूमिसेवाधर्मी.

---

* ह्या ठेवीच्या. † जन्मभूमीची सेवा हा आहे धर्म ज्याचा. ‡ अस्पृश्य
¶ परिस्थिती अनुकूल नसलेले § पुढें आलेले

विपन्नता ज्यांच्यापाठीं । जीव कळवळे त्यांसाठीं;
अज्ञपणा ग्रासी ज्यांतें । प्रियतर दुर्बल मज ते ते !
त्यजुनी सकलां, । रुग्ण दुर्बला । उचली बाला
जननी; तीसम वेडा मी । जन्मभूमिसेवाधर्मी.

मानामानाचें गोंवें* । कसें असे कवणा ठावें !
खाइन अवघ्यांच्या लाथा, । देइन सेवेला माथा;
निजभूचें ऋण, । अवघें फेडिन, । मरून जाइन !
रक्षिन गुरुपद माझें मी । जन्मभूमिसेवाधर्मी.

होइन नीचाहुन नीच । करीन अवघ्यांना उंच;
ते ब्राह्मण मग महार मी । कोण गणी मग मला कमी
कमी गणीना ! । कांहि म्हणेना ! । कुणी, ! तयांना—
विचारतों मग कसला मी ! । जन्मभूमिसेवाधर्मी !

पांच कशाचे, हे जितुके । हिंदभूमिबालक तितुके
मम देहाचे प्राण खरे । कसेहि असले तरि सारे !
जें वाटे तें । सांगायातें । शब्द न पुरते,
धरितों मौना यास्तव मी । जन्मभूमिसेवाधर्मी.

---

* गुंता, कोडें.

★

## १२ : सखि स्वतंत्रते !

( चाल : लक्ष्मीसम चंचल या० )

सांग कुठें पाहुं तुला सखि स्वतंत्रते !
वनिं, विजनीं सांग कुठें रमसि सुव्रते ?

फिरिव मला दाहि दिशा । कर मम अन्नान्नदशा !
कर माझ्या वृत्ति पिशा ! । परि तूं हो माझि एकदा !
तुजविण जग शून्य सकल विकल* भासतें !

तूं धन मम, तूंच मान ! । तूं जीवन ! तूंच प्राण !
तव सूचित मज प्रमाण, । अजुन किती अंत पाहसी !
हो प्रसन्न मज प्रणता शीघ्र अभिमते † !

प्राणाहुन अधिक सत्य, । सम विचार, वचन, कृत्य,
प्रभुविण जग लघु अनित्य, । तेथें तूं नित्य नांदसी,
ने ने मज तुजसंगें राहण्या तिथें !

---

* कलाहीन. † प्रिये.

★

## १ : पुरें जाणतों मीच माझें बल!

[ मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी असून त्याचें सामर्थ्य अचाट आहे. आज व्यक्त असलेलें हें सामर्थ्य कितीहि थोडें दिसलें, तरी त्याची मर्यादा दिक्कालाला व्यापणारी आहे, हें या कवितेंत दाखविलें आहे. कविचे हे बोल व्यक्तिवाचक नसून स्वतःला आपल्या परिस्थितीचा स्वामी मानणाऱ्या आदर्श व्यक्ती संबंधीं आहेत. ]

हा एक कक्षेंत छावा गजाचा, दुजीमाजि हा सिंह केकावतो,
हा जाहला अर्धमेला भयानें लपोनी महाव्याघ्र डोकावतो;
हे पर्वतांचे उभे क्षुद्र धोंडे, महासागरांचे पुढें पल्वल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

भूगोल हा दोन बोटांत माझ्या, नको अन्तराला* तुझी थोरवी !
पाहीन एके दिनीं मीच सारे कुठें झांकलेले तुझे ते रवि !
हीं पंचभूतें मला सेविणारीं, खरें सांगतों मी न गर्वाकुल;
बोला हवें तें, मला काय त्याचें ! पुरें जाणतों मीच माझें बल !

मी भासतों कीट, ही भूति† माझी परी भेदि सूर्याचिया मंडळा,
तूं हास काला मला, मी तुलाही सदा हासतों गर्विता, चंचला;
हे आधिनों व्याधिनो ! मक्षिकांनो ! तुम्ही बापुडीं कायशीं दुर्बल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

हें विश्व सारें विहारास माझ्या पुरेसें न होईल शंका नको,
हा मर्त्य, हा देहकारानिवासी, बळें हीन हा, कांहीं कोणी बको !
मी मर्त्य, मी मृत्युला जिंकणारा ! जगीं धूळ, मी दिव्य ना उज्ज्वल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

---

* हे आकाशा | † व्यक्तित्व किंवा महति, ऐश्वर्य

मीं ओळखीलें मला पूर्ण; आतां कशाला मला पाहणें आरसे ?
माझ्यापुढें नित्य आत्मानुभूती; पटावे तुजे तर्क आतां कसे ?
मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खरी हेतुची पूर्तता मंगल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल !

★

## २ : अश्रूंची माला

(चाल : भूपती खरे ते०)

हीं प्रीतिलतेचीं फुलें अश्रुंची माळा,
कां रोधुन धरितां ? पुसुन टाकतां यांला ?

एकेक अश्रु हा लाजवितो मोत्यांला,
या ! घालूं यांची माळ प्रिया भगिनीला;

हा एक अञ्जली अनुपम पत्नीत्वाला,
हा दुसरा हीच्या अनुपम मातृत्वाला;

परदुःखें विव्हळ प्रमुही * अपुला रडला,
तो रडला म्हणजे वृक्ष दयेचा फुलला !

जल वर्षति ना त्यां कोण पुसे मेघांला ?
तें प्रेम कशाचें अश्रु न फुटती ज्याला ?

यापुढें कितीदा उघडूं स्मृतिसदनाला !
हिज याच वाहुं हो प्रीतिलतासुमनांला

स्वर्गात भेटतां याच पुन्हा कुसुमांला
उधळून भजूं हो जयशब्दें देवाला

---

* येशू.

## ३ : पळाचा भरंवसा

(चाल : धरीं रे ध्यानीं०)

भरोंसा नाही इहलोकीं एक पळाचा !
कमलदलस्थितमौक्तिकदर्शन,
मेघावलिचें सुंदर खेलन
अवसर होतां पाहुन घेइन
म्हणणें याचा वा अर्थ भंग आशेचा !
सहज खेळतां दगड फेकिला,
गातां गातां पक्षि उडाला,
म्हणशिल भेटूं पुनरपि त्याला,
परी तुज आतां नच कळणें ठाव तयाचा !
गेला गेला तीर सुटोनी ,
गेली गेली वाणी निघुनी,
परतुन घेऊं म्हणशिल दोन्ही
वेडप्या जीवा, तरि राजा तूं मूर्खांचा !
कठोर वदलों कालच वाचा,
आजच गेला मित्र जिवाचा;
मम हृदयीं हा कंटक साचा
कसा काढावा, नच साधा, प्रखर विषाचा !

★

## ४ : चाललेली घटका

(चाल : धरीं रे ध्यानीं० )

चालली घटिका, कर विचार हीचा आधीं.
जीवन म्हणजे घडि आतांची,
खाण तुझ्या ही अस्तित्वाची,

सुखदुःखाची, अनुभूतींची,
संधि ही साधीं, कर विचार हीचा आधीं.

ऋद्धी, वृद्धी, विक्रम, कीर्ति,
सुख, संपत्ती, भुक्ती, मुक्ती,
हीच घडी निजहृदयीं धरिती !
हीच तुज बोधी—'कर विचार माझा आधीं.'

गेली घडि; हें स्वप्नच झालें,
पुढची, मृगजळ पुढतीं ठेलें !
खरें तुझ्या जें हातीं आलें
पदरिं हें बांधीं, कर विचार याचा आधीं.

सत्कार्यी जरि गेली घडि ही,
स्वप्न मागचें तरि सुखदायी,
आशामय मग पुढचें होई;
सोड रे धुंदी, कर विचार याचा आधीं.

★

## ५ : वृक्षान्योक्ती

फुलें आलीं नामी, मधुतर रसें पूर्ण भरलीं,
सुवासें सौंदर्यें अनुपम जगामाजि ठरलीं.
अली † आले, झाले मुदित रसपानें तरुवरा,
नरां संतर्पीलें परहितपरां ‡ तूं प्रभु खरा !

फळें आलीं, आली विविधविहगाली ¶ तुजकडे,
क्षुधा त्यांची गेली, वदति तुज आशीर्वच गडे.
कुणी काठी हाणी, कुणि दगड टाकी तुजवरी,
तरी सर्वां देशी स्वधन; मति मोटी तव खरी.

---

* भरभराट. † भुंगे. ‡ परोपकारी. ¶ विविध पक्ष्यांचा थवा.

फळें गेलीं आतां सहुनि सगळा आतप शिरीं,
विसावा श्रांताला निरन्विशि * जरी निष्फल तरी,
फळें पर्णें पुष्पें सकल तव तें वैभव सरे,
तरी तूझें, वृक्षा, परहित सरे ना परि उरे !

निजांगाचीं खांडें भयकर कुठारें करविशी,
परासाठीं साधो ज्वलदनलकुंडांत पडशी !
अहा, वृक्षा, लक्षावधिजनसमूहीं न दुसरा
तुझ्याऐसा साधू, मजसम गुरू तूं लघु नरा †

★

## ६ : मेलेले कोण ?

( चाल : नोहे नारी ही • )

चोरा चोरीचें पाप कळेना, । न गणी अपमाना,
झाली देहाची पुरती दैना, । तरि तें उमजेना,
तो मेलेला, तो मेलेला, तो मेलेला, दुर्जन जाणा । जग कांहि म्हणेना !
व्याघ्रश्वानांची वृत्ती माझी । यांतच मी राजी !
रमलों पापाच्या जाणुन ‡ काजीं । । हीच खरी आजी ¶ !
वेडे शिकवीती अन्य ज्ञाना, । मीच खरा दाणा § !
तो मेलेला, तो मेलेला, तो मेलेला दुर्जन जाणा ! । जग कांहि म्हणेना !
विषयां विकिलेलें जीवित भुक्ति, । मरणें ही मुक्ति !
केवळ केवळ ही पशुची वृत्ति ! परि ही मानवती,
स्वर्गप्राप्तीहुन ज्यांना ज्यांना, । पाप्यां अधमांना,
ते मेलेले ते मेलेले, ते मेलेले, दुर्जन जाणा ! । जग कांहि म्हणेना !

---

* देसी. † मजसम लघु नरा तूं गुरू. ‡ समजून उमजून. ¶ युद्ध, (येथें पराक्रम.) § शहाणा, चतुर.

## ७ : हें सुख का नाश?

( चाल : वसंतीं बघुन मेनकेला० )

रचिलें सुमनांचें शयन, । नकळे जाउन तयांत वसले वृश्चिकशत लपुन
पुढतीं मधु* षड्रस† अन्न, । नकळे गेले तयांत दारुण विषकण मिसळून !
शिरावर मुकुट मुकुटरत्न, । नकळे इकडे कंठावरतीं खड्ग महातीक्ष्ण !
पूजी सकल जगत चरण, । नकळे इकडे सदा कुणाच्या लत्तांचें ग्रहण !
गळ्याला फास पुरा असुन, । अमरपणाचें स्वप्न पाहुनी रमळे मूढजन !

★

## ८ : स्त्रीपुरुष

( चाल : चन्द्रकान्त राजची कन्या० )

अंगें जीचीं दोन, कार्य परि एक जिचें जगतीं,
स्त्रीपुरुषात्मक एकच अवघी ही मानवजाति.
अर्थ आणखी शब्द निराळे दिसण्याला दिसती
रूपावरुनी दिनरजनीचा भेद जनीं करिती.
भिन्न भिन्न वायूंचें जल हें ज्ञानी जन म्हणती,
खरें. परंतू जल ही वस्तू एक जगापुढती !
हेंच खरें स्त्रीपुरुषांविषयीं, म्हणेल जें खोटें,
राष्ट्र पतित तें, थोर तयाचे होतिल हो तोटे !
सुख एकाला, दुःख दुजाला केवळ ही भ्रांति !
नरनारी जगिं बरोबरी हीं चढतीं, कोसळतीं !

---

* मधुर. † मधुर, अम्ल, लवण, कटु, कषाय, तिक्त.

## ९ : मंगलाष्टक

ज्यानें सिंधुसरित् रविद्युति, शशिज्योत्स्ना अशा युग्मकां
निर्मोनी, पुरुषासमान जगतीं उंचाविल्या नायका;
आत्मा आणि कुडी मिळून अवघा संसार संपादिला,
साधो प्रेम अगाध नित्य तुमच्या तें निर्मेला मंगला*

ज्यानें माधव, इंदु, चंदन, उषा, सायंतना निर्मिलें,
ज्यानें गायन कोकिळां पढविलें, नृत्यीं शिखी† मंत्रिले;
ज्यानें भृंगसरोजनी तरुलता, पर्णें फुलें निर्मिलीं,
तें माधुर्य करो चरित्र तुमचें संपन्न सन्मंगलीं !

नक्षत्रें गगना, फुलें उपवना, रम्यें मुलें केतना,
दे वातावरणा सुरम्य शकुना‡ रत्नां नदीच्या इना;¶
देई सत्त्वगुणा सुधीस कविंना देई नव्या कल्पना,
साधो ती तुमच्या सदा रसिकता सन्मंगलांच्या गणा !

ज्यानें रंगविलें नभा, सजविलें तारागणांहीं तया,
नानाच्छाय वनस्पतींत भरिलें वर्णांप्रती लीलया !
पुष्पीं मार्दवरम्य हास्य निरवी, पक्ष्यांत रम्याकृति,
तें सौंदर्य तुम्हां सदैव पुरवो सन्मंगलांची तति § !

व्योमीं रंग कसे तरी, तरुवरीं कैशा तरी वल्लरी,
ज्ञाती निर्झर हे कसे तरि, वनें विस्तीर्ण कैशीं तरी;
साधें विश्व दिसे परंतु रचि जें साधेपणीं चारुता,
तें साधेपण मंगलप्रद तुम्हां होवो पुढें वा अतां !

---

* सद्भाग्यास. † मयूर. ‡ पक्ष्यां ( शकुन–पक्षी ) ¶ समुद्रा ( इन = पति, स्वामी ). § परंपरा.

सूर्यां शांतपणें हळूच उदयीं आणोनियां सोडिती,
गाणें गात निरध्वनी* रजनिला भेटूं जगा धाडिती !
व्योमीं स्तब्धपणें ग्रहां फिरविती, विश्वास संभाळिती,
ती शान्ती तुमच्या सदैव विलसो सन्मंगला साधिती !

हा येथें गज तृप्त होउन डुले, घाली पिपीली इथें,
हा येथें द्विज गोड खाउन फळें स्वच्छंद गानीं रते;
क्षेत्रीं क्षेत्रिं करी चरांस्तव† मुदा जें अन्नपूर्णा‡ उभी,
ते वात्सल्य तुम्हांस मंगलद हो सानंद लोकीं उभीं ¶!

'हो' ऐसें म्हणतांच विश्व अवघें झालें उभें राहिलें !
'हा घे नेम§ तुला' असें परिसतां नेमास त्या वाहिलें ||!
विश्वें हीं शतकोटि एक बदराऐशीं अनंता जया,
ते सामर्थ्य सदैव मंगल करो, देवो तुम्हांला जया !

★

## १० : मुरली

( चाल : उद्यां वध जातें० )

मुरलि ग मुरली ! मति माझी तव रविं मुरली !
माझि अहंमति× अवघी विरली,
मीतूंपण ही भ्रांती नुरली,
प्रीति अनन्या विश्वीं भरली,
भरोनी उरली ! मति माझी तव रविं मुरली !
माधुर्याविण न दिसे कांहीं,
सर्गस्थिति + ही त्याविण नाहीं !
माधुर्यें आकळिलीं पाहीं
जगें हीं सगळीं ! मति माझी तव रविं मुरली !

---

* वाट चुकलेल्या. † प्राण्यांसाठीं. ‡ धान्यसमृद्धि. ¶ उभयीं. § नियम
|| वाहून घेतलें × अहंभाव, 'मी'पणाचा ताठा. + उत्पत्ति आणि स्थिति.

माधुर्यांच्या सुरम्य लाटा
प्रवाह* काढी असंख्य वाटा †
परि याचा तव हृदयीं सांठा
धन्य तूं मुरली ! मति माझी तव रवें मुरली

★

## ११ : सदा तरुण

दिसे न नयनां अतां, बधिरता वरीती श्रुति, ‡
अशेषरदनावली हरवली, वली ¶ व्यापिती—
मुखास, बसतों मुका, जिभ चळे, वळेना पुरी,
अहो तरुण मी ! अहो तरुण मी सदाचा तरी !

जरा वश कलेवरा करिल जन्मतः भंगुरा, §
परी तिज न ती धृती मजपुढें ठराया जरा;
विनाशवश तें मुके नियम नाशहीना जरी
अहो तरुण मी ! अहो तरुण मी सदाचा तरी !

न काल अथवा उद्यां सतत आज झालें मम,
मला वश करील हो मग कसा वयाचा क्रम ?
म्हणाल चळला म्हणा, परि मला प्रतीती खरी,
अहो तरुण मी ! अहो तरुण मी सदाचा तरी !

---

* वारा (वाद-वारा). † वाटांनीं, प्रकारांनीं. ‡ कान. ¶ सुरकुत्या. § विनाशी.

## १२ : वैचित्र्याचें समापन

[ कवीच्या 'वनवासी फूल', 'बापाचे अश्रु', 'सुशीला' इत्यादि कित्येक काव्यांत वृत्तवैचित्र्य नाहीं, हा त्या काव्यांतला दोष होय, असें म्हणणारांना कवीनें हें उत्तर दिलें आहे.—संपादक. ]

पिका ! तुझा स्वर एक सर्वदा तरि तो अभिनव वाटे,
एकसारख्या कुहूकुहूनें प्रेम अन्तरीं दाटे !
भ्रमरा ! गुंजागान तुझेंही तेंच तेंच नित्याचें,
नित्याचें तें म्हणुन ऐकतां मन्मति हर्षे नाचे !

सांग निर्झरा ! गभीर मंजुल तव रव कधिं बदलेल ?
क्षणें तया जरि कविराया तव मानस कंटाळेल !
प्रणयि कपोता ! हूं हूं हूं हूं हूं हूं म्हणजे काय ?
सदैव हूं हूं ! सांग कधीं हा सरेल दीर्घाध्याय !

आराधन* मी जिचें करीतों जा तिजलाच विचार,
हूं हूं मध्यें तिला सापडे मम हृदयींचें सार !
तुक्या ! कां तुझें अभंगगायन एकच संतत चाले ?
प्रबंध दुसरे काय हरवले ? असाध्य तुजला झाले ?

सख्या श्रीधरा ! तुवां गायिली जेव्हां तेव्हां ओवी,
नकळे आम्हां कां तुज इतुकी तीच जगांत पटावी !
नवरसभाजन तव रामायण एकच आर्या उचली,
काय मयूरा ! तुला न दुसरीं वृत्तें सुचलीं रुचलीं ?
क्षणामधें हें, क्षणामधें तें वृत्त, गोड हा काळ,
परी तयास्तव व्हावें नकळे कैसें प्रौढें बाळ !
वैचित्र्याचें खरें समापन म्हणजे एकीं प्रीति,
एकीं प्रीती हीच खरोखर वैचित्र्याची भुक्ति !

---

* पूर्णता.

## १३ : काळाशीं संवाद

कवि—सांगा हो अभिधान काय अपुलें, कीं वास कोठें असे,
काळ—लोकीं काळ म्हणून ज्यास म्हणती तो मीच ! विश्वीं वसें.
कवि—वृत्ती काय ?
काळ—जगास नित्य अपुल्या हातामधे ठेवणें,
कोणा उच्च कुणास नीच करणें, कीं तारणें मारणें !
कवि—पादांगुष्ठधुरीण* कां गति सदा ?
काळ—मीं धावतों सर्वदा,
वारा, वीज जगांत मत्सम नसे कोणी जवानें† कदा !
कवि—हस्तीं शस्त्र कशास ?
काळ—आड मजला होईल त्या छेदितों !
कवि—कां तालूवरती शिखा ?
काळ—मज धरी तो कोण हें पाहतों !
कवि—शीर्षाचा तव पार्श्वभाग दिसतो कां नग्न केशांविणें ?
काळ—केव्हांही मज मागुनी नच धरो कोणीच या कारणें.
कवि—विश्वीं तूंच अजिंक्य काय ?
काळ—मजही आहे धनी एकला,
विश्वेशें मज मापिला, नियमिला, हातांमधे ठेविला !

★

## १४ : बोंबाबोंब

[ बोंबाबोंब हा शद्ब ग्रामीण म्हणून या वीररसप्रधान आशाजनक कवितेची विशेषत: एका दैनिक पत्राच्या संपादकानें वारंवार निर्भर्त्सना केली आहे. बोंबाबोंब शद्ब ग्रामीण असेल, तर त्याच्याइतका जोरदार शद्ब त्याच्या ठिकाणीं कोणींहि घालावा. कवीची त्याला परवानगी आहे.—संपादक ]

खालीं वरतीं जावें यावें । विश्वनियम ; हें सकलां ठावें ;
पतनावांचुन । नच उत्थापन ; । कां मग बोंबाबोंब ?

---

* पायाच्या आंगठ्याला जुंपलेली, चपळ. † जव – वेग

किती युगांची नीज असेना— । उघडीलें ना अंतीं नयना ?
मरणावांचुन । नच संजीवन; । कां मग बोंबाबोंब ?
विषवृक्षांचे मळे लाविले, । निजरुधिरानें जरी शिंपिले,
तरी संप्रती । कुऱ्हाड हातीं ! । कां मग बोंबाबोंब ?
चिखल फांसिला कलश घांसिला, । अधिकाधिक तो उज्ज्वल झाला,
मानहती ती । मानप्राप्ति । कां मग बोंबाबोंब ?
अमोघफलदा या अनुभूति, । मूल्यावांचुन लभ्य न जगतीं,
केला विनिमय । अवघा हितमय; । कां मग बोंबाबोंब ?
भिन्न दिशांहीं सरिता, नाले, । किती जरी हे वाहत गेले,
एक नदीपति । सकलां पुढतीं; । कां मग बोंबाबोंब ?
अंधाराचा सर्व पसारा । खरा, परंतू त्यांतच तारा—
या इवलाल्या । खुलूं लागल्या; । कां मग बोंबाबोंब ?
किती वादळें आलीं गेलीं, । तरी नाव जी नाही फुटली,
दूर जरी तट, । तीरि ही बळकट । कां मग बोंबाबोंब?
गेलों मेलों ठार बुडालों ! । क्यौं यह बकवा ? 'जय जय' बोलो
नैराश्योद्भव । आशावैभव; । कां मग बोंबाबोंब ?
होतें जें जें, आहे जें जें, । तें तें स्मृतिगत मात्र विराजे;
काळ सनातन, । तसेच आपण; । कां मग बोंबाबोंब ?

## १५ : प्रियकर हिंदिस्तान

प्रियकर हिंदिस्तान ! । अमुचा प्रियकर हिंदिस्तान !
हा अलंकार हो भूगोलाचा । यास नसे उपमान !

सर्व सुखाची खाण, । अमुच्या सर्व सुखाची खाण !
हें अभिमानाचें, सौभाग्याचें अमुच्या रम्य निधान !

हे जन्मभूमि ! हें तनमनधन घे तुला !
तव उपकारांना न मिळे कोठें तुला !
हें फिटणें साध्य न आम्हां अतिदुर्बलां !

सुखकर तव गे ध्यान ! । निरंतर सुखकर तव गे ध्यान !
जो जननीचा, जो जनकाचा गे तोच तुझाही मान !

# परिशिष्ट

## प्रियेचें पुनर्दर्शन

प्रेमाविषाचा प्याला ग प्याला !
नवल तरी हा अजुन न मेला !
सखये ग जिवलगे

म्हणुनी भेटुनी पुनरपि याला !
घोट पाजिशी का शेवटला ?
सखये ग जिवलगे

साधो हा तरि तव कार्याला !
आत्मा सोडो मम देहाला
सखये ग जिवलगे

आत्मा माझा कोठें जाइल ?
समाधिस्त त्वप्रेमीं होइल !
सखये ग जिवलगे

मूर्ती माझी तुझ्यापुढें ती
होइल हृदयीं तुझ्याच वसती
सखये ग जिवलगे

मरो जगो मी तुझ्या संगमा
न मुके तुझिया अमोल प्रेमा
सखये ग जिवलगे

आग लागली या चंद्राला
वारा त्याच्या सुटल्या ज्वाळा
सखये ग जिवलगे

सृष्टी झाली भयाण सारी
लोक नेति हें हसण्यावारी
सखये ग जिवलगे

भलत्या वेळीं हसतों रडतों
वेड लागलें जन मज म्हणतो
सखये ग जिवलगे

सुखदुःखाची शुभाशुभांची
जगणेंमरणें स्मृती ययांची
तुझ्याच पायांवरी वाहिली
तव ठायीं मति रंगुन गेली
सखये ग जिवलगे

जनीं वनीं इहपरत्र किंवा
नाचें गाउन तुझ्याच नांवा
सखये ग जिवलगे

— १८९६

# टिमकीवाला

टिमकीवाला । हा कली पहा पहा अवतरला । ध्रु० ।

प्रसिद्ध बहु निष्कपटद्रोही । जिकडे, तिकडे रंध्रें पाही ।
बहु धान्योध्वंसी मति वाही । नररूपाला
हा मूषक धरिता झाला । १ ।

परनिंदेची काठी हातीं । पाठीवर घाणीचीं पोतीं ।
दुर्गंधानें येइल वांति । कां नच मेला ।
हा त्रास असा गांवाला । २ ।

कुंभाराचा गाढव मेला ! गोमाजीचा विकला हेला ।
सोम्या घेड पळोनी गेला । जाळ वार्तेला ।
कीं जाळ अशा तोंडाला । ३ ।

कावकाव काकांची पुरवे । श्वानांची कोलाहल सहवे ।
भेकाचें रटरटणें बरवें । पापमूर्तीला ।
ह्या त्रासुन लोक पळाला । ४ ।

नीचपणा फुटला भेला । मत्सर नांवारूपा आला ।
दुष्टपणा शिखराला गेला । कसा काळाला ।
हा पशू नकोसा झाला ? । ५ ।

१८९५–१८९६

# केशवसुत

[ केशवसुतांसंबंधीं टिळकांना केवढा प्रेमादर होता हें त्यांच्या खालीं दिलेल्या तीन कवितांवरून दिसून येईल. ]

To K. K. Damle

शहाणा वेडा, अल्प थोर दोन्ही ।
कवी हा खराच जन्मे.नी ध्रु०

झऱ्याच्या ताला रात्रंदिन धरुनी
कोकिल गातो मधुर वनीं
फुलांसह हासे, डोले कीं भुलुनी
द्रववी गिरिला मधुवचनीं १

सावलीमागें, धावे ये म्हणुनी
दावितो हस्तीं उचलोनी
नवोन्नतदुर्गीं, कवितेसह बसुनी
चतुर्दश दृष्टि नेइ भुवनीं २

रंग व्योमाचे हृदय उघडोनी
दावितो अपुल्या नित्य जनीं
प्रीतिशांतीच्या मूर्ति रम्य रचुनी
नाचवी गाणीं नव म्हणुनी ३

युवायुवती वा बालतनू धरुनी
नांदतो कामरूप सुजनीं
झिंगला पेला, सृष्टिदत्त पिउनी
सोडिना रात्रंदिन वदनीं ४

डायरी-१७-७-१८९६

## झपूर्झा गडे झपूर्झा

रडणें हसणें भेसळलें
दुःख विझालें। सौख्य बुजालें
आग लागली दर्याला । वाऱ्याच्या सुटल्या ज्वाला
प्रकाश पडला । ध्वांत माजला
आम्ही सुटलों आम्हाला । कृष्ण गातसे गाण्याला
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

गात गात तो मावळला । गात गात उदया आला
हा येथें ! बघ तेथें ! । आहे नाहीं दोन्ही ते
केशवसुत कवि गानाते । आम्ही गातों सांगाते
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

अक्षयतेच्या पैलतिरीं । बसून आतां ताल धरी
या तर मग या । कविता गाया
कृष्णानें जी शिकवीली । दावूं गाउन ती सगळी
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

सगळी कोठुन ती व्हाया । राहुन येथें संपाया !
कवीश म्हणुनी । गेला उडुनी
बसला गुंगत कुठें तरी । माझ्या हृदयीं गान जरी
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

आम्ही येथें तो तेथें । आलिंगुन अन्योन्यातें,
गायन वादन । भाषण नर्तन
सदैव आतां करूं चला । केशवसुत शिकवुन गेला
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

मनोरंजन १९०६ फे.

# कविरत्न परलोकवासी कृष्णाजी केशव दामले

कृष्णा तृष्णा पुनरपि करी जीव हा घाबरा रे !
ह्या लोकींचे अमृतनिधी हे आटले आज सारे
लाही झाली ! तळमळ करीं दूर ये ऐक अर्जी
सोडीं पाहूं पुनरपि गड्या ! गोड तूझा "झर्पूझा" १

झालीं आतां हळु हळु तया पूर्ण तेवीस वर्षें,
जेव्हां तूं मीं बसुन कविता गायिल्या रम्य हर्षें.
भासे आतां परि जणुं सख्या ! काल ती मौज केली !
जेणें झाली फिरुनि मति ही आज भारी भुकेली. २

ये ये कृष्णा ! चढव अपुला सूर जो मौतिकाला,
विंधी जाई वरतिं वरतीं भेदुनी अंतराला.
टाकीं मार्गें मज बघुं सख्या गाउं ये एकवार,
नाही माझी तुजविण कुणी हौस ही फेडणार. ३

जें जें कांहीं दिसत मजला भूतलीं व्योममार्गीं,
तें तें सारें दिसत मजला आज मित्रा अभागी;
भाषा ह्याची विशद करुनी कोण आतां कथील.
आतां ह्याला तुजविण कवी कोणता गौरवील. ४

कृष्णा भिक्षा इतुकि तरि तूं घाल आम्हांस आतां,
ह्या हृत्कोशीं बसुन अपुलें गान हो नित्य गाता.
आली आतां कळुन पुरती ती तुझी वृत्ति सारी,
मारूं देतो कवण तुजला येथुनीया भरारी ! ५

काव्यरत्नावलि : १९०६

## माझें मला द्या *

तार्‍यांची माला । नको मज द्या त्या सुमनाला – ध्रु०

रत्नपारखी हसोत नलगे हिरा लाल मोतीं । मला हो ।
कल्पलतेचें फूल नको जरि आलें तें हातीं । मला हो ।
चंपक जाई जुई मोगरा केवळ हो माती । मला हो ।
तया फुलास्तव देइन जीवाला १

श्यामल माझें फूल किती तरि साधें गमतीचें । खरोखर ।
निधान माझ्या सर्व सुखाचें जगतीं प्रीतीचें । खरोखर ।
भ्रमराचेंही भ्रमण थांबवी गाऊं गुण त्याचे । किती मी ।
कां मज वधितां ? द्या माझें मजला ! २

सख्या फुला मीं गाणीं गाइन सदैव रे तुजला । मधुरशीं ।
जीव असे तों अश्रु वाहुनी करिन पूजनाला । तुझ्या मी ।
विरहीं तुझिया जळुन मरावें हेंच पुरें याला । यापुढें ।
हाच सुखाचा परमवधि झाला ३

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

*एका एकनिष्ट पतीस, आपल्या विरहांतरित पत्नीचा त्याग करून, दुसरा संबंध करण्याविषयीं एका गृहस्थानें सूचना केली. या सूचनेला हें त्या विरहव्याकुल, दीन, व प्रेमल पतीचें उत्तर आहे.

## खोटा रुपया

फटका

खोटा रुपया ! खोटा रुपया ! ह्याहुन बरव्या दोन पया
ह्याहुन बरव्या दोन पया । बा
ह्याहुन बरव्या दोन पया ध्रु०

जरि मुद्रेनें खरेंपणा ये पोषाखानें श्रीमंती
रंग दिल्यानें सोनेंपण ये जलसेकानें शुद्ध मती
दूध रुईचें तरी खरोखर सारिल मागें धेनुपया.
क्षणामधें ही पृथ्वी सगळी होऊन जाइल साधुमया. १

शेंदुर घालुन जरि धोंड्याचा धोंडदेव मनुजें केला
जरि आईपण दिधलें क्षणभर बाहुलिनें लघु कुमारिला
करुनी रुपये खपरिचे जरि मुलें लागलीं खेळाया ।
अज्ञपणा हा खेळ असा हा नेइल का सत्यास लया? २

सुंदर ह्यावर दिसे मुखवटा तरि खोटा हा ! तरि खोटा
सर्व अक्षरें स्पष्ट उमटलीं तरि खोटा हा ! तरि खोटा !
ही चोराची कुणा तरी हो कथलावरतीं होय दया
उगाच फसतिल गरिब बापडे मोडा तोडा शीघ्र तया. ३

१९०२

★

## प्रार्थना

असा सदा संयोग असावा चंद्रचंद्रिका यांत जसा
प्रभो, आपला; मग मी याचिन दुसरें कांहीं नच सहसा. ध्रु०

पत्नीसम मीं सदा धरावें प्रेमाच्या पाशांत तुला,
कन्येसम सत्कार करावा, बहिणीसम तुझिया स्तुतिला;
अर्थ-शब्द एकत्र राहुनी शब्द सेवि अर्थास जसा,
स्वामी तूं मम, मी सेवक तव, सदा असो संबंध असा. १

माझा आत्मा जसा आरसा पाहो जन त्यामाजिं तुला,
रहा विचारीं, मम उच्चारीं, आचारीं तूं रम, विमला;
ख्रिस्ता ! ख्रिस्ता ! प्राण कुडीचा हो माझा तूं नित्य तसा,
विरह आपला क्षणार्ध होतां होवो माझा जीव पिसा २

१९०९

## गायत्री

ज्याच्या इच्छानुरोधें सकल जगत हें जन्मलें कालदेशीं
त्याच्या तेजास चिंतूं, नरमति विलसे बद्ध झाली जयाशीं
ज्या तेजें पूर्वकालीं ऋषिवर बघती पंचतत्त्वांत काया,
ज्या तेजें ब्रह्मवादी मुनिवर वदती सर्व माया 'अमाया'– १

ज्या तेजें होय अग्नि रस,* हितकर हो, पूज्य झोरोस्ताला
ज्या तेजें न्यायबुद्धि प्रमुख दिसतसे विश्वि कन्फ्युशयाला
ज्या तेजें बुद्ध वाहे धरणिवर जसा मूर्त कारुण्यसिंधु
ज्या तेजें शंकराला जलनिधि अथवा एक हो अंबुबिंदु – २

ज्या तेजा इश्वराचे महमद बघतां विश्वराजीव झाला
ज्या तेजें ख्रिस्त पाहे जगदधिपतिचें प्रेमवात्सल्य यांला
ज्या तेजें सत्यि डोळे निशिदिनिं अमुचे लागले, लागतील
प्रेरो तें तेज बुद्धि सततहि अमुच्या सारुनी दूर भूल – ३

* रसचंद्र

"सुविचार समागम" : जून १८९९

परिशिष्ट पान नऊ

## मृत्यूची कल्पना

कल्पना कर कीं। दिन अपुला हा शेवटला! ध्रु०

आजच मम वा तव गे इथला।
प्रवास सरला, रवि मावळला।
पुनरपि दिसणें नाहि उदेला,।
पुढें जगिं नाही। मधुवसंत एकहि आपुला १

समज आपणां आलें कळुनी।
कीं एकाला जाणें इथुनी,।
कवणाला हें न कळे अजुनी,।
कशीं मग वागूं। सखि, सांग बघूं हें मजला; २

"कलहा, रोषा, हे परुषोक्ता,* ।
करा मुखें जा काळीं आतां!।
दिव्यत्वाची येथें सत्ता!"।
म्हणूं ना ऐसें। जें होउन गेलें त्याला ३

परलोकाचा प्रवास माझा।
सुखकर व्हावा अथवा तूझा।
म्हणून करणें सोयी ज्या ज्या,।
करूं ना त्या त्या। सखि पुसुनी अपुल्या प्रभुला। ४

प्रेमरसानें थबथबलेलें,।
चाटुशतांहीं† रंगुन गेलें,।
होइलना मग पळ उरलेलें?।
बघूं ना सारा। त्या पळीं स्वर्ग सांठविला? ५

---

* कठोर वचना, † शेंकडो प्रेमळ भाषणांनीं व कृतींनीं

परस्परांना दृढ आलिंगुन।
विसरुन अवघें मीपण, तूंपण,।
केवल,‡ पावन,¶ रम्य सनातन§।
अर्पु ना त्याला। सखि अपुलेंपण देवाला? ६

नको कल्पणें; खरेंच नाहीं।
नेम पळाचा कवणाचाही!।
स्वर्ग म्हणोनी जेणें होई।
याच जगताचा। चल धरूं, तया पंथाला ७

२२ मे १९१४

★

## 'प्रेमाच्या बहुल्यावरीं'

प्रेमाच्या बहुल्यावरी चिर उभा विश्वासशर्मा वर
उद्वाहोत्सुक ही वधू गुणवती आशा, चला सत्वर
ध्या आमंत्रण, विश्वबंधु नमितों मी आपुलीं पावलें
लावा लग्न! म्हणो मुदा वसुमती 'मी स्वर्गता पावलें.'

विभाग
क्रमांक
नों. दि.

★

## 'माझें नांव लढाई'

असतिल सांथी जगांत जितुक्या त्यांहुन मी घनघोर
मूळ नराच्या हृदयीं माझें, नांव तयाचें वैर;
स्वार्थ, कोप, अभिमान, कलह, वध माझीं सर्व फळें हीं
मी मृत्यूचें जीवन केवळ! माझें नांव लढाई १

---

‡ अद्वितीय, ¶ पवित्र, § अक्षयकालीन देव.

जीवन जीवन म्हणतां त्याचें मूर्तिमंत मी मरण
मी रुधिरध्वज, शस्त्रास्त्रांचे वेड मला परिपूर्ण
रक्तकर्दमीं सदा मग्न मी ! प्रिय मज अन्य न कांहीं,
गायन माझें, “ मरा मरा ” हें, माझें नांव लढाई २

पृथ्वीवर, वा महासागरीं, वातावरणीं, गर्दी
माजविली मीं, येईल पुढती त्याला त्याला मर्दी,
वीज घाबरे बघून माझी निजकर्मी चपळाई
मजसम दुसरें पिशाच्च नाही, माझें नांव लढाई ३

नीति, प्रीति, क्षमाशांति हे शब्द यापुढें विसरा,
फेकुन द्या ते कोश ज्यामधे असेल असला कचरा !
सकल कलांना, ज्ञानधनाला, अथवा धर्मालाहि ।
मुठींत माझ्या धरणारी मी, माझें नांव लढाई ४

वृद्धा, तरुणी रडती देती जीव पटापट शोकें,
जिकडे तिकडे उदास अवघें दुःखें अथवा धाकें;
करुन मोकळ्या दिल्या दिशा मीं अनाथ पोरां, दाही !
घरमोडी मी जगीं अनन्यां ! माझें नांव लढाई ! ५

देवदूतिका कोणी म्हणती मला ! परी तें खोटें;
मी म्हणतां ‘वद’ वदती खोटें अज्ञ, सुज्ञ, लघु, मोठे !
खरें हेंच कीं कधीं कधीं मज ईश्वर खेळूं देई
मीहि खेळतें हवी तशी मग ! माझें नांव लढाई ६

सर्व अनर्थांहुनी थोर मी खरोखरीच अनर्थ, ।
धरूं नका तरी करावयाला आज कुणी मम अर्थ;
उक्ति अन्यथा कधीं न झाली “ सत्यमेव जयते ” ही !
परवा परि मज नसे कशाची माझें नांव लढाई ७

REFBK-0007644
REFBK-0007644